काम करा
लाखमोलाचे,
निसर्ग संवर्धनाचे


# मेहता मराठी ग्रंथजगत


जून, २०१८ • पृष्ठे १०० • किंमत : ₹ १५
• वर्ष अठरावे • अंक सहावा




## आवर्जून वाचावे असे काही





ज्येष्ठ अनुवादक/लेखिका उमा कुलकर्णी यांना 'संवादु अनुवादु' या आत्मकथनासाठी मंगळवेढा साहित्य परिषदेतर्फे नुकताच पुरस्कार मिळाला.
माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना उमा कुलकर्णी.



मेहता पब्लिशिंग हाऊसच्या संपादक आणि कवयित्री योजना यादव यांना 'मरी मरी जाय सरीर' या काव्यसंग्रहासाठी मंगळवेढा साहित्य परिषदेतर्फे नुकताच पुरस्कार मिळाला.
माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना योजना यादव.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जून २०१८ ◆ वर्ष अठरावे ◆ अंक सहावा

**संपादक :**
सुनील मेहता
**कार्यकारी संपादक :**
शंकर सारडा
**संपादन सहाय्य :**
अंजली पटवर्धन
**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.
**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**
***मेहता पब्लिशिंग हाऊस***

– *अनुक्रमणिका* –

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **उपक्रम** | १० |
| **पुस्तक परिचय** | |
| देवाजीचं ऑफिस | २० |
| ब्लू बर्ड | २८ |
| साधने | ३८ |
| तिनका तिनका तिहार | ४६ |
| माय डॉटर माय मदर | ५२ |
| **प्रासंगिक** | |
| *नागझिरा* | ६२ |
| *वपु सांगे वडिलांची कीर्ती* | ७० |
| **शब्द शब्द जपून ठेव...** | ७६ |
| **स्मरण** | ८० |
| **अभिप्राय** | ८८ |
| **बालनगरी** | ९६ |

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/ २४४७५४६२ E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

# संपादकीय

## वाचा आणि समृद्ध व्हा!

माणूस लिहितो कशासाठी? तर त्याला त्याचे अनुभव सांगायचे असतात किंवा त्याच्याकडे असलेलं ज्ञान/माहिती जगाला द्यायची असते किंवा लोकांचं निखळ मनोरंजन करायचं असतं किंवा स्वत:मध्ये रमण्याचा लेखन हा एक मार्ग असतो. कारणं काहीही असली, वाचकही  वेगवेगळ्या कारणांसाठी पुस्तकं वाचत असला तरी पुस्तकाद्वारे वेगवेगळ्या व्यक्तींचा, विविधरंगी जीवनाचा, विविध संस्कृतींचा अनुभव घेणं वाचकाला आवडत असतं. अशा वाचनातून त्याची भावनिक समृद्धी वाढत असते. मेहता मराठी ग्रंथजगतच्या माध्यमातून ही समृद्धी वाढवण्याचा प्रयत्न आम्ही नेहमीच करत असतो. या वेळच्या अंकासाठी आम्ही ज्या पुस्तकांमधील काही भाग उद्‌धृत केला आहे, तोही असाच वाचकांच्या भावनिकतेला आवाहन करणारा आहे आणि भावनिक समृद्धी वाढवणारा आहे.

'माय डॉटर, माय मदर'सारख्या कादंबरीतून  मार्गारिट-जोआन, मीना-सुखबीर कौर या मायलेकींच्या जीवनाचं जे दर्शन घडतं ते वाचकाला कुठेतरी आतपर्यंत अस्वस्थ करतं. विशेषत: मार्गारिटचा जीवनप्रवास वाचताना सारखं असं वाटत राहतं, की एखाद्या माणसाला इतकं का भोगावं लागतं?

तर माणसाचं जीवन असंच प्रश्नांकित असतं. काही प्रश्नांची उत्तरं त्याला कधीच मिळत नाहीत आणि शोधायचा प्रयत्न केला तर मनाला खूप यातना होतात. तरीही प्रतिभावंत लेखक मात्र सतत या प्रश्नांची उत्तरं शोधण्याचा प्रयत्न करत असतात. व.पु. काळे यांचं 'सांगे वडिलांची कीर्ती' हे त्यांच्या वडिलांचं त्यांनी लिहिलेलं चरित्र.'वपुं'चे वडील पुरुषोत्तम काळे (वपु त्यांना 'अण्णा' म्हणत) उत्कृष्ट नेपथ्यकार होते. संख्यात्मक आणि गुणात्मक दृष्टीने लक्षणीय काम करूनही त्यांच्या वाट्याला सन्मान, पुरस्कार अभावानेच आले. पैसा आणि प्रसिद्धीपासून ते वंचित राहिले. याबद्दल त्यांनी कधी अवाक्षर काढलं नाही; पण अण्णांच्या मृत्यूनंतरही 'वपुं'ना हे शल्य डाचत राहिलं. त्याचा उच्चार या चरित्रातून त्यांनी केला आहे. वाचकाच्या मनातही हा प्रश्न उभा राहतो

की अण्णांसारख्या कलावंताला पैसा आणि प्रसिद्धी का मिळाली नाही?

तर अशा या प्रश्नांकित जीवनाकडे कुणी सकारात्मकतेनेही बघत असतं, याचा प्रत्यय येतो 'ब्लू बर्ड' हे आत्मकथन वाचल्यावर. वेस्ना मरीच या १६ वर्षांच्या मुलीला बोस्नियात युद्ध सुरू झाल्यामुळे तिच्या बहिणीसह ब्रिटनमध्ये आश्रय घ्यावा लागतो. आपल्या निर्वासितपणाचे अनुभव वेस्नाने अतिशय खेळकरपणे मांडले आहेत. तिच्या या अनुभवांतूनही मानवी जीवनाचं आणि विविध स्वभावाच्या व्यक्तींचं दर्शन घडतं.

सकारात्मक दृष्टिकोनाचं आणखी एक उदाहरण म्हणजे 'देवाजीचं ऑफिस' हे पुस्तक. जेम्स जोसेफ यांनी परदेशात नोकरी करत असताना भारतात यायचा निर्णय घेतला. त्यांच्या परदेशातल्या ऑफिसची एक ब्रँच बंगळूरला असतानाही त्यांनी केरळमधल्या त्यांच्या छोट्याशा गावातील घरातून ऑफिसचं काम करायचा निर्णय घेतला. त्या छोट्या निसर्गसमृद्ध गावात राहताना ऑफिसचं काम आणि कौटुंबिक जीवनाचा सुरेख मेळ त्यांना घालता आला. घरातून काम करतानाचे अनुभव त्यांनी सांगितले आहेत. जेम्स यांच्या या पुस्तकातूनही जीवनाचा आणखी एक रंग बघायला मिळतो आणि विविध स्वभावाच्या व्यक्तीही भेटतात.

आणि जेव्हा माणूस दुर्दैवाच्या फेऱ्यात अडकतो तेव्हा जीवनातील भीषण वास्तवाचा सामना त्याला करावा लागतो. अशीच भीषण वास्तवता आणि काही वेळेला त्या वास्तवतेवरही मात करण्याची प्रवृत्ती दिसते 'तिनका तिनका तिहार' या काव्यसंग्रहातील बंदी स्त्रियांच्या कवितांतून.

तेव्हा 'माय मदर, माय डॉटर' सारखी कादंबरी असेल, 'सांगे वडिलांची कीर्ती'सारखं चरित्र असेल, 'ब्लू बर्ड' सारखं आत्मकथन असेल किंवा 'देवाजीचं ऑफिस'सारखं अनुभवकथन असेल, मानवी जीवनाचे, मनाचे, स्वभावाचे विविध रंग वाचकाला अनुभवायला मिळतात. येवढंच नाही तर विविध देशांतील, राज्यांतील, प्रांतांतील संस्कृतीचं दर्शन घडतं. मानवी जीवनाची ही व्यापकता पाहिली तर कोणालाही असा प्रश्न पडणार नाही, की कशासाठी लिहायचं? जीवनाला भिडण्यासाठी लिहायचं आणि वाचायचंही. एकूणच विविध प्रकारची पुस्तकं वाचल्यानंतर जीवनाच्या व्यापकतेची अनुभूती मिळते आणि ती वाचकाची भावनिक समृद्धी वाढवते. तेव्हा वाचा आणि समृद्ध व्हा!



# पुरस्कार

## आशा बगे यांना राम शेवाळकर स्मृती साहित्यव्रती पुरस्कार



राम शेवाळकर यांच्या नावाने जाहीर झालेल्या राम शेवाळकर स्मृती साहित्यव्रती पुरस्काराच्या पहिल्या मानकरी ठरल्या आहेत आशा बगे. आशा बगे यांच्या साहित्यकृती मानवी मनाचा सूक्ष्मतेने वेध घेणाऱ्या आणि जीवनाला भिडणाऱ्या आहेत. मग त्यांचे 'निसटलेले', 'ऋतुवेगळे' इ. कथासंग्रह असतील किंवा 'भूमी'सारखी साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कादंबरी असेल. या पूर्वी पु.भा. भावे, डॉ. अ. वा. वर्टी, काकासाहेब गाडगीळ, आपटे नगर वाचन मंदिर इ. पुरस्कारही त्यांना लाभले आहेत.

## मसापच्या जीवनगौरव पुरस्काराचे वितरण



महाराष्ट्र साहित्य परिषदेचा यंदाचा जीवनगौरव पुरस्कार लोकसाहित्य व लोकसंस्कृतीचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. प्रभाकर मांडे यांना देण्यात आला. तर 'भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार' राजा शिरगुप्पे यांना देण्यात आला. या पुरस्कारांचे वितरण मूर्तिशास्त्रज्ञ गो. बं. देगलूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी मसापचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे, कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोशाध्यक्ष सुनीताराजे पवार उपस्थित होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या ११२व्या वर्धापन दिनाच्या निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात हे पुरस्कार देण्यात आले. उद्धव कानडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# मेहता मराठी ग्रंथजगत

## नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

### आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ५००रुपये

### डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

### सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**

# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

## WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे**

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**wordpowerbookshop@gmail.com**

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

**सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर**

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

amazon


GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

**इथे मिळतील ई-बुक्स...**

**eBooks**



**www.amazon.in**

**play.google.com**

**Online पुस्तके खरेदी करा www.mehtapublishinghouse.com**

# दिनविशेष

**दिसामाजि काहीतरी ते लिहावे।**
**प्रसंगी अखंडीत वाचीत जावे।।**
**- श्री स्वामी समर्थ रामदास**

☀ वाचकांसाठी सुवर्णसंधी ☀
'करा मैत्री पुस्तकांशी'
'मेहता पब्लिशिंग हाऊस' चा
नवीन उपक्रम

**१६ जून २०१८ ते १५ जुलै २०१८**
**दरम्यानचा दिनविशेष**

**आपल्या लाडक्या लेखकांना वा अनुवादकांना शुभेच्छा**
**या ईमेलवर पाठवा.**

**authors@mehtapublishinghouse.com**

## दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर
## ५० टक्क्यांपर्यंत सूट

१८ **१८ जून - नॅशनल फादर्स डे**

‘चिकन सूप फॉर द फादर्स सोल भाग १ व २, चीपर बाय द डझन, वपु, व्हाय मेन डोन्ट लिसन ॲण्ड विमेन कान्ट रीड मॅप्स, वपु सांगे वडिलांची कीर्ती  या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ९१०/-**

*१८ जून ते २१ जूनपर्यंत*

**सवलत किंमत ५६९/-**

२०

**२० जून - संत कबीर जयंती**

‘बंडखोर,भक्तीत भिजला कबीर, एक एक पाऊल, हा शोध वेगळा, हसत खेळत ध्यानधारणा, माझे माझ्यापाशी काही नाही, मीरा एक वसंत आहे, मीरा श्यामरंगी रंगली,मीरेची मधुशाला, मीरेच्या प्रेमतीर्थावर,म्हणे कबीर दिवाणा, मी धार्मिकता शिकवतो धर्म नाही, मृत्यूचं अमरत्व, मृत्यायुषी, मृत्यू अमृताचे द्वार, मुग्ध कहाणी प्रेमाची, नानक निरंकारी कवी, नानक परमात्म्याचा नाद ओम्कार, नानक संसारी संन्यस्त, नानक सूर संगीत एक धून, साद घालतो कबीर, साक्षात्काराची देणगी,शिवसूत्र-भाग १,२,स्वतःचा शोध, विद्रोही, ऐका संतांनो, नवी पहाट, ध्यानसूत्र, प्रेमरस...कबीरांचा

या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ४८४५/-**

*२० जून ते २२ जूनपर्यंत*

**सवलत किंमत ३०९१/-**

**२१ जून - स्वाती चांदोरकर यांचा जन्मदिन**

‘दहाव्या रांगेतून, अनाहत, आणि विक्रमादित्य हरला, सेलिब्रेशन, पवित्रम्, एक पायरी वर, फॉरवर्ड ॲण्ड,

डिलिट, गोल गोल राणी, काळाकभिन्न, वपु, उत्खनन, युथनेशिया, हिज डे,' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - २३७०/-**

*२१ जून ते २४ जूनपर्यंत*

**सवलत किंमत १३३९/-**

## २१ जून – जागतिक संगीत दिन

'मायकल जॅक्सन : एक जादू आणि बेधुंदी, मंद्र' या अनुवादित पुस्तकांवर विशेष सवलत.

**मूळ किंमत - १२६५/-**

*२१ जून ते २४ जूनपर्यंत*

**सवलत किंमत ७१९/-**

## २१ जून – योगा दिन

**संच १ –** 'आपण आपले ताणतणाव : एक चिंतन, आरोग्यासाठी योग, पाठदुखी घालवण्यासाठी योगसाधना, फिट फॉर ५०प्लस फॉर विमेन' 'ची रनिंग', ध्यानसूत्र, 'स' सुखाचा!, चिंता सोडा सुखाने जगा, पाणी एक अद्‌भुत उपचारपद्धती, धन्वंतरी घरोघरी, चला जाणून घेऊ या! चालणे, हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र, 'Healthy Habbits For A Fit Family' (Health & Diet) या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - २२३०/-**

*२१ जून ते २५ जूनपर्यंत*

**सवलत किंमत १३९७/-**

**संच २ –** 'निरामय यशासाठी ध्यान, द माइंड जिम, २० मिनिटे तंदुरुस्तीसाठी, सौंदर्य आणि तारुण्य टिकवण्यासाठी योगसाधना, स्थूलतेला करा टाटा!, स्वत:चा शोध, अर्थाच्या शोधात, मनावर विजय, एकच पेला शिवाम्बूचा, चला जाणून

घेऊ या! तंदुरुस्ती, चला जाणून घेऊ या! आहार आणि आरोग्य, पीस, लव्ह अ‍ॅण्ड हिलिंग, या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - १७९०/-**

*२१ जून ते २५ जूनपर्यंत*

**सवलत किंमत ११५४/-**

**संच ३ –** ‘चिंतामुक्त जीवन, ‘कार्यमग्न, व्यस्त लोकांसाठी योगसाधना’, सर्व वयोगटांसाठी योगसाधना आणि ध्यानधारणा, फिट फॉर ५०+ फॉर मेन, हसत-खेळत ध्यानधारणा, सुंदर मन, प्रिझनर्स ऑफ अवर थॉट्स, अन्नपुराण, लव्ह मेडिसिन आणि मिरॅकल्स, प्रिझनर्स ऑफ अवर थॉट्स, चला जाणून घेऊ या! योगविद्या’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - १८३५/-**

*२१ जून ते २५ जूनपर्यंत*

**सवलत किंमत १२११/-**

## २२ जून - डॅन ब्राऊन यांचा जन्मदिन

‘द दा विंची कोड, एन्जल्स अ‍ॅण्ड डेमन्स, डिसेप्शन पॉईंट, डिजिटल फॉर्ट्रेस, द लॉस्ट सिम्बॉल, इन्फर्नो’ या **अनुवादित** पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - २८६०/-**

*२२ जून ते २५ जूनपर्यंत*

**सवलत किंमत १६९९/-**

## २६ जून - छत्रपती शाहू महाराज जयंती

‘छत्रपती राजर्षी शाहू महाराज, राजर्षी शाहू छत्रपती एक मागोवा, राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे, राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे, राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे, राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे,

छत्रपती राजर्षी शाहू : एक अभ्यास, या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ९८०/-**

*२६ जून ते २८ जूनपर्यंत*

सवलत किंमत ६५९/-

## २७ जून - राम प्रधान यांचा जन्मदिन

'पहिली फेरी, वादळ माथा ते १९६५ भारत-पाक युद्ध, माझी वाटचाल (मेटकॉफ हाउस ते राजभवन)' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत – १०००/-**

*२७ जून ते २९ जूनपर्यंत*

सवलत किंमत ६१०/-

## १ जुलै - जागतिक हास्य दिन

'कसं बोललात! भाग १ ते ७, हसाल तर वाचाल, फुकट, खुमासदार अत्रे' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत – १०३५/-**

*१ जुलै ते ७ जुलैपर्यंत*

सवलत किंमत ६०९/-

## १ जुलै - राष्ट्रीय डॉक्टर दिन

'मृत्यूवर मात, द पेशंट, मेकिंग द कट, लव्ह मेडिसिन आणि मिरॅकल्स, वेदना आणि व्याधींसह चांगलं जीवन, चाळिशीनंतरची वाटचाल, डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी, धन्वंतरी घरोघरी, अन्नपुराण : आयुर्वेदिक आधुनिक, जीव जिथे गुंतलेला..., संजीवनी उच्च तंत्रज्ञानाची, अफलातून मेंदू' कॅन्सर रोखू या, कॅन्सर केअर, हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत – ३६१०/-**

*१ जुलै ते ७ जुलैपर्यंत*

सवलत किंमत २१३९/-

## २ जुलै – जागतिक युएफओ दिन

‘पृथ्वीवर माणूस उपराच, देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर, अंतराळवीर सुनीता विल्यम्स, स्वप्नाकडून सत्याकडे’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - ४४०/-**

*२ जुलै ते ३ जुलैपर्यंत*

**सवलत किंमत ३३९/-**

## ७ जुलै – रिमल चंगेडे यांचा जन्मदिन

रिमल चंगेडे लिखित ‘आजचा मेनू’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत - २२०/-**

*७ जुलै ते ८ जुलैपर्यंत*

**सवलत किंमत ११०/-**

## ११ जुलै – झुंपा लाहिरी यांचा जन्मदिन

झुंपा लाहिरी यांच्या ‘द नेमसेक’ या अनुवादित पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत - २००/-**

*फक्त११ जुलै*

**सवलत किंमत १०१/-**

## १२ जुलै - आंतरराष्ट्रीय मलाला दिन

**मलाला युसूफजई** यांच्या ‘मी मलाला’ या **अनुवादित** पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत - २९५/-**

*१२ जुलै ते १४ जुलैपर्यंत*

**सवलत किंमत १४९/-**

## १३ जुलै - माधुरी शानभाग यांचा जन्मदिन

'ॲज आय सी - भारतीय पोलीस सेवा, ॲज आय सी - नेतृत्व आणि प्रशासन, ॲज आय सी - स्त्रियांचे सक्षमीकरण, जे आर डी एक चतुरस्त्र माणूस, स्वप्नाकडून सत्याकडे, कीप ऑफ द ग्रास, स्मार्ट लीडरशिप' या अनुवादित पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - १०००/-**

*१३ जुलै ते १७ जुलैपर्यंत*

**सवलत किंमत ५९९/-**

## १३ जुलै - बाजीप्रभू बलिदान दिन

'पावनखिंड, श्रीमानयोगी' या पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - ६९०/-**

*१३ जुलै ते १४ जुलैपर्यंत*

**सवलत किंमत ४४९/-**

## J U N E महिना विशेष

'J' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट

संच १ मधील ८ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - १५५५/- सवलत किंमत -९३३/-

संच २ मधील ११ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २०७४/- सवलत किंमत -१२४४/-

संच ३ मधील १० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २०४९/- सवलत किंमत -१२२९/-

संच ४ मधील ११ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - १९२०/- सवलत किंमत -११५२/-

'U' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट

संच १ मधील ९ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २१६५/- सवलत किंमत -१२९९/-

संच २ मधील ११ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - १८५०/- सवलत किंमत - १११०/-

'N' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट

संच १ मधील १४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २२२५/- सवलत किंमत -१३३५/-

संच २ मधील ११ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २५५०/- सवलत किंमत -१५३०/-

संच ३ मधील १३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २३५५/- सवलत किंमत -१४१३/-

संच ४ मधील ११ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २५९५/- सवलत किंमत -१५५७/-

'E' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट

संच १ मधील ११ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २०९०/- सवलत किंमत -१२५४/-

संच २ मधील ११ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २६६०/- सवलत किंमत -१५९६/-

संच ३ मधील ८ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २९६०/- सवलत किंमत -१७७६/-

## JULY महिना विशेष

'J' आणि 'U' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचासाठी

जून महिन्यातील 'J' आणि 'U' आद्याक्षराचा संच पहावा.

'L' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट

संच १ मधील १० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - २८९०/- सवलत किंमत -१७३४/-

संच २ मधील ११ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - २९००/- सवलत किंमत -१७४०/-

'Y' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट

११ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - १७५५/- सवलत किंमत -१०५३/-

आमचे लेखक-अनुवादक यांचा जन्मदिन वा स्मृतिदिन यानिमित्त तसेच दिनविशेषावर आधारित विषयावरील आणि आद्याक्षरांच्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क**


☎ 020-24476924 / 24475462

What's App No. 9420594665

**website : www.mehtapublishinghouse.com**

**नवं कोरं**

# द केस ऑफ द डेडली टॉय




लेखक
**अर्ल स्टॅन्ले गार्डनर**

अनुवाद
**ज्योती आफळे**

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

नोडी ॲलीसन आपल्या भावी पतीला त्याच्या पहिल्या पत्नीच्या मुलाला काडकन मुस्काटात मारताना पाहते आणि ताबडतोब त्याच्याबरोबर ठरलेले लग्न रद्द करून टाकते.
...नोर्डाची टपालपेटी वर्तमानपत्रांच्या निनावी कात्रणांनी ओसंडून वाहू लागते. फसवले गेलेले प्रियकर त्यांना सोडून गेलेल्या स्त्रियांवर कसा सूड उगवतात या मजकुराची कात्रणे...
...नोर्डाच्या आयुष्यातील आणखी एक काळोखे वळण. कुत्र्याचे भुंकणे, लहानग्याची किंकाळी आणि गोळीबाराचा आवाज. वळणाच्या टोकाशी एक मृतदेह. खुनाच्या आरोपावरून नोर्डाला अटक होते. आणि या सफरीचा दु:खद भयावह अंत होतो.
...नोडी आणि मृत्युदंड या दोहोंच्या मध्ये उभा ठाकतो, कोर्टरूमचा शहेनशहा पेरी मेसन...


# पुस्तक परिचय

*'God's Own Office'* या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद

# देवाजीचं ऑफिस



जेम्स जोसेफ हे 'जॅकफ्रूट३६५' या उद्योगसमूहाचे संस्थापक आहेत. पौष्टिकतेच्या दृष्टीने उत्कृष्ट असलेल्या भारतातील फणसांना एक सुसंघटित बाजारपेठ मिळावी, यासाठी त्यांनी हा उपक्रम सुरू केला. जेम्स जोसेफना उत्तर अमेरिका, युरोप व भारतात जागतिक स्तरावर सुप्रसिद्ध असलेल्या मायक्रोसॉफ्ट, थ्री एम व फोर्डसारख्या कंपन्यांमधील कामाचा वीस वर्षांचा अनुभव आहे. सर्वांत शेवटी ते मायक्रोसॉफ्टच्या डायरेक्टर, एक्झिक्युटिव्ह एंगेजमेंट पदावर काम करत होते. या पदावर असताना त्यांनी भारतातील सर्वोत्तम दोनशे उद्योगसमूहांतील वरिष्ठ कार्यकारी अधिकारी आणि मायक्रोसॉफ्ट कंपनीचे संबंध सुदृढकरण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. विशेष म्हणजे, त्यांनी हे काम केरळमधील आपल्या खेडेवजा शहरातून केले. त्याआधी इंग्लंडमध्ये असताना त्यांच्यावर मायक्रोसॉफ्टच्या उत्पादनांच्या मार्केटिंगची जबाबदारी होती. जेम्सना खूप पुरस्कारांनी गौरवले गेले आहे. त्यातील महत्त्वाचे पुरस्कार आहेत, मायक्रोसॉफ्टमधील सर्वोत्कृष्ट पुरस्कार - सर्कल ऑफ एक्सलन्स आणि टी-एकॉन- केरळकडून मिळालेला 'स्टार्ट-अप आंत्रप्रनेअर ऑफ द इअर' पुरस्कार. हा पुरस्कार त्या त्या वर्षी नव्याने उद्योग सुरू करणाऱ्या सर्वोत्कृष्ट व्यावसायिकाला देण्यात येतो. जेम्सनी इंग्लंडच्या युनिव्हर्सिटी ऑफ वॉरविकमधून इंजिनिअरिंग बिझनेस मॅनेजमेंटमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतलेलं आहे. तिरुवनंतपुरमच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून त्यांनी बी.ई. डिग्री घेतलेली आहे.




लेखक
**जेम्स जोसेफ**

अनुवाद
**सुनीता कट्टी**

*प्रवासी भारतीय, एनआरआय, आपल्या उत्पन्नातील साधारण पंधरा टक्के पैसा आपल्या स्वतःच्या शहरात खर्च करतात. तोसुद्धा त्यांच्या राज्यासाठी उत्पन्नाचा एक मोठा स्रोत ठरतो. मग प्रवासी भारतीय तंत्रज्ञ आपल्या स्वतःच्याच शहरात राहून ऑफिसचं काम करू लागले तर ते स्वतःचं शंभर टक्के उत्पन्न आपल्या राज्यातच खर्च करतील. त्यामुळे राज्यातील इतर लोकांनाही नोकरीच्या खूप संधी उपलब्ध होतील. टीव्ही, वर्तमानपत्रं वगैरेमध्ये दिसणाऱ्या जाहिरातींचं केंद्र लहान शहरात राहणारी कुटुंबं होतील व सोनं-नाणं, लग्नसमारंभांचे पोशाख, साड्या तसंच एनआरआयना लक्षात ठेवून केलेल्या घरांच्या, वृद्धांच्या न्याहरीसाठी दूध, ओट, सुका मेवा वगैरेंच्या मिश्रणानं मिळणाऱ्या शक्तीच्या जाहिराती कमी होत जातील. मोठ्या उद्योगधंद्यात काम करण्यासाठी मोठमोठ्या शहरात अडकून बसलेल्या उच्च अधिकाऱ्यांसाठी हा एक आशेचा किरण आहे. भारत सरकारनं वेगवान रेल्वेगाड्या व कमी किमतीत विमानतळांनी जोडल्या जाणाऱ्या शंभर स्मार्ट सिटीजची घोषणा केली आहे. ती सत्यात उतरली तर अशा शहरांत राहणाऱ्या तंत्रज्ञांना देवाजीचं ऑफिस तयार करण्यास आणखी शंभर ठिकाणं मिळतील.*

### घरून काम करण्याचं बीज

माझं मायक्रोसॉफ्टमधील जीवन थ्री एममधील जीवनासारखंच होतं. माझा मॅनेजर- जॉन अगदी छान बॉस होता. माझी डॉक्टर बायको रात्री व

आठवड्याअखेरीस काम करते आणि त्यामुळे आगाऊ सूचना दिल्यास मी वर्षातून फक्त चारदाच परदेशाचा दौरा करू शकतो, हे त्यानं समजून घेतलं होतं. तो साधारणतः दर शुक्रवारी घरून काम करे. एका शुक्रवारी तो एका मीटिंगसाठी ऑफिसला आला. त्यानं मी अगदी एकटाच ऑफिसमध्ये काम करत आहे हे पाहिलं अन् मला विचारलं, ''अरे, तू शुक्रवारी ऑफिसला का आलास?'' यावर मी त्याला विचारलं, ''तुम्ही सगळे शुक्रवारी घरून का काम करता?'' माझ्या प्रश्नाचं उत्तर त्यानं अगदी शांतपणे दिलं, ''हे बघ, आपल्या ऑफिसमधील बहुतेक सर्व जण लंडनमध्ये राहतात आणि लंडनकडे जाणाऱ्या रस्त्यावर शुक्रवारी संध्याकाळी भयंकर रहदारी असते. लोकांनी शुक्रवारी घरून काम केलं तर ते आपलं ऑफिसचं काम संपताच सुट्टीची मजा लुटू शकतात. त्यांना रहदारीत अडकून पडून आणखी दोन तास वाया घालवावे लागत नाहीत.'' मग त्यानं मला त्याचं स्वतःचं आणि दुसऱ्या मॅनेजरची कामाची कॅलेंडरं पाहायला सांगितली. मी पाहिलं की, त्यांच्या शुक्रवारच्या कामांच्या यादीत खूपसे कॉन्फरन्स फोनकॉल्स होते आणि प्रत्यक्ष हजर राहून करण्याच्या मीटिंग्ज आठवड्याच्या इतर दिवसांत ठेवलेल्या होत्या.

माझ्या घरापासून ऑफिस तसं दूर नव्हतं, पण तरीही शुक्रवारी ऑफिसला येणं फार कंटाळवाणं वाटे. मग घराच्या मागच्या बाजूस असलेल्या बागेकडे तोंड असणाऱ्या सगळ्यात लहान बेडरूममध्ये मी माझं ऑफिस थाटलं. आता शुक्रवारी ऑफिसचं काम मी तिथून करायला सुरुवात केली. काम करत असताना मी बागेत इकडून तिकडे हिंडणाऱ्या खारींना, चिवचिवणाऱ्या पक्ष्यांना व माझ्या छोटुकल्यांना खेळताना पाहू शकत असे. अंधार पडण्यापूर्वी मी मुलींना घेऊन जवळच्या बागेत जात असे.

### अनुभवात्मक व्यवसाय करण्याची कला

मायक्रोसॉफ्टमध्ये असताना मी कस्टमरबरोबरच्या राउंडटेबल कॉन्फरन्समध्ये वेगवेगळे प्रयोग करायला सुरुवात केली. एखाद्या टेबलाभोवतीच्या या छोट्या मीटिंगसाठी मी कस्टमरच्या एका छोट्या गटाला व त्यांना ज्या विषयाबद्दल माहिती पाहिजे, त्या विषयाच्या काही तज्ज्ञांना बोलवत असे. लवकरच माझ्या लक्षात आलं की, मायक्रोसॉफ्टच्या सर्वांत हुशार विक्रेत्यापेक्षाही आमच्या प्रॉडक्टबद्दल समाधानी असलेले कस्टमर त्याचे काय फायदे आहेत, हे जास्त चांगल्या प्रकारे सांगू शकतात. शिवाय ते त्यांच्या बोलण्याची, कन्सल्टिंग फीही आकारत नाहीत. त्यामुळे या

मीटिंगच्या बजेटमध्ये मुख्य वक्त्यासाठी राखून ठेवलेली फी मी त्या मीटिंगमध्ये भाग घेणाऱ्यांना एक नवा छान अनुभव देण्यासाठी वापरू लागलो. या मीटिंग मी कस्टमरना आवडणाऱ्या ठिकाणी उदाहरणार्थ, इंग्लंडच्या फुटबॉल सुपरस्टारच्या ड्रेसिंग रूमला दिलेल्या भेटीसह, वेंबले स्टेडियमच्या एका बॉक्समध्ये किंवा सीनिअर एक्झिक्युटिव्हजना रिटायर होण्याआधी विकत घ्यायला आवडेल अशा कित्येक लाख पौंड्स किमतीच्या राजमहालासारख्या शानदार पेंट हाउसमध्ये ठेवत असे. यासाठी मी नावाजलेल्या बक्षीस समारंभातील सर्वांत महत्त्वाची टेबलं किंवा जिथं एखाद्या समारंभात ड्रेस कोड असे अशा ठिकाणच्या मेजवान्या मी आगाऊ पैसे भरून माझ्या गिऱ्हाइकांसाठी राखून ठेवी. नोकरीतील मला गुरुस्थानी असलेल्या पीटरच्या साहाय्यानं माझी या मीटिंग्जच्या व्यवस्थापकपदावरून, त्यांचा मुख्य कर्ता-धर्ता यजमान या पदापर्यंत प्रगती झाली. आमची सर्वश्रेष्ठ गिऱ्हाइकं आवर्जून माझ्या मीटिंगला येत आणि त्यांच्याबद्दल प्रशंसात्मक शेरे लिहीत.

मायक्रोसॉफ्टच्या इंग्लंड ऑफिसमधील माझा एक सहकारी मनोजही भारतातून आलेला होता. त्याचं बॅकग्राउंडही माझ्यासारखंच होतं. मी इंग्लंडमधील मायक्रोसॉफ्टमध्ये कामाला लागून एक आठवडा झाला होता. बोलता बोलता मनोजनं मला विचारलं की नोकरीच्या बाबतीत तुझं दूरवरचं ध्येय काय आहे. मी म्हटलं, 'पुढील तीन ते पाच वर्षांत मला भारतात परत जायचंय.' माझं म्हणणं उडवून लावत तो म्हणाला, 'आयटीच्या व्यावसायिक नोकरीसाठी भारतातून इथं आलेला प्रत्येक जण सुरुवातीला असंच म्हणतो, पण नंतर त्याचा विचार बदलतो.' मनोज दर वर्षी एकदा मला हाच प्रश्न विचारी. तिसऱ्या वर्षीही माझ्या तोंडून तेच उत्तर ऐकून तो म्हणाला, ''हे बघ जेम्स, तीन ते पाच वर्षांत भारतात परत जायचं असं तू सारखं म्हणतोस; पण तुझ्या लक्षात येतंय का, की तू इथं येऊन आता तीन वर्ष होत आलीयेत. तुझ्या भारतपरतीच्या योजनेबाबत तू फारसा गंभीर दिसत नाहीस.'' या बोलण्यानंतर काहीच दिवसांत मला जोनचा मेसेज आला. जोन हा अमेरिकेतील एका औद्योगिक कंपनीचा प्रमुख होता. दर वर्षी मी कंपनीच्या खर्चानं ड्रेसकोड असलेला ब्लॅक टाय डिनर पुरस्कार आयोजित करत असे. त्यातील एका डिनरसाठी तो दर वर्षी अमेरिकेतून विमानानं इंग्लंडला येई. जोननं मला मेसेज पाठवला होता की 'एनर्जी सेक्टर- ऊर्जा विभागातील एका विशिष्ट प्रॉजेक्टसाठी हेड ऑफिसमध्ये काम करणारा मायकेल नावाचा


माणूस इंग्लंडला येत आहे. त्याच्या मीटिंगला तू हजर राहशील का?' मी मायकेलचं प्रोफाइल पाहिलं आणि माझ्या लक्षात आलं की, हेड ऑफिसमध्ये परत जाण्याआधी मायकेल कंपनीचं आशिया-पॅसिफिक भागातील काम पाहत असे. सांगायची आवश्यकता नाही की मी मायकेलच्या मीटिंगला आवर्जून गेलो. मीटिंग संपल्यावर मी मायकेलकडे त्यानं लंडनला परत जाण्यासाठी टॅक्सी ठरवलीय का, याची चौकशी केली. मायकेल म्हणाला, ''हे बघ, पृथ्वीवरील कार्बन फूटप्रिंट, कार्बन डाय ऑक्साइड आपल्याकडून वाढू नये, याबाबत मी फार जागरूक आहे. त्यामुळे मी सार्वजनिक वाहनानं रेल्वे स्टेशनला जाईन आणि रेल्वेनं लंडनला.'' ही संधी साधून मी मायकेलला म्हटलं, ''माझं घर स्टेशनच्या जवळच आहे. तुमची हरकत नसेल तर मी तुम्हाला रेल्वे स्टेशनला सोडू शकतो.'' त्यानं होकारार्थी उत्तर दिलं. मग त्या वीस मिनिटांच्या प्रवासात मी त्याला माझी भारतात परत जाऊन आपल्या देशाच्या विकासासाठी काम करण्याची इच्छा बोलून दाखवली. त्यानंतर फार जलद गतीनं सूत्रं हलली. केवळ सहा महिन्यांच्या आतच मनोज आणि आमच्या कौटुंबिक मित्रांनी आमचा निरोप समारंभ आयोजित केला. मनोजला अजून वाटत होतं की, कदाचित सहाच महिन्यांत आम्ही परत इंग्लंडला येऊ. त्यामुळे त्यानंतर आणखी सहा महिन्यांसाठी आपलं इंग्लंडमधील घर तसंच ठेवण्याचा आम्हाला सल्ला दिला. तो म्हणाला की, आपण यापुढे भारतातच राहायचंय असा मनाचा पक्का निश्चय झाल्यावरच मी त्या घराचं काय करायचं ते ठरवावं.

मायकेलनं मायक्रोसॉफ्टच्या त्यावेळेसच्या चेअरमनना एक मेल पाठवली होती. चेअरमन रवी वेंकटशननं फोन करून मला कोणत्या प्रकारचं काम करायला आवडेल, हे विचारलं. याबाबत मी बराच विचार करून ठेवलेला होता. एक तर मी केरळमधील माझ्या स्वतःच्या गावात राहून चेअरमनच्या ऑफिसमधील पुढील महत्त्वाच्या योजना करण्याचं त्या मानानं लहानसं काम करू शकत होतो किंवा इंग्लंडमध्ये असताना मी जे काम करत होतो तेच इथंही करू शकत होतो.

मायकेलला माझा चेअरमनच्या ऑफिससाठी काम करण्याचा विचार जास्त आवडला होता; पण माझा व्यवसायगुरू पीटरनं, माझी आपल्या गावात जाऊन राहण्याची तीव्र इच्छा माहीत असल्यानं मला सल्ला दिला की, कुटुंबाला आणखी एकदा हलवण्यापेक्षा मी कंपनीतील त्या मानानं कमी महत्त्वाचं कामच स्वीकारावं. पण अमेरिकेतून इंग्लंडमध्ये स्थानांतर केल्यावर

नवं कोरं

# द केस ऑफ द डेम्यूर डिफेन्डन्ट




लेखक
**अर्ल स्टॅन्ले गार्डनर**

अनुवाद
**बाळ भागवत**

**किंमत : १९०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

डिस्ट्रिक्ट ॲटर्नीच्या दृष्टिकोनातून बघितलं, तर ती अनैतिक संबंधातून जन्माला आलेली एक अनौरस मुलगी आहे. ती अठरा वर्षांची होते. आईचं पत्र उघडते. त्या पत्रातल्या माहितीप्रमाणे मोशेर हिग्लेकडे जाते आणि त्याच्यावर दबाव आणते.

डिस्ट्रिक्ट ॲटर्नीच्या मते मोशेर हिग्लेला नादिनबद्दल थोडंही प्रेम वाटत नव्हतं. आणि नादिनलाही त्याच्याबद्दल प्रेम नव्हतं; पण पत्रातून मिळालेल्या माहितीमुळेच तिच्या शाळा-कॉलेजच्या शिक्षणाचा खर्च करण्यासाठी तिनं मोशेर हिग्लेला भाग पाडलं. ती त्याच्याच घरात राहिली. जॉन लॉकीचं तिच्यावर प्रेम जडलं. मोशेर हिग्ले हा लॉकी कुटुंबाचा मित्र होता. त्याला धमक्या देऊन काही गोष्टी करण्यास भाग पाडणाऱ्या अनौरस मुलीच्या प्रेमात जॉन लॉकीनं पडावं, असं त्याला वाटत नव्हतं; पण तो सभ्य माणसाप्रमाणे वागला. लॉकीच्या कुटुंबाकडे जाऊन तो काहीही बोलला नाही. त्यानं नादिनला त्याच्यापासून दूर राहायला सांगितलं. आणि काही दिवसांतच मोशेर हिग्लेच्या हॉट चॉकोलेटमध्ये सायनाईडच्या गोळ्या घातल्या जातात आणि नादिन एका डॉक्टरला कबुलीजबाब देते, की तिच्या हातून भयंकर मोठी चूक घडली आहे.

माझ्या लक्षात आलं होतं की, कुटुंबासह कुठंही जाणं फार जिकिरीचं असतं, त्यामुळे कंपनीला दोन-दोन पर्याय देण्यात अर्थ नाही. मग मी इंग्लंडमध्ये करत असलेलं कामच भारतात करणं पसंत केलं. त्यामुळे मी भारतात येताच ऑफिसचं काम लगेच सुरू करू शकलो आणि भारतात माझ्या कुटुंबाचं बस्तान बसायला मदत करण्यासाठी थोडा मोकळा वेळही काढू शकलो.

या वेळेस माझी बायको सात महिन्यांची गरोदर होती. कंपनीनं मला नवी दिल्लीजवळच्या हेड ऑफिसऐवजी बंगळूरमधून काम करण्यास परवानगी द्यावी, यासाठी मला कणखरपणानं काही वाटाघाटी कराव्या लागल्या. मला प्रत्यक्ष न पाहता व्यवस्थित काम करायची ऑफिसमधील लोकांना सवय व्हावी, यासाठी मी अवलंबलेली ही युक्ती होती. कारण शेवटी केरळमधील आपल्या गावी जाऊन स्थायिक होणं, हाच माझा खरा हेतू व बेत होता. माझ्यासमोर दुसरा कोणता पर्यायही नव्हता. कारण माझ्या बायकोला मल्याळीशिवाय दुसरी कोणतीही भारतीय भाषा येत नव्हती. ती डॉक्टर असल्यानं स्थानिक भाषेत तिनं आपल्या पेशंटशी बोलावं, ही तिची व्यावसायिक गरज होती. पहिल्या काही महिन्यांत मी मायक्रोसॉफ्टच्या भारतातील सर्व ऑफिसमध्ये जाऊन आलो. त्यामुळे मला येथील परिस्थितीचा आवाका आला. इथं कसं काम करावं, याचा मी तीन महिन्यांत एक आराखडा तयार केला. दरम्यान माझ्या तिसऱ्या मुलीचा जन्मही झाला. आता आमचं कुटुंब खऱ्या अर्थानं जागतिक कुटुंब झालं. माझ्या तीन मुली अमेरिका, इंग्लंड व आशिया अशा तीन खंडांत जन्मलेल्या होत्या आणि वर्तमानपत्रातील त्या लेखात लिहिलेल्या सर्व अटी मी पूर्ण केलेल्या होत्या.


मी परदेशात होतो तेव्हाच्या दहा वर्षांत भारत आर्थिक दृष्ट्या खूपच विकसित झालेला होता. येथील बऱ्याच कंपन्या बहुराष्ट्रीय एमएनसी झालेल्या होत्या. भारतात राहिलेले माझे बरेच मित्र या प्रगतीच्या लाटांवर स्वार झाले होते. वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये ते खूप मोठ्या हुद्द्यांवर काम करत होते. आता खरा प्रश्न हा होता की, जगातील वेगवेगळ्या देशांमध्ये काम करण्याचा माझा अनुभव भारतात काम करण्यासाठी उपयोगी पडणार होणार होता की वाया जाणार होता. कदाचित भारतात काम करण्याची हातोटी मी गमावलेलीही असू शकत होती. इंग्लंडमध्ये सेल्स टीमच्या सहकार्यानं, छोट्या-छोट्या बिझनेस मीटिंग्जमध्ये कंपनीसाठी चांगला बिझनेस मिळवण्याच्या उद्देशानं कस्टमर्सना बोलतं करण्याच्या तंत्रात मी नैपुण्य मिळवलेलं होतं. भारतात आल्यानंतर तीन महिन्यांनी मी इथं त्या तंत्राचा

वापर सुरू केला. चेन्नईच्या पहिल्या मीटिंगपासूनच त्यानं आपला प्रभाव दाखवायला सुरुवात केली.

येथील सर्व प्रमुख शहरांमध्ये त्याला प्रचंड यश मिळालं. इंग्लंडमध्ये लंडन या एका शहरात मी जे काही करायचो, ते भारतातील पाच शहरांमध्ये मला करायला लागायचं. याचा हा अर्थ होता की, माझ्या बंगळूरच्या ऑफिसमध्ये मी लंडन ऑफिसच्या तुलनेत एक-पंचमांश वेळच राहत होतो. शुक्रवारी इंग्लंडप्रमाणे मी घरूनच काम करत होतो. आम्ही सुट्ट्यांमध्ये कारनं केरळमधील आमच्या गावी जायचो आणि तिथंच कायमस्वरूपी राहण्यास योग्य अशा जागांचा शोध घ्यायचो. मी कोची विमानतळापासून कारनं दहा मिनिटांच्या आणि आमच्या वाडवडिलांच्या घरापासून पंचेचाळीस मिनिटांच्या अंतरावर असलेली जमीन विकत घेतली. आमचं हे धावपळीचं आयुष्य वर्षभर चालू राहिलं. माझ्या कामाच्या प्रगतिपुस्तकात उत्कृष्ट हा शेरा मिळाला आणि मग मी पुढचं पाऊल उचलायचं ठरवलं.

◆◆◆


## टी बुक क्लब




**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!**

चालू बुक क्लबचे सभासदत्व ₹ ५० भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.

या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.

**टी बुक क्लब योजनेतील‘क्लासिक्स’साठी खास सवलत!**

₹१०० भरून उपलब्ध असलेल्या कोणतीही आठ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. सर्व पुस्तकांसाठी एकूण पोस्टेज ₹ १३५० राहील किंवा आठ पुस्तकांसाठी पोस्टेज ₹ १२५.

इतर कोणत्याही पुस्तकांवर २०टक्के सवलत मिळवा.


# पुस्तक परिचय

**‘Bluebird - A Memoir’** या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद

# ब्लू बर्ड



वेस्ना मरीचचा जन्म मोस्टार येथे १९७६ साली झाला. वयाच्या १७व्या वर्षी तिने बोस्निया-हरझेगोविना सोडलं आणि ती ब्रिटनला आली. स्कूल ऑफ स्लॅव्हॉनिक अँड ईस्ट युरोपियन स्टडीज, यूसीएल या लंडनस्थित युनिव्हर्सिटीत तिने ‘झेक साहित्याचा अभ्यास केला आणि नंतर बीबीसी वर्ल्ड सर्व्हिसमध्ये काम करू लागली. आता ती लोन्ली प्लॅनेट ट्रॅव्हल गाइड्स लिहिते आणि ‘बीबीसी ऑन-लाइन’ तसेच ‘टाइम आउट गाइड्स’सारख्या प्रकाशनांसाठी पत्रकारिता करते. या क्षेत्रात तिचा चौफेर संचार असतो. ‘ब्लू बर्ड’मधल्या तिच्या एका लेखाने २००७ सालचा नवोदितांच्या लेखनासाठी असलेला ‘पेंग्विन डेसिबेल पुरस्कार’ पटकावला. वेस्ना मरीच लंडनमध्ये राहते आणि सध्या ती तिच्या पहिल्या कादंबरी लेखनात व्यस्त आहे.




लेखक
**वेस्ना मरीच**

अनुवाद
**मैत्रेयी जोशी**

## एका निर्वासित मुलीचं आत्मकथन

*वेस्ना मरीच - तारुण्याच्या उंबरठ्यावर उभी एक बोस्नियन मुलगी. इतर चार जणींसारखीच, सर्वसामान्य. शाळेत जाणारी, मैत्रिणींच्या घोळक्यात रमणारी, स्वप्नरंजन करणारी. बोस्नियन युद्ध सुरू झालं तेव्हा १६ वर्षांची होती ती. तोफगोळ्यांचा वर्षाव सुरू झाला - शहराला सैनिकांच्या छावणीचं स्वरूप आलं, शाळा उद्‌ध्वस्त झाली - बंद पडली आणि एखाद्या कॅफेत जाऊन बसणं, चोरून सिगरेट ओढणं अशक्यप्राय होऊन बसलं. मरीच भगिनी यूकेला निसटल्या.*

*'ब्लू बर्ड' ही तिची ब्रिटनमधल्या वास्तव्याची कहाणी. चमकदार, सूक्ष्म विनोदी लेखन आणि निर्वासिताचं जिणं जगताना आलेले अनुभव शब्दबद्ध करताना ठेवलेली 'सहजता' हे तिच्या लेखनाचं वैशिष्ट्य म्हणावं लागेल. कुठेही कटुतेचा अंश नाही, दुःखाचं रडगाणं नाही. जणू काही ब्रिटनमध्ये टुरिस्ट म्हणून आली.*

*इथली भाषा, रीतीरिवाज, 'संस्कृती' आत्मसात करता करता तिला मजेदार अनुभव येतात. बोस्नियाच्या मातीत रुजलेलं हे रोपटं - परक्या देशात आपली मुळं रुजवायच्या क्लेशकारक, हृदयस्पर्शी धडपडीतही मनाची प्रसन्नता टिकवून ठेवतं. आणि मग ही कुणा एका निर्वासिताची कहाणी बनते - 'अ कॉमेडी ऑफ मॅनर्स.'*

**जानेवारी १९९४**

एक्झिटरमधली एक सकाळ. कडाक्याची थंडी पडलेली. मला जाग आली तेव्हा पुढच्या दाराजवळ फरशीवर एक पत्र पडलं होतं. बाकी सगळे

अजून गाढझोपेत होते म्हणून मी आमच्या किचनमधल्या खिडकीजवळ ठेवलेल्या टेबलाशी बसले आणि तो लिफाफा फोडला. त्याच्यावर तारीख होती जानेवारी, १९९४ची अखेरची. माझ्या बाबांच्या हस्ताक्षरातलं पत्र होतं ते. बाहेर रस्त्यावर एक माणूस त्या थंडीत झपाझप चालत गेला. त्याचे कान पोवळ्यासारखे लालबुंद झालेले. मला माझ्या तोंडातून निघणाऱ्या वाफाही दिसत होत्या. माझा श्वास तरल झाला होता.

प्रियतम बाळे,

आता सकाळ झाली आहे आणि ते टेकडीवरचे नराधम शांत आहेत; तेवढ्या अवधीत मी हे पत्र तुला लिहीत आहे; कारण अजून माझी विचारशक्ती जागृत आहे. दोन दिवसांपूर्वी मी हॉस्पिटलमधून घरी आलो. थँक गॉड! तिथलं जेवण मला मुळीच जात नव्हतं. आम्हाला मदत म्हणून जी फूड पॅकेट्स मिळतात ती कितीतरी रुचकर असतात. शेजारीण जाता जाता डोकावली आणि तिने तिच्या खेड्यातून थोडे खाद्यपदार्थ आणले होते, ते मला दिले. तुझी आजी बेक करते तसे थोडे 'बेक्ड पोटॅटोज.' त्या चवीनं कितीतरी स्मृती चाळवल्या.

तर मग, नवीन काय? तू विचारशील. तर सगळं काही बव्हंशी पूर्वी होतं तसंच आहे. फक्त काल आपल्या परिसरात एक किरकोळ प्रसंग घडला. मी मुहम्मदला भेटायला गेलो होतो. आणि आमच्यापाशी थोडं मद्य शिल्लक होतं म्हणून आम्ही 'सेवदालिंक' गायला सुरुवात केली. मला वाटतं, आम्ही जरा जोशातच आलो होतो; त्यामुळे मोठ्या आवाजात गाऊ लागलो. खिडक्याही उघड्या होत्या. पण त्या इमारतीचे ते मूर्ख पहारेकरी, ज्यांचं एकाएकी वयाने वाढलेल्या क्रोट्समध्ये परिवर्तन झालं आहे; ते फ्लॅटमध्ये आले आणि आम्हाला त्यांनी 'मुस्लीम गाणी गायचं थांबवा' असं फर्मावलं. कालची पोरं ती, मला रागच आला. मी त्यांना म्हटलं, 'खड्ड्यात जा! मी एक सर्ब आहे आणि मी हे गाणं गाणार आहे.' पण ती काही फारशी चांगली कल्पना नव्हती. त्यांनी जवळपास मला अटकच केली म्हण ना! तेव्हा मला माझ्या पंगुपणाची सबब पुढे करावी लागली. निदान ती ऐकून तरी ते मला सोडून देतील अशी आशा वाटली मला. मी घरी निघून आलो. त्यानंतर मुहम्मद झोपून गेला आणि त्याला जाग आली तेव्हा त्याचा टीव्ही गायब! ती पोरं परत आली आणि त्यांनी त्याचं घर लुटलं. त्यांना इतकंच जमतं. फक्त लुटालूट, चोऱ्यामाऱ्या. ते काही गुपित नाही राहिलेलं, पण आपण काय करू शकतो अशा वेळी?

काही नाही. फक्त गप्प राहायचं. तोंड बंद. ते तसं नाही ठेवलंत, तर तुमची गतही त्या माणसासारखी होईल. त्यातल्याच एका पहारेकऱ्यानं हल्लीच एका माणसाला गोळी घातल्याची घटना. एखाद्याच्या खिडकीला काळे कागद लावले नसतील तर इशारा देण्यासाठी ते कसे हवेत फैरी झाडतात, तुला माहिती आहे? त्यांचं तेच चाललं होतं आणि असं दिसतं की, हा माणूस त्याच्या बाल्कनीत आला आणि ओरडला, 'तुम्हाला कायम गोळीबारच करायला हवा का? तुमचं रॅकेट कधीतरी हे प्रकार थांबवणार आहे का?' बस्स! त्या पहारेकऱ्याने त्याला गोळी मारली. 'हे घे,' त्याचे उद्‌गार, 'आता तुला कायमची शांती मिळेल.'

तर असं आहे सगळं. म्हणून मी शक्यतो घरीच राहायचा प्रयत्न करतो. बाहेर जावं लागतं पाणी आणण्यासाठी; पण माझा पाय अजून पूर्णपणे बरा नाही झाला; त्यामुळे कुणी ना कुणी मला थोडंसं पाणी आणून देत असतं. त्या दिवशी एक मित्र मला हॉस्पिटलमध्ये पाहायला आला होता. तो म्हणाला की तू सावध राहा. सैनिक उरलेल्या सगळ्या सर्ब्जना त्यांच्या घरातून बाहेर काढताहेत आणि त्यांना खंदक खणायला लावताहेत. कधीकधी तर त्यांच्या गळ्यात पट्टे बांधून त्यांना गवत खायला लावतात - मजा म्हणून- केवळ त्यांचा अपमान करण्याच्या उद्देशाने. माणसं कसल्या मातीची बनलेली असतात? मी माझाच मला प्रश्न विचारत राहतो. ही इतकी विकृती आणि क्रौर्य येतं कुठून?

आपल्या परिसरात राहणारी ती लॉरा अजूनही आपण पुरुष आहोत या भ्रमात वावरत असते. स्पष्टच आहे, ती लष्करात भरती व्हायला गेली - तिला लढायचं होतं. तेव्हा त्यांनी तिला निक्षून सांगितलं, 'लॉरा, स्त्रियांना इथे परवानगी नाही.' त्यावर ती काय भडकली होती म्हणून सांगू! अधूनमधून तीही ड्रिंक्स घ्यायला येते आमच्याबरोबर. बघ, निदान काही माणसं तरी अशी असतात; जी कधीच बदलत नाहीत. असं दिसतं की, जी वेडपट माणसं असतात, तीच फक्त बदलत नाहीत इथे. आणि याहून वाईट तर हे आहे की यापेक्षा अधिक वेडपट माणसं इथे दररोज जन्म घेताहेत.

माझ्या आणि युद्धाच्या बातम्या सध्या पुरेत. मी पुन्हा पत्र लिहीन.

तुझी प्रकृती सांभाळ आणि आनंदात राहा.

आणि हे पत्र लिहून झाल्यावर थोड्याच दिवसांनी माझे बाबा देवाघरी गेले. इतकं अचानक आणि झटपट झालं सगळं. सकृद्दर्शनी, कानाच्या

दुखण्यामुळे त्यांचं निधन झालं असावं असं दिसत होतं. एका ढगाळ दुपारी आम्हाला फोन आला. पलीकडचा आवाज सांगत होता की, त्यांनी एक-दोन दिवसांपूर्वी कान दुखत असल्याची तक्रार केली होती आणि डॉक्टरांनी त्यांना त्यावर काही गोळ्याही लिहून दिल्या होत्या. त्यांनी एकदम बऱ्याच गोळ्या घेतल्या. (माझ्या बाबांचा अजब तर्कवाद होता : एका गोळीने जर बरं वाटणार असेल, तर दहा किंवा जास्त गोळ्यांनी अजून लवकर गुण येईल) आणि ते कोमात गेले. सकाळी सगळा कारभार आटोपला - त्या मोडकळीस आलेल्या सिटी हॉस्पिटलात त्यांनी शेवटचा श्वास घेतला. आम्ही एकत्र जमलो, कुणीच काही बोलत नव्हतं. कुणालाच काय करावं ते सुचत नव्हतं. १९९४ मधला फेब्रुवारी महिना होता तो. मला इंग्लंडमध्ये येऊन चौदा महिने झाले होते. लहान मूल चालायला शिकतं, ते साधारण याच वयात! माझी आई, बहीण आणि मी, आता काय करावं याचा विचार करू लागलो. प्रथम अंत्यसंस्कारांची व्यवस्था करणं हे शहाणपणाचं ठरेल यावर आमचं एकमत झालं. पण दफन कोण करणार? आम्ही तिघी ब्रिटनमध्ये होतो आणि बाबांची सगळी भावंडं सर्बियामध्ये. म्हणून मी 'होम ऑफिस'ला फोन केला.

"हॅलो, हे होम ऑफिस आहे का?"

"येस. तुमचा आय एन डी (आयडेंटिटी) नंबर काय आहे?"

"३०५६७३४४"

"मी काय मदत करू शकतो?"

"मी निर्वासित म्हणून तुमच्या देशाकडे आश्रय मागितला आहे. माझे बाबा नुकतेच बोस्नियामध्ये वारले आणि तिथे त्यांचं दफन करायला कोणी नाही. माझी आई पण सध्या ब्रिटनमध्ये आहे आणि तिनेही आश्रय मागितला आहे. तर ती तिथे त्यांच्या अंत्यसंस्कारांची व्यवस्था करायला जाऊ शकते का? आणि तसं केलं तर तिचा शरणार्थीचा दावा रद्द नाही ना होणार? तो अबाधित राहील ना?"

"थोड्या थांबा, मिस. मी तुम्हाला संबंधित खात्याला फोन लावून देतो."


शांतता. तुटक रिंग वाजते आणि नंतर

"येस, हॅलो!"

"हॅलो, माझा आयडेंटिटी नंबर आहे ३०५६७३४४. माझ्या बाबांचं नुकतंच बोस्नियात निधन झालं असून तिथे त्यांचं दफन करायला कोणी नाही. माझी आई पण सध्या ब्रिटनमध्ये आहे. तिनेही ब्रिटनकडे आश्रय

**नवं कोरं**

# द केस ऑफ द आइस-कोल्ड हॅन्ड्स




लेखक
**अर्ल स्टॅन्ले गार्डनर**

अनुवाद
**बाळ भागवत**

**किंमत :१८०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

झगमगीत आणि रंगीत दिव्यांच्या प्रकाशात फोल मोटेलसमोरचा भाग चमकत होता.
गाडी उभी करून मेसनने केबिन क्रमांक १४चे दार ठोकले.
उत्तर नाही... पण आतले दिवे लागले होते.
मेसनने दार उघडते का बघितले, तर ते सहज उघडले.
त्याने केबिनभर नजर फिरवली. त्याची नजर स्नानगृहाच्या बंद दाराकडे गेली. पुढे होऊन त्याने दारावर टकटक केली. उत्तर न आल्यावर दार उघडले.
मार्व्हिन फ्रेमॉन्टचे प्रेत शॉवरखाली पडले होते.
त्याने खिशातून हातरुमाल काढला. स्नानगृहाच्या दाराच्या मुठीवरचे ठसे पुसले. तो पुढल्या दाराकडे निघत असतानाच ते उघडून नॅन्सी बँक्स घाईघाईने आत शिरली.
ती पुढे झाली आणि तिने त्याचे हात आपल्या हातात घेतले.
तिचे हात बर्फासारखे थंडगार होते.

मागितला आहे; तर ती तिथे त्यांच्या अंत्यसंस्काराची व्यवस्था करायला जाऊ शकते का? आणि तसं केलं तर तिचा शरणार्थीचा दावा रद्द नाही ना केला जाणार?''

''बरं पण तिथे त्यांचं दफन करायला पुढे येईल असा कोणी माणूस नाही का?''

''नाही. आम्ही तिघी इकडे आहोत आणि त्यांची भावंडं सगळी बेलग्रेडमध्ये आहेत. माझे बाबा सर्ब आहेत आणि तिथली 'ऑर्थोडॉक्स' दफनभूमी वापरात नाही. ती फार धोकादायक ठिकाणी आहे - एका डोंगरउतारावर. दुसरं कोण हे काम करणार? आम्हाला दफनविधी एका तात्पुरत्या स्मशानात करायची व्यवस्था करावी लागेल. ही भूमी शहराच्या बाहेर असून, तिथे शहराच्या पश्चिम भागात जे मुस्लीम आणि सर्ब्ज मरण पावतात त्यांचं दफन केलं जातं.''

''बरं बरं, ही जी जागा सांगता तुम्ही, ती आहे कुठं?''

''मला नीटसं ठाऊक नाही. त्या जागेला मेजिने म्हणतात. एका खेड्यापासून जवळ आहे ती. शहराच्या बाहेर सुमारे दहा किमी अंतरावर.''

''तुम्ही मला ती जागा नेमकी कुठं आहे सांगू शकता का? तुमच्याजवळ नकाशा आहे?''

मी जाऊन युगोस्लाव्हियाचा नकाशा आणते. या बयाला ही एवढी सगळी माहिती हवी तरी कशाला? पण माझं विचारायचं धैर्य होत नाही. ती प्रश्न विचारत राहते, मी उत्तरं देत राहते - तिचे प्रश्न मूर्खपणाचे आणि विसंगत असले, तरी!

''मोस्टारस्को ब्लॅटो नावाची एक जागा आहे. तिथून हे ठिकाण फारसं दूर नाही. नेमकेपणाने सांगायचं तर एका हिरवळीच्या तुकड्यावर ही तात्पुरती स्मशानभूमी उभारली आहे.'' मी तिला माहिती पुरवते.

''असं आहे का?'' ती टिपणं काढते.

''मग तुम्हाला काय वाटतं, हे शक्य होईल का?''

''ते कशाने गेले?''

''त्यांच्या कानाला काहीतरी त्रास होत होता आणि नंतर त्यांचं ब्रेन हॅमरेज झालं. संध्याकाळी ते कोमात गेले आणि सकाळी त्यांचं निधन झालं.

''ओके'' अजून टिपणं.

''तर मग तुम्हाला ते शक्य होईलसं वाटतं का? आम्ही फार काळ थांबू

शकत नाही. तिथे युद्ध पेटलं आहे आणि मृतदेह दीर्घकाळ तसेच ठेवता येत नाहीत. कशाचाच उपयोग होत नाही. मृतदेह जतन करायला काही उपाय नाहीत तिथे. शक्यतो ताबडतोब त्यांचं दफन केलं जातं.''

''हूं... या केसवर मला माझ्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय करावा लागेल. मी तुम्हाला कळवते. तुमचा टेलिफोन नंबर काय आहे?''

मी माझा नंबर तिला देते.

आम्ही प्रतीक्षेत. प्रतीक्षेचा दुसरा दिवस. तेवढ्यात आम्हाला माझ्या बाबांच्या एका दूरच्या नातेवाइकांची आठवण येते. तो अजून वेस्टर्न हरझेगोविनाच्या एका खेड्यात राहतो आहे. आम्ही त्याला आणि माझ्या आईच्या बहीण-भावांना फोन करतो. ते सारे आमच्या शेजाऱ्यांबरोबर एकत्र येऊन माझ्या बाबांचं दफन करतात. त्या मृतदेहाचे फोटो घेतात. सात वर्षांनंतर फोटोंच्या एका गठ्ठ्यात मला योगायोगानेच ते फोटो सापडतात. त्या क्षणी मी टॉयलेट सीटवर बसले होते आणि फॅमिली फोटोंचा ढीग चाळत होते. बाबांचे ते फोटो पाहतानाचा तो क्षण मी कधीच विसरणार नाही. कारण मला नेहमीच हळहळ वाटत आली आहे या गोष्टीची की, माझ्या बाबांच्या मृत्युशी संबंधित साऱ्या गोष्टींची वेळ इतकी चुकीची होती - आणि जसं व्हायला हवं होतं ज्या पद्धतीने; तसं काहीच घडलं नाही. अंत्ययात्रेला मोजून पाच माणसं होती- तो लहानखुरा कुबड असलेला फॅमिली फ्रेंड धरून. गेले काही महिने तो माझ्या बाबांबरोबर राहत होता आणि जेव्हा बेडवर बाबा बेशुद्ध पडलेले दिसले त्याला, तेव्हा त्यानेच रुग्णवाहिका बोलावली होती.

अंत्यविधी पार पडले. मी मिस 'रे'ला फोन लावला. काही दिवसांपूर्वी मी याच इमिग्रेशन ऑफिसरशी बोलले होते.

''हॅलो, मी मिस 'रे'शी बोलू शकते का प्लीज?''

''मला समजेल का कोण बोलतं आहे ते? आणि कसल्या संदर्भात आहे तो?''

मी विशद करते.

''ओह, मला सांगायला खेद होतो पण मिस 'रे' सध्या दोन आठवड्यांच्या सुट्टीवर गेल्यात.''

''आणि मी विचारू शकते का, त्या कधी गेल्या ते?''

''साधारण दोन-तीन दिवसांपूर्वी. मी तुम्हाला काही मदत करू शकते का?''

''नो. थँक्स.''


मी फोन ठेवून देते. आणि अशी कल्पना करते की, एक पॉवरफूल एके-४७ घेऊन मी सगळ्या इमिग्रेशन ऑफिसर्सना मारून टाकते आहे आणि विशेषकरून त्या मिस 'रे'ला हालहाल करून मारते; या कल्पनेचा परिपाक म्हणजे मला सातत्याने एक स्वप्न पडू लागतं - कित्येक आठवडे त्या स्वप्नाने मला पछाडलेलं असतं. माझ्या बाबांचं हे तात्पुरतं थडगं आपल्याला कधी चांगले दिवस पाहायला मिळतील, याच्या प्रतीक्षेत आहे. एक विस्तृत हिरवं मैदान - जिथे सायप्रस वृक्ष वाऱ्यावर डोलताहेत.

या दु:खाची खपली भरून येणं कठीणच आहे. माझ्या बाबांच्या अस्थी काही वर्षांनी त्या जागेतून उकरून मोस्टारमधील 'ऑर्थोडॉक्स'च्या आमच्या घराण्याच्या दफनभूमीवर हलवल्या गेल्या. दरवर्षी मी त्या थडग्याला भेट देते, वांझ, नापीक जमिनीच्या कुशीत ते विसावलं आहे - टेकडीच्या उतारावर आणि तिथले दगड वरून खाली पसरलेल्या शहराकडे बघताहेत. एके काळी ही स्मशानभूमी उंच पाईनवृक्ष आणि सायप्रसच्या झाडांनी आच्छादलेली होती. त्यांची गर्द सावली तिथल्या करड्या थडग्यांवर पडायची. तिथे लावलेले मृतांचे कृष्ण-धवल फोटो दूर अंतरावर एकटक बघत असायचे. युद्धकाळात वृक्षांची कत्तल सुरू झाली आणि थंडीने गारठलेल्या नगरवासीयांनी त्यांची लाकडे शेकोटीसाठी वापरली. कुणीतरी आपल्या मनातल्या तिरस्काराला वाट देण्यासाठी छिन्नीचे प्रहार करून त्या फोटोंमधील चेहऱ्यांचे टवके उडवले होते. दरवर्षी मी इकडे येते आणि त्या थडग्याच्या तापलेल्या शिळेवर बसते. उन्हाळ्यातील उष्म्याचा दिवस असतो तो. अंगाची लाही लाही होत असते पण दिवस कलू लागला की, मी इथे येते. या शिळेच्या जवळच रेताड मातीत फोफावलेलं रोझमेरीचं झुडूप आहे. काही वेळा मला इथल्या झुडपांमध्ये मोठी कासवं संथपणे प्रेम करताना दिसतात. कधीकधी मी माझ्या मैत्रिणींना इथे घेऊन येते आणि खाली पसरलेल्या शहराकडे आम्ही पाहत राहतो. तर कधी मी एकटीच बसलेली असते आणि दुसऱ्या कुणाच्या थडग्यापाशी शोकाकुल होऊन बसलेला एकाकी नातेवाईक मला त्या वातावरणात साथ देत असतो. इकडे आकाशाच्या रंगछटा बदलत असतात - फिकट निळं आकाश गर्द जांभळं होऊन जातं आणि शाई सांडल्यासारखा त्याचा रंग धरतीला वेढून टाकतो

◆◆◆

**नवं कोरं**

# द केस ऑफ द क्रिमसन किस




लेखक
**अर्ल स्टॅन्ले गार्डनर**

अनुवाद
**ज्योती आफळे**

**किंमत : १९०/- रु. । पोस्टेज : ५०/- रु.**

''तुला सांगतो डेला, इथेच कुठेतरी पुरावा आहे. टेबलवरचा ग्लास, त्याच्या तळाशी असलेली किंचित व्हिस्की आणि सोडा, सगळीकडे फे ॲलिसनच्या बोटांचे ठसे, यातच कुठे तरी! शिवाय या फोटोत त्याच्या कपाळावरचा किरमिजी चुंबनाचा निलाजरा शिक्का बघितलास? यातही पुरावा असणार.''

पाचूंनी मढवलेल्या हस्तिदंताभोवती विळखा घातलेली फाँगची लांबसडक बोटे – मृदू खडकाभोवती वळवळत्या सर्पांचा विळखा पडावा, त्या खडकाला मैत्र-भावनेने आंजारावे-गोंजारावे, चपळाईने देखणी हालचाल करावी आणि तरीही ते मृत्युदायी भुजंग असल्याचे पाहणाऱ्याला सतत स्मरण व्हावे, असे ते दृश्य होते!

'भीती' आणि 'शंका' या दोन फक्त सवयी आहेत. माणूस या दोहोंना झटकन आत्मसात करतो. खात्यात आम्ही याला 'लबाड वीज' म्हणूनच ओळखतो. वीज कशी एकाच जागी दुसऱ्यांदा कडाडत नाही, तसंच आहे याचं....

लांबवलेले हात एकमेकांच्या अगदी जवळ येईपर्यंत; दोघे आपापल्या खुर्च्यांवरून पुढे झुकले. गोस्तने पत्राचा ताबा घेतला, तर मारने चेकचा.

# पुस्तक परिचय


'The Tools' या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद

# 'साधने'



फिल स्टुट्झ यांनी सिटी कॉलेज, न्यू यॉर्क इथून पदवी घेतली आणि न्यू यॉर्क विद्यापीठाकडून एम.डी. प्राप्त केली. रिकर्स आयलंड इथल्या तुरुंगात सुरुवातीला त्यांनी मानसोपचारतज्ज्ञ म्हणून कार्य केले. नंतर त्यांनी काही दिवस न्यू यॉर्कमध्ये खासगी व्यवसाय केला. १९८२ मध्ये लॉस एंजेलिस येथे स्थायिक होऊन तिथे त्यांनी हा व्यवसाय सुरू केला.

बॅरी मायकेल्स यांनी हार्वर्ड इथून बी.ए. पदवी घेतली. नंतर कॅलिफोर्निया विद्यापीठाकडून कायद्याची पदवी प्राप्त केली, नंतर दक्षिण कॅलिफोर्निया विद्यापीठाकडून त्यांनी एम.एस.डब्ल्यू. ही सामाजिक सेवेशी संबंधित पदवी मिळवली. १९८६पासून त्यांनी मानसोपचारतज्ज्ञ म्हणून खासगी व्यवसाय सुरू केला.




लेखक
**फिल स्टुट्झ**
**बॅरी मायकेल्स**

अनुवाद
**डॉ. जयश्री गोडसे**

***समस्यांना द्या विराम...***
***जन्मू द्या धैर्य, कल्पकता विश्वास***

*व्यक्तीमध्ये लक्षणीय बदल होण्याच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण, परिणामकारक पाच 'साधने' देणारे पुस्तक!*

*रुग्णांची मानसोपचार पद्धतींबाबत सर्वाधिक तक्रार असते की, अपेक्षित असलेल्या बदलांसाठी खूप वाट पाहावी लागते. 'साधने' यावर योग्य उपाय सुचवतात. पारंपरिक उपचारपद्धती या भूतकाळातील घटनांवर जास्त लक्ष केंद्रित करतात. फिल स्टुट्झ आणि बॅरी मायकेल्स हे मात्र त्यांच्या भात्यातील 'साधने' हे तंत्रज्ञान वापरतात. यामुळे रुग्णांना, त्यांच्या समस्यांचा वापर एखाद्या तरफेसारखा करून स्वत:मधील सुप्त शक्ती जागृत करणे व तिला गती देणे शक्य होते. या वृत्तीतील बदलामुळे समस्याच संधी बनतात – त्यातूनच धैर्य मिळते, शिस्त अंगी बाणते, स्वत:ला व्यक्त करण्याची क्षमता मिळते, आणि स्वत:ची सर्जनशीलता अधिक खुलते, विस्तारते. कित्येक वर्षं स्टुट्झ आणि मायकेल्स हे तंत्रज्ञान फक्त त्यांच्याकडे येणाऱ्या रुग्णांसाठीच वापरत होते; पण आता 'साधने' या पुस्तकाद्वारे ही क्रांतिकारी नवशक्ती*

*निर्माण करणारी पद्धती वाचकांसाठीसुद्धा उपयुक्त ठरणार आहे. ज्या व्यक्तींना स्वत:च्याच सुप्त शक्तींचा शोध घ्यायचा आहे त्या सर्वांसाठी हे पुस्तक उपयुक्त आहे. हे पुस्तक लिहिण्यात या लेखकद्वयीचा एकच उद्देश आहे तो म्हणजे, तुमचे आयुष्य असाधारण लवचीक बनावे, तुम्हाला अमूर्त असा आत्मानंद लाभावा, उमजावा.*

## आकांक्षांची परावृत्ती

### उच्चशक्ती : पुढे पुढे नेणारी शक्ती

विनी नावाचा माझा एक रुग्ण होता. त्याच्या स्वभावामुळे त्याला भेटणारी व्यक्ती काही मिनिटांतच त्याची विरोधक होत असे. आमच्या पहिल्या भेटीच्या वेळेस माझ्या प्रतीक्षालयात मी त्याचे स्वागत केले. त्याबरोबर तो अत्यंत उपहासाने म्हणाला, ''काय रे, तुझ्या इथली सजावट! किती फालतू आहे, कुठल्यातरी टुकार 'सेल' मधून आणलेलं दिसतंय. अर्थात, तुला आयकिआचं फर्निचर काय परवडणार म्हणा!'' खरंतर तो उत्तम विनोदी नट होता; परंतु त्याची बुद्धी वेडीवाकडी चालत राहिल्यामुळे तो अनेकांचं शत्रुत्व ओढवून घेत असे. अर्थात त्याच्या रेझ्युमेवरून हा उलगडा होणे शक्य नव्हते. मी जेव्हा त्याला भेटलो तेव्हा तो तेहतीस वर्षांचा होता.


गेली दहा वर्षे या विनोदी भूमिकेत राहूनही तो संकुचितपणातून बाहेर पडू शकत नव्हता.

त्याला संधी नव्हती असे नाही. मोठ्या क्लबमधे जिथे टॉक शो असतो किंवा बसून प्रेक्षकांशी बोलायचे असते अशा ठिकाणी त्याची निवड व्हावी म्हणून त्याच्या मॅनेजरने खूप प्रयत्न केले होते. खरे म्हणजे या क्षेत्रांत खूप स्पर्धा होती. विनी खरंच खूपच चांगले विनोद करत असे. विनी स्वत:च त्याच्या मॅनेजरचे सगळे प्रयत्न विफल ठरवत असे. एकदा त्याच्या मॅनेजरने एका मोठ्या क्लबच्या मालकाबरोबर विनीची भेट ठरवली. त्यामुळे त्याला एक चांगली संधी मिळाली असती. तर ही स्वारी उगवलीच नाही. आपण का हजर राहू शकलो नाही हे कळवायची तसदीदेखील त्याने घेतली नाही, एवढेच नाही तर पुन्हा कधी येऊ हेही विचारले नाही. मग मात्र मॅनेजरची सहनशक्ती संपली. भडकलेल्या मॅनेजरने त्याला धमकीच दिली की, तो जर मला भेटला नाही तर त्याला काढूनच टाकले जाईल. डोळे मिचकावत विनी कुत्सितपणे म्हणाला, ''जरा जाऊन बघू या दिव्यातून असे मी ठरवले.''

मी विनीला विचारले की, तो त्या मुलाखतीसाठी का गेला नव्हता?

**नवं कोरं**

# द केस ऑफ द हॉन्टेड हसबन्ड




लेखक
**अर्ल स्टॅन्ले गार्डनर**

अनुवाद
**ज्योती आफळे**

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

बिच्चारी स्टीफन क्लेअर. लिफ्ट मागण्याची चूक एवढी महागात पडेल याची कल्पनाही नसलेली. गाडीला अपघात होतो अन् लिफ्ट देणारा सूंबाल्या करतो; गाडी चोरल्याचा आरोप स्टीफनच्या माथी. त्यातून उलगडते आगळीवेगळी प्रेमकहाणी. प्रेम जपण्यासाठी ही बहाद्दरीण दोन दोन खून करायलाही मागेपुढे पाहात नाही; पण ते प्रेम मिरवण्यासाठी ती स्वत: तरी जिवंत राहते का?

त्याच्या उत्तरांपैकी पहिले अगदी हास्यास्पद होते. ''मी सूर्यवंशी आहे,'' तो गुरगुरला, ''आणि माझ्या मॅनेजरला हे ठाऊक आहे.''

''अरे पण आपल्या व्यवसायाच्या वाढीसाठी फक्त एकदा तू लवकर उठला असतास तर?''

अंमळ मोठे असलेले आपले डोके हलवत तो ठामपणाने म्हणाला, ''छे, छे! 'पोटासाठी काय वाट्टेल ते' हा खाक्या मला मुळीच पसंत नाही. एवढा ताण कशाला घ्यायचा?''

साहजिकच स्वत:च्या व्यावसायिक संधीसाठी ज्याला लवकर उठणे कष्टाचे वाटत होते त्याला संधी मिळाल्या नाहीत तर त्यात आश्चर्य ते काय? त्याच्या मूर्खपणाचे ते सगळ्यात ताजे उदाहरण होते इतकेच. एका परोपकारी बुद्धीने निधी संकलन करणाऱ्या एका कार्यक्रमासाठी मॅनेजरने त्याला छानशा रंगमंचावर संधी मिळवून दिली.

त्याने सुरुवात छान केली पण मग त्याने लोकांना राग येईल असे काही विनोद करायला सुरुवात केली. साहजिकच लोकांनी हुर्ये उडवली आणि त्याला तिथून जाण्यास भाग पाडले. जणू लोकांना आपला राग यावा म्हणून तो तसा वागला आणि त्याचा त्याला आनंदही वाटत होता. एकदा हॉलीवूडच्या मोठ्या पार्टीला मॅनेजरने विनीला बोलावले. त्यामुळे टी. व्ही.वरच्या कॉमेडी कार्यक्रमासाठी निवड करणाऱ्या व्यक्तींना त्याला भेटता आले असते. त्यांना पटवता आले असते, पण हे महाशय दारू पिऊन तिथे पोहोचले. त्याचे डोळे तारवटलेले होते आणि तोंडाला ओकारीचा असह्य भपकारा येत होता.

मी त्याला विचारले, ''तू कधीतरी स्वत:ला हे विचारलेस का की आपण आपल्या व्यावसायिक संधी मुद्दामूनच का उधळून लावतो?''

''मी नाही काही उधळून लावत. फक्त मी स्वत:ला विकू शकत नाही. एखाद्या पार्टीत जाऊन एखाद्या व्यक्तीची थुंकी झेलायची, मग ते तुमच्यावर उपकार करणार आणि नंतर तुमच्या उत्तम विनोदांवर तुम्हीच तलवार चालवायची, अगदी पुळचट विनोद सांगायचे. लोकांना आवडेल असे वागायचे.''

'लोकांना रुचणारे' यामध्ये वेळा पाळणे हादेखील एक भाग असतोच. विनीने त्या पाळणे हे त्याच्या दृष्टीने फायद्याचे होते, पण विनीचा दृष्टिकोन वेगळाच होता.

''माझे काम म्हणजे विनोद करणे, मैत्री करणे नाही. जर तुम्हांला मैत्री करणारी व्यक्ती हवी असेल तर ब्रेड-बटरवर खूश राहणाऱ्या एखाद्याला बोलवा. म्हणजे तुमचा हेतू साध्य होईल. अशा सपकपणासाठी काही पुरवठा लागला तर तो करीन मी.''

आपला व्यवसाय कसा धुळीला मिळवावा याचे तो मूर्तिमंत उदाहरण होता. आणि त्याहून वाईट गोष्ट ही होती की, जणू असे वागणे म्हणजे चांगले वागणे आहे अशी त्याला खातरी होती. मी मात्र हे सर्व थोतांड आहे हे समजून चुकलो.

''मला वाटते की तू आता काय करावयाचे आहे त्याचे चांगले नियोजन केले आहेस. मग तू असे कर, त्या मॅनेजरकडे जा आणि त्याला सांग की तुला त्याची गरज नाही. आता तू जिथे आहेस तिथेच तुला राहायचे आहे. स्वत:च्या तारखा क्लबमधे जाऊन तू ठरवू शकशील.'' मी माझ्या हातातले पॅड आणि पेन टेबलावर टाकले आणि माझ्या खुर्चीमधून उठलो. आपण जर आत्ताच थांबलो तर मी तुझ्याकडून पैसेसुद्धा घेणार नाही.''

विनीचे डोळे विस्फारले गेले; ''पण मला वाटले की आपण'' अडखळत तो बोलू लागला, त्याने क्षणभर डोळे मिटले, स्वत:ला सावरले आणि म्हणाला, ''नाही, तसे नाही. मला पुढे जायचे नाही असे नाही.''

''मग आता प्रामाणिकपणे सांग प्रत्येक वेळेस तू हे सगळ मुद्दाम उधळून का लावतोस?'' त्याने थोडा वेळ घेतला पण मग कबूल केले की त्याला असे दुसऱ्यावर अवलंबून असणे आवडत नाही. – मुलाखती, मग चाचणी अगदी आपल्या कामात मदत मिळावी म्हणून एखाद्याला फोन करणेसुद्धा जिवावर येते. या सगळ्यांत त्याला आपण सगळ्यांसमोर उघडे पडतो असे वाटत असे, म्हणून असे प्रसंग तो कटाक्षाने टाळत असे.

''इतरांकडून मदत घेण्यात काय वाईट आहे?'' मी त्याला विचारले. ''मला त्या गोष्टीचा राग येतो.'' गुरगुरत तो म्हणाला. मग परत काही प्रश्न विचारल्यावर त्याने त्याचे कारण सांगितले, ''मी जणू काही विदुषकाचे कपडे घालूनच जन्माला आलो होतो. सतत दुसऱ्यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी मी जोरजोरात बडबडत असे. माझ्या वडिलांकडे येणाऱ्या ग्राहकांवर माझे हे सारे प्रयोग चालत. त्यामुळे वडील भयंकर संतापत.''

''का?''

''ते त्यांचा व्यवसाय घराबाहेर करीत.''

"काय प्रकारचा व्यवसाय?"

"अहो प्रेतांना व्यवस्थित कपडे घालणे. सजवणे इ."

मला हसूच आले "विनी कमाल आहे. अरे थोडातरी गंभीर हो."

"अरे मी गंभीरपणेच सांगत आहे."

मी हळूच प्रतीक्षालयात चोरून जात असे आणि त्या लोकांसमोर माझा विनोदी कार्यक्रम करत असे. दररोज संध्याकाळी मला पट्ट्याने मार बसत असे. मी जर नर्व्हस झालो आणि रडायला लागलो तर, वडील मला 'परी' म्हणून चिडवत आणि आणखी झोडपून काढत." त्याचे डोळे भरून आले. "ते एक दु:स्वप्न होते."

यावरून लक्षात आले की का त्याला कुणाही पुढे असे लक्ष्य बनून जायला आवडत नसे. कारण कुणालाही स्वत:ची टिंगल करायची संधी देऊन आणखी दु:ख अनुभवणे त्याला कबूल नव्हते. या सगळ्याची फार मोठी किंमत त्याने मोजली होती. स्वत:च्या व्यावसायिक प्रगतीला स्वत:च खीळ घातली होती. तुम्ही कदाचित त्याच्यासारखा त्याग कधी केला नसेल. मात्र दु:ख टाळण्यासाठी काहीही तडजोडी केल्या नाहीत अशी व्यक्ती माझ्यातरी पाहण्यात नाही.

◆◆◆

ज्यांच्या जीवनात प्रेम कधीच आलेलं नाही,
त्यांच्यासाठी भक्तीचा मार्ग नाहीच.
त्यांच्यासाठी ध्यान, कर्म ठीक आहे,
पण भक्ती नाही.
कारण ध्यान हे प्रेमाशिवाय होऊ शकतं.
तुम्ही एकटे असता. दुसऱ्याशी काही संबंध नाही...
ध्यानासाठी योग्य आहे हे... पण भक्ती? नाही...
कारण भक्ती इतरांशी संबंधातूनच घडते...
ध्यान सगळ्यांशी संबंध तोडून होतं आणि
भक्ती सर्वांशी एकरूप होऊन होते...
दोन्हीही एकमेकांविरुद्ध पण परिणाम एकच...!


**-ओशो**

**नवं कोरं**

# अवनी एक नवी

लेखक
**एकहार्ट टोले**

अनुवाद
**नीलिमा जोशी**




**किंमत : २४०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

ज्या वाटेने जाताना जीवन अधिकाधिक प्रफुल्ल, प्रसन्न, प्रगल्भ होत जातं त्या अद्‍भुत वाटेने प्रवास करण्याची सिद्धता करू या.

सध्याच्या धावपळीच्या जगात आपण नको तितका विचार करतो; नको तेवढ्या गोष्टींच्या मागे धावतो आणि जगण्यातला निखळ आनंद हरवून बसतो. लोक आपल्याला काय म्हणतील? मित्र, कुटुंब आणि शेजारी यांच्या तुलनेत आपण कुठे - कसे आहोत? याचा विचार करतो आणि आत खोलवर कुठेतरी आपल्याला चिंता वाटते की, जसे आपण इतरांच्या दृष्टीत असायला हवे तसे आपण नाही आहोत की काय?

एकहार्ट टोले आपल्याला विश्वास देतात की भय, चिंता आणि सदैव 'हे हवं - ते हवं' म्हणणारी तृष्णा यातून मुक्त होणं सहज शक्य आहे. हे पुस्तक वाचताना तुम्ही स्वत:च्या जीवनाला घालून घेतलेल्या कृत्रिम मर्यादांमधून मोकळे व्हाल आणि प्रसन्नतेने, मुक्तपणे जीवन जगायला लागाल. आनंदाचा शोध घेणं सोडून द्या, मग तो तुम्हाला गवसेल; तुम्ही शब्दांत बांधू शकणार नाही अशा क्षणांत - अशा अनुभवांत! तुम्ही कोण आहात याचा शोध घ्या आणि प्रसन्न, प्रगल्भ जीवनाच्या वाटेवरचा प्रवास सुरू करा!

# तिनका तिनका तिहार



**वर्तिका नंदा**


कारागृहातीलकैद्यांना कला, संस्कृती, साहित्य आणि माध्यमांद्वारे प्रोत्साहित करून, सुधारण्याचे काम 'तिनका तिनका फाउंडेशन' ही सार्वजनिक धर्मादाय संस्था करते. वर्तिका नंदा या संस्थेच्या संस्थापक आहेत. भारतात प्रथमच कैद्यांसाठी पुरस्काराची संकल्पना मांडण्याचं श्रेय वर्तिका यांना देण्यात येते. त्यांनी पत्रकारितेत डॉक्टरेट मिळवली असून, दिल्ली विद्यापीठातीललेडी श्रीराम कॉलेजमधीलपत्रकारिता विभागाच्या त्या प्रमुख आहेत. 'तिनका तिनका तिहार' या महिला कैद्यांनी लिहिलेल्या आणि वर्तिका यांनी विमला मेहरा यांच्यासह संकलित केलेल्या पहिल्या कवितासंग्रहाची लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्‌समध्ये नोंद झाली आहे.



**विमला मेहरा**

विमला मेहरा या विशेष महिला पोलीस आयुक्त असून, दिल्ली पोलिसांच्या इतिहासात प्रथमच विशेष पोलीस आयुक्त (प्रशासन) या महत्त्वपूर्ण पदावर त्यांची नेमणूक झाली. विमला या १९७८च्या बॅचमधील अरुणाचल, गोवा, मिझोराम आणि केंद्रशासित प्रदेशांच्या (आयजीएसआयएस) अधिकारी आहेत. तिहार कारागृहात पद स्वीकारण्याआधी त्यांनी अरुणाचलप्रदेशात डीजीपी तसेच दिल्लीमध्ये विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या निभावल्या. महिला कैद्यांना परदेशी भाषा शिकवण्यासाठी त्या आग्रही राहिल्या. किरण बेदींनंतर दिल्लीच्या तिहार जेलचं कामकाज त्या तितक्याच समर्थपणे सांभाळत आहेत. तिहार कारागृहात सुधारणा करण्यासाठी अनेक कार्यक्रमांचे नियोजनही त्या करत आहेत.

लेखक
**वर्तिका नंदा**
**विमला मेहरा**




अनुवाद
**मंजिरी**
**धामणकर**

## *तुरुंगातील माहिला कैद्यांचा*
## *अनोखा कवितासंग्रह*

*या गजांआड एका छोट्याशा झरोक्यातून डोकावतात स्वप्नं. शहर जेव्हा निद्राधीन होतं तेव्हा तुरुंगात जाग असते. आसमंतात विहरणाऱ्या उद्याच्या सोनेरी आशेच्या कणिका या बंदिस्त भिंतींमध्येही कुठूनतरी जबरदस्तीनं आत शिरतात. इथे काळाची गती धीमी आहे... खुंटलेली, जडशीळ. घड्याळाचे काटेही जणू कुणाची तरी परवानगी घेऊनच टिकटिकतात. आजचा दिवस कालच्यासारखाच, उद्या काय होईल...कुणास ठाऊक!*

*जिथे सगळी नाती गळून पडतात, तिथे उगवतो एक अंकुर. शरीर शृंखलांनी बद्ध असतानाही मनात आशेचा किरण जागता*

## कोठडीचे गज

जाणता वा अजाणता, ना विचार ना अपेक्षा केली मी
या वैराण कोठडीची कल्पनाच नव्हती केली मी.
हसते खेळते माझे जग एक दिवस भयाकुल झाले
जेव्हा एका अनाहूत वेदनेने लेकीपासून मला दूर नेले
दुष्टांनी ना लेकीला दूध पाजू दिले ना औषध आईला
हाताला धरून मला फरपटत नेले भलत्याच एका रस्त्याला
ना शुद्ध होती त्या वेड्यावाकड्या वाटेची, ना सायरनच्या गाडीची
एका भयाण शून्यात हरपत होती गती माझ्या नाडीची
आर्त किंकाळी फुटली विदीर्ण झालेल्या हृदयातून
डोळे उघडले तेव्हा आयुष्यच निसटले होते हातातून
ना कुठे हास्याची लकेर, ना लेकीचे दर्शन
अंधारात चोहीकडे फक्त उसासे, आक्रंदन
आणि
गूढअज्ञाताने वेढलेले कोठडीचे हे निर्दय गज

◆◆◆

## स्वातंत्र्य

मी कधी त्या खुल्या हवेत
त्या ढगात त्या आकाशात
स्वच्छंद विहरू शकेन?
की आयुष्यभर अशीच इथेच
खितपत पडेन?
मनातल गूज कधी आपल्या माणसाला सांगू शकेन?
की मनीचं मनीच राहून जाईल?
कधी खुल्या आकाशाखाली मुक्त श्वास घेऊ शकेन?
की या चार भिंतींत सगळ्या इच्छा दबल्या जातील?
कधी माझ्या घरात, माझ्या माणसात जाऊ शकेन?
की असं लांबूनच त्यांना पाहून डोळे अश्रू ढाळत राहतील?

◆◆◆

## *आस*

आस आहे मला माझ्या आयुष्याची
आनंदाच्या नजराण्याची
कारण खूप काळ घालवला मी या गजाआड
मात्र या काळात खरीखुरी ओळख पटली माणसांची
आपल्या, परक्या– सगळ्याच.
उगवतीकडून नव्हे मावळतीकडून
उगवणार आहे आशेचा सूर्य
येणार आहे माझ्यापाशी
त्याच्या प्रभेने तेजाळेल माझे जीवन
संपणार आहे तिळातिळाने कंठलेला
प्रतीक्षेचा काळ
फुलांचं नातं असतं काट्यांशी
काट्याशिवाय फूल ते काय!
ते मिळवायला लोक जखमा झेलतात
मग कुठे सुखद शय्या सजवतात
तरीसुद्धा फुलं त्यांच्या आश्रयाला जातात
आणि काट्यांशी नातं तोडून टाकतात
आपलं आयुष्य असंच महान बनवत जातात.

◆◆◆

## *जेव्हा आला मृत्यू*

जेव्हा आला मृत्यू मला न्यायला
घाबरून मला सोडून गेला
म्हणूनच एकाकीपणा येऊन
या भिंतींशी पाश बांधून गेला.
स्वतःसाठी काही मागितलं नाही
इतरांसाठीच जगत राहिले,
म्हणूनच प्रत्येक संधिकाल
प्रभातकिरणांशी माझं मन जोडून गेला

फुलदाणीत सजून मिरवणं
मला कधीच जमलं नाही,
म्हणूनच हसण्याचा प्रत्येक रंग
माझ्या ओठांशी एकरूप होऊन गेला.
दगडधोंड्यांतूनच चालत राहिले
पण स्वतः दगड झाले नाही,
इतक्या जखमा झेलल्या की
जगले नाही, झोपू शकले नाही
आपटले मी
जेव्हा जेव्हा हसण्याची इच्छा झाली.

◆◆◆


## *जीवनपथ*

बा यात्रिका, भिऊ नको वाट खडतर असली तरी
सत्याची मशाल जागती ठेव दुनिया खोटी असली तरी
दुःखातही हसत राहा, हेच मर्म जीवनाचं
कोणी काय केलं, दिलं, सोयरसुतक नको त्याचं
वाटेत भरपूर दगडधोंडे, निसरडा नदीकाठ
तरी धीराने चालत राहा- कणा, मान ठेवून ताठ
या मायावी जगात, कशाला गाठी बांधायच्या!
सगळ्या नात्यांत फसवणूक, किती कहाण्या सांगायच्या!
त्यात गुंतून यात्रिका अधीर होऊ नकोस
ध्येय खूप दूर म्हणून उदास होऊ नकोस
रोज नव्या जोमाने वाट तुडवायची आहे
उत्साह आवेशाची मशागत करायची आहे
एक दिवस नक्की हसऱ्या मुक्कामी पोचशील
विजयपताका फडकावूनच मग विश्राम घेशील.

◆◆◆

**नवं कोरं**

# प्रेमकथा




लेखक
**ॲनी झैदी**

अनुवाद
**मुग्धा शुक्रे**

**किंमत : ३२०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

लवकरच हे सगळं संपेल. हे सगळं इतक्या लवकर होईल, असा विचार तिने कधीच केला नव्हता. हा नाही तरी दुसरा नेहमी तिच्या मनात यायचा. रात्री तो उशिरा घरी आला. त्याच्या चेहऱ्यावरचं हसू – खोटं-खोटं हसणं. वास्तवात ते नाहीच आहे. असं झालं तर काय होईल? किंवा त्याच्या मीटिंग्ज खूप उशिरापर्यंत लांबू लागल्या आहेत किंवा तिला टाळण्यासाठी तो बाल्कनीत जाऊन फोनवर बोलू लागला आहे. किंवा तिने शहराबाहेरच्या टेकडीवर एक काचेच्या भिंती असलेलं घर बांधलं आणि तिथल्या बेडरूमला लावायच्या पडद्यांचा पोत कसा असेल याबद्दल ती अखंड बोलत असताना तो तिच्यावर खेकसला आणि त्याने त्या घराचा चक्काचूर केला, तर? तर, ती काय करेल?

लांबच्या लांब दुपारी ती एकटी पडलेली असायची तेव्हा, जेव्हा ती बेडशीट्स बदलायची, कव्हर्स घड्या घालून ठेवायची तेव्हा, किंवा टीव्हीवरची धूळ झटकायची, लायब्ररीतून डीव्हीडी घेऊन यायची तेव्हा... तिने या सगळ्या शक्यतांचा विचार केला होता; पण अशा रेंगाळत राहणाऱ्या, सत्यानाश करू शकणाऱ्या पर्यायाचा तिने कधीच विचार केला नव्हता.


# पुस्तक परिचय

# माय डॉटर माय मदर



ॲनी मरे यांचा जन्म बर्कशायरमध्ये झाला. १९८३मध्ये ॲनी यांनी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीतून पदवी संपादन केली. त्यांनी पत्रकारिता केली आणि नर्स म्हणूनही काम केलं.
बऱ्याच मासिकांमधून त्यांच्या लघुकथा प्रसिद्ध झाल्या. १९९१मध्ये एका टीव्ही वाहिनीच्या लघुकथा स्पर्धेत त्या विजयी ठरल्या. 'बर्मिंगहॅम'वर लिहिलेल्या त्यांच्या कादंबऱ्यांमधील पहिली कादंबरी 'बर्मिंगहॅम रोज' १९५५मध्ये प्रकाशित झाली आणि 'टाइम्स'च्या सर्वोत्कृष्ट खपाच्या यादीत प्रथम क्रमांकावर आली. त्यानंतर त्यांनी अनेक कादंबऱ्या लिहिल्या, ज्या यशस्वी ठरल्या. जसे, 'ए हॉपस्कॉच समर,' 'सोल्जर गर्ल' इ. 'चॉकलेट गर्ल्स' आणि 'वॉर बेबीज' या त्यांच्या बेस्टसेलर ठरलेल्या आणखी दोन कादंबऱ्या.
'नाऊ द वॉर इज ओव्हर' हे ॲनी यांचं विसावं पुस्तक.
त्यांना चार मुले आहेत. त्या रीडिंग येथे राहतात.

लेखक
**ॲनी मरे**




अनुवाद
**रमा नाडगौडा**

***स्वत:च घडवलेल्या लेकीकडून आयुष्याचे धडेघेणाऱ्या आईची सुंदर गोष्ट***

*१९८४ साली एका शिशु खेळगटात दोन आया एकमेकींना भेटतात. त्यांची मैत्री वाढत जाते आणि त्या आपलं आयुष्य एकमेकींसोबत वाटून घेतात– अगदी सगळ्या रहस्यांसकट. जोआन – गोड, लाजरी मुलगी जिला दिवसेंदिवस स्वत:च्या नवऱ्याची भीती वाटते आहे. तिने ज्याच्यावर प्रेम करून लग्न केलं तो देखणा, हसतमुख तरुण हिंसक, विरोधात जाणारा का होतो आहे; हे तिला उमजेनासं झालं होतं. हे इतर कुणालाही सांगायची तिला लाज वाटत होती. जोआनची आई – मार्गारिट –हिला अचानक हॉस्पिटलमध्ये न्यावं लागलं. तेव्हा प्रथमच त्यांच्या संपूर्ण कुटुंबाला हे कळलं की, आपल्या आईच्या आयुष्यात असं बरंच काही घडून गेलंय, ज्याची आपल्याला सुतराम कल्पना नाही. मार्गारिटला युद्धकाळात सुरक्षित ठिकाणी हलवलं गेलं होतं आणि तिने आपलं उभं आयुष्य त्या आठवणी गाडून टाकण्यात घालवलं. ही गोष्ट आहे दोन अस्वस्थ, तरुण मुलींची ज्यांना अपघातानेच आपापल्या आयांच्या आयुष्यातील हृदयद्रावक सत्यं समजतात. आई मुलीला कसं घडवते आणि मुलीकडून जगणं कसं शिकते, याची सुंदर गोष्ट! भूतकाळात अडकलेल्या आया आणि वर्तमानाला आव्हान देऊन भविष्य घडवू पाहणाऱ्या त्यांच्या तरुण मुलींची कहाणी!*

अंगाभोवती ठिगळांची गोधडी गुंडाळून घेऊन, गुडघ्याला मिठी मारून

मार्गारिट बसली होती. लाकडी टेबलाचे टणक पाय तिच्या पाठीत रुतत होते.

बाहेर गडद अंधार आणि जीवघेणी थंडी पसरली होती. सूर्यास्ताच्या आधीच जमीन गोठून गेली होती. दिवसभर प्रखर उन्हात अंगावर चमकत्या बर्फाची झूल घेऊन झाडं स्तब्ध होती. पण आता रात्र झाली होती. मार्गारिटसमोर सकाळ उजाडण्यापर्यंत गोठवणारा अनंत अंधार पसरला होता.

तिनं स्वत:चं कपाळ गुडघ्यांवर दाबलं. तिचे दात थडथड वाजत होते. अंग थरथर कापत होतं. तिच्या घशातून अस्फुट आवाज निघत होते– रडव्या हुंदक्यांसारखे, जे कुणालाही ऐकू येत नव्हते, तिच्याशिवाय... 'मॉम–मर्रर... मर... मर... मॉमीऽऽऽ... ईइर...'

जेव्हा मार्गारिटनं अर्नेस्टच्या खोलीत जाण्याचं धाडस पहिल्यांदा दाखवलं होतं नि शिक्षा म्हणून नोरा पेजनं तिला या अंधाऱ्या अडगळीच्या खोलीत फेकून दिलं होतं, तेव्हा हिवाळा इतका कडक नव्हता. त्या बाईनं तिला केसांना धरून फरफटत, खेचत आणि शिव्यागाळ करत, किंचाळत तिला ओढत आणलं होतं; तेव्हा अजून दुपार होती. बाहेरून किल्ली फिरवून दार बंद केल्याचा आवाज येताच मार्गारिट त्या मळक्या खोलीत गर्रकन वळून मागे पाहू लागली.

''तू इथेच राहायचं आहेस आणि कशालाही हात लावायचा नाहीस.'' तिचा खरखरीत आवाज लाकडी भिंतींमधून आत घुसला. मार्गारिटला ती निघून जाण्याचा आवाज आला.

ती छान उन्हावलेली दुपार होती आणि तिला फारशी भीतीही वाटली नव्हती; अजून तरी नाही. खरं सांगायचं तर तिला कुतूहलच जास्त वाटलं होतं. ती या अडगळीच्या खोलीत याआधी कधी आली नव्हती. तिनं मिसेस पेजना इथून बागकामासाठी खोरं, फावडं आणून बाहेर ढकलगाडी जवळ आणून उभी करत असताना पाहिलं होतं. मार्गारिट एकदा एकटीच बाहेर असताना तिथं खिडकीतून डोकावून पाहण्याचा प्रयत्न केला होता. पण तिला जमलं नाही, कारण खिडकीची उंची जास्त होती. आता मात्र ती नीट पाहू शकत होती. खिडकीपाशी लोंबणारी जळमटं पाहून तिच्या अंगावर शहारे आले. त्यांतल्या एकात तिला हालचाल जाणवली. मग तिनं स्वत:ची नजर घाईघाईनं दुसरीकडे वळवली.

मागच्या भिंतीपाशी सगळ्यात अंधाऱ्या कोपऱ्यात काही फळ्या वाकड्यातिकड्या उभ्या केल्या होत्या. काही कुजके-गंजके पत्र्याचे डबे होते. दाराजवळ बागकामाची सगळी हत्यारं, ढकलगाडी वगैरे उभी केली होती.

त्यांच्याशेजारी भिंतीला टेकून एक पुरुषी सायकल होती. जड, काळी, गंजकी साखळी... हँडल व दांडे गंजलेले. लाकडी टेबलापलीकडे या खोलीतली सगळ्यात मजेची गोष्ट होती. समोरच्या खिडकीजवळ भिंतीवर बरीच हत्यारं बसवलेली होती. करवत, हातोडी, धारयंत्र–असं बरंच काही–सगळंच गंजून मातकट रंगाचं झालेलं नि जळमटांनी भरलेलं. टेबलाच्या एका टोकाला एक यंत्र बसवलं होतं. तिनं बराच काळ त्याचा दांडा गरगर फिरवून ते यंत्र घट्ट, सैल करण्यात वेळ घालवला.

मग तिला एक पत्र्याची बादली मिळाली. तिनं ती उलटी केली. त्याच्यावर उभं राहून तिला टेबलावरचं सगळं व्यवस्थित दिसू लागलं. त्यावर अजून हत्यारं होती आणि सेंट ज्युलियन तंबाखूचे बरेचसे डबे. त्यांतला एक उचलून हलवल्यावर आतून आश्वासक आवाज आले. ते हलवण्यात तिनं बराच वेळ घालवला. वेगवेगळे आवाज काढून पाहिले, जणू काही ते गंज लागून घट्ट बसले होते. ते उघडणं कठीण होतं आणि तिला सगळ्यांची झाकणं काढता आली नाहीत. जे उघडलं त्यात खिळे, स्क्रू असा बराच निरनिराळ्या आकाराचा माल निघाला. तिनं त्यातले काही काढून जमिनीवर खेळण्यासाठी ओतले.

लवकरच हे सगळे उद्योग करून तिचं मन भरलं आणि ती एकटक नजर खिळवून बसली. सूर्य बुडाला आणि तरीही कुणीही आलं नाही.

मार्गारिटच्या ओटीपोटात कळ आली. मग तिनं बादलीत पोट मोकळं केलं नि ती बादली लांब नेऊन ठेवली. टेबलाच्या पायाला टेकून ती मातीच्या जमिनीवर बसली. तिच्या मनात एकटेपणाची एक असह्य लाट आली आणि नि तिनं रडायला सुरुवात केली. गुडघ्यावर गाल टेकून ती हुंदके देऊ लागली. हळूहळू तेही ओसरले. तरीही कुणीही आलं नाही.

अंधार दाटू लागला, सोबत तिची भीतीही. खिडकीतून झिरपणारा थोडासा चंद्रप्रकाश– इतकाच उजेड होता तिथं. इवल्याशा चंद्रकोरीचा मंद प्रकाश. तिच्या आजूबाजूला खसपसण्याचे आवाज येत होते. तिला माहीत होतं, ते कोळी अन् उंदीर आहेत ते. तिच्या अंगावर थंडीनं, भीतीनं काटे उभे राहिले. किती मोठे असतील ते? तिच्या मनात त्यांचा आकार वाढत वाढत गेला. घशात एक कोंडलेली, घुसमटलेली किंकाळी दाबून ती दगडासारखी निश्चल बसून राहिली.

उजेड आला. बागेतून वर-खाली होत पुढे पुढे येत राहिला. किल्ली फिरली. हातातल्या हरिकेन कंदिलाच्या उजेडात नोरा पेजचा चेहरा अंधार-

उजेडाच्या विचित्र तुकड्यांनी भरल्यासारखा दिसत होता. तिनं तिच्या अंगावर ती ठिगळांची गोधडी भिरकावली. मार्गरिटला ती अंगावरून घसरत गेल्याची जाणीव झाली.

''मी तुझं जेवण सीमसला दिलं आहे. मला व अर्नेस्टला तुला आज जेवायला देणं योग्य वाटत नाही आणि तू इथेच राहणार आहेस. आम्हाला वाटतंय, तुला चांगली शिक्षा व्हायला हवी.''

''मला आत यायचं आहे... मला इथे ठेवू नका ना...!'' मार्गरिटनं अक्षरश: भीक मागितली, पण दरवाजा त्याआधीच बंद होत होता.

क्षणभर ती भीतीनं अन् अविश्वासानं थिजलीच. प्रत्येक आवाज तिच्या उरात धडकी भरवत होता. वर छपरावर काही तरी घसपटत होतं. उंदीर, पक्षी किंवा आणि काही तरी भयानक– याची तिला कल्पना नव्हती. थंडी काही बर्फाळ किंवा गोठण्याइतकी नव्हती, पण बऱ्यापैकी गार होतं.

थोड्या वेळानं तिनं ती गोधडी अंगाभोवती गुंडाळून घेतली. हातावर डोकं ठेवून आडवी झाली. जमीन खूपच गार आणि कडक होती. रात्रभर तिला तहानेनं अधून मधून जाग यायची, परत झोप लागायची. शेवटी एकदाचा सूर्य उगवला.

नोरा पेज भल्या पहाटे तिच्या मळक्या कपड्यांत आली. मार्गरिटला त्या खारट पातळ पेजेची तुटपुंजी न्याहारी दिली आणि मिस कूपर यायच्या आत ती तयार होईल इकडं लक्ष दिलं.

''तू जर कुणाला तुझ्या शिक्षेविषयी सांगितलंस ना, तर खबरदार! तुला दररोज रात्री इथेच झोपायला लागेल; कळलं का? अजिबात कुठल्याही शिक्षिकेकडे चुगली करायची नाही– एकही शब्द नाही. नाही तर कुठं झोपावं लागेल, ते लक्षात ठेव.''

त्या दिवशी व्हिकारेजच्या त्या उबदार खोलीत असणं, हे इतकं मोठं सुख होतं की, मार्गरिट बसल्या ठिकाणी पुढे झुकली. हातावर डोकं ठेवून ताबडतोब गाढझोपी गेली. तिला कुणीही उठवलं नाही.

याआधी तिला अडगळीच्या खोलीत रात्रभर दोनदा हाकललं गेलं होतं. आजची वर्षातली सगळ्यात थंडगार रात्र होती. आजकाल नोरा पेज तिला कुठल्याही क्षुल्लक कारणावरून शिक्षा करायला अधीर असायची. खाताना बशी उचलून तोंडाजवळ न्यायची, कारण मार्गरिटला शेवटचा थेंबही चाटून-पुसून खायचा असायचा– नाइलाजानं. हा एक गुन्हा होता आणि त्या तशाही मार्गरिटला दिवसेंदिवस कमी खायला देऊ लागल्या होत्या. तिच्या पोटात

**नवं कोरं**


लेखक

**क्रिस्टीन किंबल**

अनुवाद

**मेधा मराठे**

# मातीचे मम अवघे जीवन




**किंमत : २८०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

क्रिस्टीन किंबल एका तरुण, तडफदार शेतकरी मार्क याची मुलाखत घेण्यासाठी न्यूयॉर्कहून गेली तेव्हा तिचं जगच बदललं. एका अंत:प्रेरणेनं तिनं आपलं शहरी आयुष्य सोडलं आणि लेक चॅम्पलेन जवळ त्याच्याबरोबर पाचशे एकरमध्ये नवीन शेत वसवायला सुरुवात केली. 'द डर्टी लाइफ' मध्ये या जोडप्यानं उत्तर प्रदेशातील अति थंड हिवाळ्यापासून सुगीच्या हंगामातील कोठारातल्या पोटमाळ्यावरच्या लग्नापर्यंत कसे दिवस घालवले याचा साद्यंत वृत्तान्त सांगितला आहे.

क्रिस्टीन आणि मार्कची प्रत्येक गोष्ट उत्पादित करून समाजाला परिपूर्ण आहार द्यायची कल्पना ध्येयवादी व रोमांचकारी होती आणि ती यशस्वी झाली. प्रत्येक शुक्रवारी संध्याकाळी, वर्षभर शंभराच्या वर माणसं एसेक्स फार्मवर जाऊन त्यांच्या परिपूर्ण आहारातला आठवडी सहभाग आणतात - बीफ, पोर्क, कोंबड्या, दूध, अंडी, मेपलचा पाक, धान्यं, पिठं, वाळविलेला घेवडा, सुगंधी वनस्पती, फळं आणि चाळीस वेगवेगळ्या भाज्या -हे सर्व शेतावर पिकतं. या डर्टी लाइफ - मातीतल्या आयुष्यात क्रिस्टीनला शारीरिक कष्ट करण्यातला आनंद गवसतो. चांगल्या आयुष्याचा केंद्रबिंदू चांगलं अन्न आहे हे तिला समजतं. ती त्याच्या प्रेमात पडते. शेवटी त्या माणसाशी, त्या लहान गावाशी आणि त्या सुंदर जमिनीशी एकनिष्ठ आणि प्रामाणिक राहण्यात धन्यता मानते.

भुकेनं सतत कुरतडत असायचं.

मिस कूपर आजकाल तिला वारंवार हेच विचारत असायच्या, ''तुला बरं वाटतंय ना मार्गरिट?'' आणि त्यांच्या यजमानीण बाई. त्या पक्ष्यासारख्या दिसणाऱ्या प्रेमळ मिसेस बोडली फिशरसुद्धा काळजी दाखवायच्या.

''ही मुलगी तिथं काही बऱ्या अवस्थेत दिसत नाही; नाही का?'' मार्गरिटनं त्यांना मिस कूपरशी बोलताना ऐकलं. ''गरीब बिचारी मुलगी एरवीसुद्धा अशीच असते का?''

''मला नाही वाटत... पण मला खात्रीने नाही सांगता येत.'' मिस कूपरने उत्तर दिलं, ''ती मिस पीटर्सच्या ताब्यात होती ना. मला वाटतं, तिच्याकडे लक्ष ठेवावं लागेल.''

मार्गरिट शाळेच्या पूर्ण वेळात गुंगीतच असायची. तिला असं दूरस्थ असल्यासारखं वाटायचं, जणू काही ती तिथं नाहीच आहे. कशातही भाग घेण्याचे तिच्या अंगात त्राण नसायचं. मिसेस बोडली फिशर अगदी ग्रामोफोन उघडून त्यांच्या जुन्यापान्या ७८ रेकॉर्ड्समधून मार्गरिटचं एखादं आवडतं गाणं लावायच्या, तेव्हासुद्धा तिला जागं राहणं मुश्कील व्हायचं.

आणि नेहमीप्रमाणे आजही तिच्या अंगावर तो बर्फाळ अंधार कोसळला. ती मणामणाच्या ओझ्यानं दबून जावी इतका तो अंधार बोजड होता आणि या वेळी तिचं नेमकं काय चुकलं होतं, तेसुद्धा तिला आठवेना. त्या दिवशी आधीच दिवसभर तिचा घसा दुखत होता. डोकं दुखत होतं. आपण नेमके कुठे आहोत, हे कळण्याच्या स्थितीतही ती नव्हती. ती भीती वाटण्याच्या पलीकडे गेली होती.

नेहमीप्रमाणे तिनं स्वत:ला जमेल तितकं घट्ट गुंडाळून घेतलं, कारण ती तापानं फणफणत होती. तिचा घसा बंद झाल्यासारखा वाटत होता. जणू काही कुणी तरी तो हातानं आवळून धरला असावा. रात्र अगदी शांत होती. सगळे आवाज करणारे प्राणी कुठल्या कुठल्या सांदीकोपऱ्यात जागा शोधून पडून राहिले होते आणि त्या भयंकर गोठवणाऱ्या गारव्यात मार्गरिटला फक्त स्वत:च्या कानात स्वत:च्याच उतरणाऱ्या रक्ताचा आवाज ऐकू येत होता.

पूर्ण रात्रभर ती तापानं फणफणत-थरथरत होती. गोठलेल्या मातीचा पाठीला, ढुंगणाला, खांद्याला टोचणाऱ्या स्पर्शानं तिला अर्धवट जाग यायची. मग तापानं पुन्हा ग्लानी यायची.

बाहेर सगळं काही गोठून गेलं होतं. पाण्याचे साठे, तळी, गवत आणि झाडं. सकाळपर्यंत मार्गरिट बेशुद्ध झाली होती.

त्या भयंकर बाईच्या– मिसेस नोरा पेजच्या डोक्यात त्या सकाळी नेमकं काय चाललं असावं? नेहमीप्रमाणे मिस कूपर सकाळी मार्गारिटला घ्यायला आल्या अन् तो घाणेरडा-मळका चॉकलेटी ड्रेस अवतरला.

''ती छोटी मुलगी इथे नाहीये... मला भीती वाटतेय.'' आपल्या डोळ्यांची ती सुप्रसिद्ध फडफड करत त्यांनी सांगितलं.

मिस कूपरनं जरा वैतागूनच याचा अर्थ काय, असं त्यांना विचारलं.

''ती आता आमच्याबरोबर राहत नाही.''

यावेळेतो मिस कूपरचे हृदय आत्यंतिक भीतीनं नि काळजीनं थडथडायला लागलं असावं.

''कुठाय ती? मला पाहू दे.''

''सॉरी, ते शक्य नाही.'' नोरा पेज म्हणाल्या, ''ती या घरात नाही आता.''

''मूर्खासारखं बोलू नका. तुम्ही काय केलंत तिचं?'' लाल केसवाल्या मिस कूपरचा संताप उफाळून येऊ लागला. ''माझ्या वाटेतून बाजूला व्हा. मला माझ्या विद्यार्थिनीला पाहायचंच आहे.''

त्यांनी नोरा पेजचा भक्कम देह बाजूला सारला आणि त्या मोकळ्या दिवाणखान्यात प्रवेश केला. मागंही मार्गारिटचा मागमूस नव्हता.

''ठीक आहे,'' मिस कूपरनं ठणकावून विचारलं, ''आत्ताच्या आत्ता मला सांगा– ती कुठे आहे ते, नाही तर मी अख्खं घर तपासीन.''

''वर जाऊ नका.'' नोरा पेज पायऱ्यांचा मार्ग अडवत तिच्यावर खेकसल्या. ''ती तिथं वर नाहीये– मी सांगतेय ना तुम्हाला. तुम्ही माझ्या व्यक्तिगत बाबींवर गदा आणू शकत नाही.''

आत्ताच्या क्षणी त्यांचा चेहरा पाहताच मिस कूपरची खात्रीच पटली की, या बाईला वेड लागलं असावं. पण त्यामुळेच त्यांचा निर्धार आणखीच पक्का झाला. त्या आणखी जवळ गेल्या. मिसेस पेजच्या अंगाला कांद्याचा भपकारा येत होता.

''मला आत्ताच्या आत्ता सांगा, ती कुठे आहे ते.''

त्या बाईनं डोळ्यांची फडफड केली. ''तिथं बाहेर... मागं.''

काही क्षणांतच अर्धवट शुद्धीत असलेली मार्गारिट मिस कूपरच्या खांद्यावर होती. संतापलेल्या शिक्षिकेनं नोरा पेजला सांगितलं, ''मी तुम्हाला पोलिसांच्या ताब्यात देणारच!''

व्हिकारेजमधल्या मऊ गादीवर खास तिच्यासाठी बनवलेल्या छोट्याशा

पलंगावर मार्गारिटला सुरक्षित आणि आरामदायक वाटत होतं. तरीही बरं व्हायला तिला काही आठवडे लागले. बोडली फिशरकडे याआधीच तीन तशीच मुलं होती. पण ख्रिसमसपर्यंत त्यांनी मार्गारिटला बरं वाटेल अशा रीतीनं सांभाळली. पोलिसांकडे मिसेस नोरा पेजविरुद्ध तक्रार करण्यात आली. त्यांना पाच पौंड इतका दंड झाला. नंतर त्यांना तिथल्याच वेड्याच्या इस्पितळात भरती केलं गेलं.

मार्गारिटला ख्रिसमसचे दिवस अचंबित करून गेले. ती अजूनही खूप अशक्त  होती. ती सजवलेल्या झाडांकडे पाहायची. इतर मुलांसोबत तिला चर्चमध्येसुद्धा जाता आलं. पाळणे पाहता आले. कॅरोल्स ऐकता आल्या. तिनं आजवर पाहिलेलं हे सगळ्यात सुंदर दृश्य होतं. मिसेस बोडली फिशर खूप प्रेमळ आणि काळजी करणाऱ्या होत्या. छान चमकते निळे डोळे होते त्यांचे. तिला भरपूर दूध प्यायला द्यायच्या. त्यांनी तिला ख्रिसमसची भेट म्हणून घरी तयार केलेलं टेडी बेअर दिलं. ते चॉकलेटी रंगाच्या फेल्टच्या कापडाचं बनवलेलं होतं. त्याला लाल स्कार्फ गुंडाळला होता. मार्गारिटला तो पाहताक्षणीच खूप आवडला. तिनं त्याचं नाव टॉमी ठेवलं. जेव्हा तिनं मिसेस बोडली फिशरना सांगितलं की, तिच्या भावाचं नाव टॉमी आहे आणि आता तो कुठे आहे हे तिला ठाऊक नाही; तेव्हा मि. बोडली फिशरनं चौकशी करायला सुरुवात केली. ते गोल चेहऱ्याचे हसरे गृहस्थ होते. त्यांना टॉमी एका दूरच्या शेतावर सापडला. तो म्हणाला की, तो आहे तिथं खूप खूश आहे आणि एक दिवस तो आपल्या बहिणीला भेटायला नक्की येईल. मार्गारिटला याचा प्रचंड आनंद झाला.

मग मार्गारिटला सांगण्यात आलं की, तिच्यासाठी दुसरं घर शोधण्यात आलं आहे. पाच मैलांवरच्या बकले नावाच्या गावात नववर्षानंतर लगेच तिला न्यायला एक घोडागाडी आली. तिला छानपैकी गुंडाळून घेऊन गाडी सकाळच्या गारव्यातून निघाली. ज्या दोन बहिणी तिला ठेवून घेणार होत्या, त्यांच्याकडे आणखी दोन मुलं होती. चेहऱ्यावर बसणारे गार वाऱ्याचे बोचरे झोत रस्ताभर सोसत मार्गारिट जेव्हा तिथं पोहोचली, तेव्हा ऑर्चर्ड हाऊसच्या सुंदर उबदार दिवाणखान्यात केलेला प्रथम प्रवेश तिला अजूनही आठवतो. त्या दिवशी तिनं जणू स्वर्गात प्रवेश केला!

◆◆◆

**नवं कोरं**

# आंधळ्या बाईचे वंशज

लेखक
**अनीस सलीम**

अनुवाद
**श्यामल चितळे**




**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

अमर हम्साचा जन्म एकमेकांशी अबोला धरलेल्या आणि कायम युद्धाच्या पवित्र्यात असणाऱ्या पालकांच्या पोटी झाला. 'बंगला' या नावानं ओळखल्या जाणाऱ्या, एका मोडकळीला आलेल्या घरात तो वाढला. आपलं आयुष्य दुर्घटना आणि बदनामी यांनी भरलेलं असणार, असं त्याला नेहमी वाटायचं आणि त्याच्या मनात येणाऱ्या उदास कल्पना खऱ्याच ठरल्या. त्याच्या आयुष्यात एकापाठोपाठ एक दुर्घटना होतच राहिल्या. सव्विसाव्या वर्षी तो कल्पनेतल्या श्रोत्यांना आपली कहाणी ऐकवायचं ठरवतो आणि बंगल्यातल्या प्रत्येक कपाटातून बाहेर येऊन भुतं नाचायला लागतात. 'द ब्लाईंड लेडिज डिसेंडंट्स ' (आंधळ्या बाईचे वंशज) ही एका कुटुंबाची गुंतवून टाकणारी कथा आहे. त्यात एका भारतीय मुस्लिम कुटुंबाच्या रोजच्या आयुष्यातली धडपड, भीती आणि महत्त्वाकांक्षा रंगवल्या आहेत. तसंच कुटुंबाचं पूर्ण अध:पतनही वर्णन केलं आहे.

# प्रासंगिक

(५ जून पर्यावरण दिनानिमित्त)

# नागझिरा

महाबळेश्वरच्या जंगलासारखे हे जंगल सदा हिरवे राहणारे नव्हते, पानगळीचे होते. मार्चपासून पानगळीला सुरुवात झालेली होती. निष्पर्ण वृक्षांचे सांगाडे जिकडे तिकडे दिसत. एकशेबत्तीस चौरस किलोमीटरच्या ह्या जंगलात आता इतरत्र पाणी कुठे नव्हते. ओहळ-नाले सुकून गेले होते. जंगलातील सारी प्राणिसृष्टी तळ्याच्या भोवताली चार-दोन किलोमीटरच्या परिसरात गोळा झालेली होती. तहानेने व्याकूळ झालेले पक्षी आणि वन्य प्राणी ज्या वेगाने पाण्यावर येऊन पडत; तो वेग पाहिला, म्हणजे पाण्याला 'जीवन' का म्हणतात, हे कळत असे.

जंगलातून ज्या लहान-लहान वाटा पाण्यावर येत होत्या, त्या न्याहाळत सकाळी मी जेव्हा हिंडे; तेव्हा वाटेकडेच्या झुडपांच्या छड्यांना फेसाचे फुगे आढळत. तहानेल्या गव्यांनी तोंडाला आलेला फेस इथे पुसला आहे हे मला, फेसाचा फुगा ज्या उंचीवर लटकलेला असे, त्यावरून कळे. डुकराच्या एकांड्या नराचे चिखलात माखलेले अंग कोणत्या झाडाच्या बुंध्याला लागले आहे. सांबराने आपली शिंगे कुठे घासली आहेत. तो रात्री कुठे बसला होता; त्याच्या खाणाखुणा पाहत मी माझा प्रभातसमय घालवीत असे आणि सूर्यदेवाला उगावण्याच्या काळी मदत करता आली नाही, तरी तो क्षितिजावर दिसू लागण्याच्या वेळी तिथे मी हजर असे.

हिंडून-हिंडून दमलो म्हणजे, वानरे जेव्हा कोवळी पालवी न्याहारीला खात असत; तेव्हाच मीही एखाद्या फुललेल्या पिवळ्यारंजन बहाव्याखाली बसून, खिशातून आणलेला मूठभर सुका मेवा किंवा क्रीमक्रॅकर बिस्किटे आणि चीजचा तुकडा यांची न्याहारी उरकीत असे.

तळ्यापलीकडे, डोंगराच्या उतारावर जी वृक्षराजी होती; तिच्यात

काळ्या डोक्याचे पिवळे हळदुले पक्षी पुष्कळ होते. पिवळ्यारंजन रंगाची ही पाखरे जेव्हा ह्या वृक्षावरून त्या वृक्षावर भरारत, तेव्हा पिवळ्या शाल्मलीच्या फुलांनाच पंख फुटले आहेत, असे वाटे.

बांधाच्या उतरत्या बाजूवर दोन ज्येष्ठ असे उंबर होते. त्यांचे शीर्ष पाहताना मला माझी टोपी काढून हातात घ्यावी लागे. उंबराच्या माथ्यावर हरोळ्यांची वस्ती आहे. ह्याचा पत्ता मला लागला नव्हता; पण एकवार भल्या सकाळी मी गेलो, तेव्हा 'फडर्र' असा त्यांच्या पंखांचा ओळखीचा आवाज आला. हरोळ्यांच्या बळकट पंखांचा आवाज त्यांच्या वेगळेपणामुळे तत्काळ कळून येतो. अशा बेसुमार उन्हाळ्यात, झाडेझुडपे निष्पर्ण झाली असताना ही पाखरे कुठली बरे फळे खाऊन आपले बळकट पंख उडते ठेवीत असतील?

सूर्य बुडाला आणि काळोखी पसरली, म्हणजे तळ्याच्या आसमंतात अनेक घडामोडी होत. केवळ आवाजावरून त्यांचा अन्वयार्थ लावावा लागे. रानकुत्री मागे लागल्यामुळे कधी चितळाची लेकुरवाळी मादी मोठमोठ्याने कुकारे देई. कधी सांबर फुफाटे, तर ऐकताच थरकाप व्हावा, असे मदमस्त आवाज चितळाचे पुष्ट नरवारंवार काढीत.

माझ्या खोलीच्या व्हरांड्यात वाकड्या सळईला टांगलेल्या कंदिलाचा मंद उजेड असे आणि समोरच्या हिरवळीवर खाटले टाकून मी झोपलेला असे. रोज सकाळ-संध्याकाळ बेहिशेबी पायपीट केल्यामुळे माझ्या डोळ्यांवर झापड येई.

पाच मे रोजी रात्री साडेदहा वाजता तिरोडा रस्त्याच्या अलीकडे तळ्याला लागून जो जंगलाचा त्रिकोणी तुकडा होता, जिथे मी तो वैभवहीन होऊन उभा राहिलेला भव्य शाल्मली पाहिला होता; त्या दिशेकडून धडाधड आवाज आणि फूत्कार ऐकू येऊ लागले. तान्सू मेश्राम हा उमरझरी गावचा अनुभवी रानकाढ्या काही काळ माझा वाटाड्या म्हणून होता. तो माझ्या शेजारीच हिरवळीवर सतरंजी टाकून पडला होता. सकाळपासून संध्याकाळपर्यंत जंगल तुडवून तोही थकून झोपला होता. पण हे आवाज ऐकून मी जसा जागा झालो होतो, तसा तोही झाला होता.

तो हलकेच कुजबुजला, ''साब, रानहेल्याची टक्कर लागलीय.''

'रानहेला' म्हणजे गवा. दोन-अडीच हजार पौंड वजनाचा, देखणा, प्रमाणबद्ध स्नायूंचा रात्रिंचर प्राणी. अजून कोणा प्रतिभावान शिल्पकाराने हा

भारतीय वृषभ ब्राँझमध्ये घडविल्याचे निदान माझ्या तरी पाहण्यात नाही. एरवी, शिल्पकाराला आव्हान मिळावे, असे त्याचे दर्शन आहे.

टकरीचे भयकारी आवाज डोंगराला धडकून प्रतिध्वनित होत होते.

ह्या बाजूलाच जंगल खात्याने परिश्रमाने तयार केलेली सुरेख बाग होती. तिच्यातील फुलझाडांवर माकडांनी, हरणांनी तोंड टाकू नये, म्हणून एक आदिवासी जोडपे, सुरेख बांबूची झोपडी बांधून तिथे राखणदार म्हणून नेमले होते.

रंगाने काळाशार, वयाने पन्नाशी केव्हाच ओलांडलेला अबोल असा हा राखणदार, रात्रभर पेटता ओंडका झोपडीसमोर ठेवीत असे. आणि जनावरांची चाहूल लागली की, गारठल्या आवाजात खुशाल आदिवासी हरळ्या-किंकाळ्या ठोकीत असे. एवढ्यानेही जनावरे गेली नाहीत, तर रॉकेल तेलाचे रिकामे डबडे तो मन मानले तसे पिटीत राही. अधून-मधून शोकगीताचा ढंग असलेली गाणी मोठमोठ्यांदा म्हणत राही. कित्येकदा, रात्री दीड-दोन वाजता त्याचा हा भयमुक्ती लढा मी ऐकलेला होता. त्याची म्हातारी कधीही त्याच्या सोबतीला झोपलेली मी पाहिली नाही. संध्याकाळ झाली की, फर्लांग-दीड फर्लांग अंतरावर, फॉ रेस्ट गार्ड्सच्या वस्तीत ती जाऊन झोपत असे. आयुष्यातल्या उतरत्या काळी दिसणारा ह्या जोडप्यातला सामरस्याचा हा अभाव कोणाही तिऱ्हाइताला कष्टी करणारा होता.

त्याच्याशी काही संवाद करावा, म्हणून एकवार सकाळी मी त्याच्या झोपडीसमोर जाऊन उभा राहिलो आणि त्याचा चेहरा पाहून निरुत्साही झालो. एखाद्या वठल्या खोडाकडे बघावे, तसे त्याने माझ्याकडे पाहिले आणि आपली उघडी पाठ फिरवली. याच्याशी संवाद केवळ अशक्य आहे, असे मला त्याच्या दृष्टीवरून कळले.

रखवालदाराच्या झोपडीपासून दीड-दोनशे यार्डांवरच गव्याची टक्कर चालू होती. त्यामुळे तो धडाधडा डबा बडवू लागला. कृष्णपक्ष होता, त्यामुळे दाट काळोख होता. झाडाच्या सावल्यांनी तो जास्तीच गर्द केला होता. तरीही मोठा टॉर्च घेऊन मी आणि तान्सू तळ्यात उतरलो. पाणी आटून एक भूशिर बरेच आतपर्यंत गेले होते. त्याच्या टोकाशी जाऊन उभे राहिलो आणि टॉर्च टाकून दुर्बिणीने पाहिले.

दोन प्रचंड मोठे गवे एकमेकांसमोर खडखडीला उभे होते. नाकांतून फूत्कार सोडत होते. टॉर्चचा झोत पडला, तरी ते हटले नाहीत. उभेच होते.


ह्या जंगलात हिंडताना ध्यानी आले होते की, वेगवेगळ्या भागांत

**नवं कोरं**

# 'परवाना जगण्याचा'

लेखक
**प्रिया कुमार**

अनुवाद
**श्यामल कुलकर्णी**




**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

उद्योजक जगतातील यशस्वी शिक्षिका, योगायोगाने यशाचा मार्ग दाखवणाऱ्या एका जगप्रसिद्ध प्रशिक्षकाने आयोजिलेल्या कार्यशाळेत दाखल होते. सात दिवसांच्या या कार्यशाळेत तिचा प्रवास तीन देशांत होतो. तिचे आयुष्य संपूर्णपणे बदलून टाकणाऱ्या या प्रवासाचे वर्णन या पुस्तकात आहे. त्या वेळी तिला आत्मशोध घ्यावा लागतो, आत्मपरीक्षण करावे लागते, स्वतःच स्वतःचा मार्गदर्शक व्हावे लागते. इतरांना तसे वागायला ती उत्तम रीतीने शिकवत असे; पण स्वतःच्या बाबतीत तिने हा मंत्र वापरून पाहिला नव्हता. वास्तव जगात चांगले आणि वाईट यांची बेमालूम सरमिसळ झालेली दिसते. तसंच, समजूतदार, शहाण्या लोकांबरोबरच भ्रमिष्टपणाचे कातडे पांघरलेल्या लोकांचा भरणा सापडेल. तुम्हाला क्षणात योग्य मार्ग सापडेल, तर काही वेळाने तुम्ही भरकटत आहात असे वाटेल. या सर्वांमधून नियतीने तुमच्यासाठी आखलेला मार्ग शोधून काढून तुमची आयुष्याबद्दलची स्वप्ने योग्य प्रकारे प्रत्यक्षात उतरवायची कशी, हे या पुस्तकात सांगितले आहे.

गव्यांचे एकूण चार कळप आहेत. आता जो समरप्रसंग निर्माण झाला आहे, तो दोन वेगवेगळ्या कळपांतील नरांची पाण्यावर गाठ पडल्यामुळे. ही भांडणे हद्दीवरून असावीत.

आटलेल्या तळ्यात सुरेख हिरवे गवत माजले होते. एरवी, बांबूची पालवी, झाडपाला, वेली हेच खाद्य ज्यांच्या वाट्याला यायचे; त्यांना उन्हाळ्यात हे गवत म्हणजे उत्तम मेजवानी होती. एक कळप चरत असतानाच दुसरा त्याच ठिकाणी आल्यावर संघर्षाला सुरुवात झाली असली पाहिजे. तू मोठा का, मी मोठा यासाठी तांबड्या रंगाच्या म्हणजे तरण्याबांड खोंडांनी लढत सुरू केली असली पाहिजे.

टॉर्चचा झगझगीत उजेड, आमची चाहूल आणि वास ह्यांमुळे कुस्ती निकाली झाली नाही. दोन्हीही गवे मैदान सोडून जंगलात शिरले. त्यांच्या आजूबाजूला चरणाऱ्या गाई, वासरे, काळे बैलही दिसेनासे झाले. रातकिडे आणि बेडके यांचा आवाज तेवढा येत राहिला. कुस्ती बघायला मिळाली नाही, म्हणून हिरमोड होऊन आम्ही परत आलो आणि अंथरुणावर पडलो.

एरवी, तळ्याच्या काठी रात्री केवढी तरी शांतता लाभे. संध्याकाळ झाली, डोंगरापलीकडे सूर्य गेला की थंड वारे वाहू लागत. रातवे पक्षी 'चक्कुऽ चक्कुऽ चक्कुऽऽ' असा सुरेख ठेका धरीत. दिवसभर पळापळ केलेली वानरे झाडांच्या सुरक्षित डहाळ्यांत विसावत. लवकरच आभाळ चांदण्याने झगमगू लागे.

अशा शांत, सुखद वेळी मी हिरव्या रंगाची ती वेताची आरामशीर खुर्ची उचलून झाडांच्या मेळाव्यात, हिरवळीवर टाकत असे आणि पायांत काही न घालता, थंड हिरवळीवर पावले ठेवून एकटाच बसत असे.

अशा वेळी माझ्या मनात उदास विचारांनी गर्दी केल्याचे मला आठवत नाही. हे इथले जीवन किती अर्थपूर्ण आणि किती थेट आहे, किती रसरशीत आणि किती साधे आहे, ह्याच विचाराने मी आनंदून जात असे.

रघुवंशात शातकर्णीऋषींचा उलेख आहे. तो मृग कळपाबरोबर राहत असे आणि दूर्वांकुर भक्षण करीत असे.

माणसे हीसुद्धा ज्या काळी, हरिणाप्रमाणे निसर्गाची लेकरे म्हणून वावरत होती, तो काळ किती वैभवाचा म्हणावा! तेव्हा एखादा देवदार वृक्ष कोणी पुत्रवत् मानून त्याचे पालनपोषण करी. वनातील वाटेवरून रथ चालला की, चाकांचा आवाज ऐकून मोर केकारव करीत.

मनू म्हणतो की, कृष्णसारमृग ज्या वनात यथेच्छ विहार करतात, तो प्रदेश यज्ञीय समजावा.

आता कोठे आहेत ते कृष्णसारमृग?

मध्य भारतातील कान्हा-किसलीसारख्या विस्तीर्ण अभयारण्यातसद्धा त्यांची संख्या केवळ एकवीसच आढळावी? मनुष्यप्राणी तेवढा जगावा आणि वाढावा म्हणून आपण कशाकशांचा संहार करणार आहोत? असा संहार करीत गेलो, तर आपलाही समूळ नाश होणार आहे, हे आपल्या ध्यानी कधीच येणार नाही का?

माझ्या खोलीशेजारी पिंढरीएवढ्या आकाराच्या झाडाच्या खोडावर अडकलेले कांचनमृगाचे भव्य शिंग आणि जबड्याचे हाड मी रोज पाहत असे. वन्य प्राणिजीवनाचा अभ्यास करणाऱ्या एका साक्षेपी अभ्यासकाने अधिक चिकित्सेसाठी हे अवशेष तिथे सांभाळून ठेवले होते. हा कांचनमृग, मी इथे येण्याआधी तीनच दिवस, कोण्या पारध्याची गोळी छातीत घेऊन पाणी-पाणी करीत अभयारण्याच्या ह्या तळ्यात आला होता आणि रक्तस्त्रावाने कोलमडून तळ्यात पडला होता. माद्यांचे संभोगोत्सुक कळप आकर्षित करणारी त्याची ती वैभवशाली शिंगे, सकाळी तळ्याकाठी आलेल्या कोणी फॉ रेस्ट गार्डने, पुराच्या प्रवाहात वसाण दिसावे तशी पाहिली आणि तो मृत कांचनमृग पाण्याबाहेर काढला. जंगल खात्याच्या नियमानुसार मांसाचा लिलाव झाला, कातडे सरकारजमा झाले आणि हे एवढे अवशेष अभ्यासकाच्या हवाली करण्यात आले.

इतिहासकालीन भग्न अवशेष पाहून होते, तसे माझे मन ही शिंगे पाहून उदास होत असे.

माझ्या रोजच्या पायपिटीत किती तरी प्राणी मला भेटत. कांचनमृगाचे कळप जागोजागी दिसत. रानकुत्री दिसत, गवे दिसत, एकांडे डुक्कर दिसे... नीलगाई, सांबरे दिसत. जंगलात मिसळून जावे, असा हिरव्या रंगाचा पोशाख माझ्या अंगावर असूनही ह्या प्राण्यांना फार दुरून माझा वास येई. मोर वानरापाशी येतो किंवा गव्यांच्या कळपात कांचनमृग नि:शंक मनाने चरतो, तसे मला पाहून ह्यांपैकी कोणी भय न बाळगता वावरले नाही. माणूस ह्या द्विपाद प्राण्याचा धसका सर्वांनाच असतो. त्याच्या वाऱ्याला कोणी ठरत नाही. का बरे?

बावीस मे रोजी बुद्ध पौर्णिमा होती. रात्री मधेच जाग आली, तर स्वच्छ

चांदणे पडले होते. रात्रीचे अकरा वाजून गेले होते. झोपेने डोळे जडावले होते तरी उठलो. खोली उघडून भराभर पोशाख चढविला. बूट घातले. मोठा कमांडर टॉर्च आणि दहा बाय चाळीसची दुर्बीण घेऊन तळ्यात गेलो. त्या भूशिराच्या पार टोकाशी जाऊन ओल्या हिरवळीवर रुमाल अंथरूण बसलो आणि डोळ्याला दुर्बीण लावून समोर पाहिले.

चांदण्याने चमचमणाऱ्या पाण्यापलीकडे काळे ढीग हलताना दिसले. एक, दोन, तीन, चार... तेरा – एकूण तेरा गवे होते.

हा कळप माझ्या ओळखीचा होता. हाच कळप मी जंगलात दोनदा पहिला होता. एकदा अगदी संध्याकाळी सात वाजता. त्यात दोन अगदी लहान वासरे होती. चार गाई होत्या. आईपेक्षा वेगळ्याच अशा एका तरुण कालवडीने लहान वासराला जवळ जाऊन चाटले, अशी नोंद माझ्या टिपणवहीत मी केली होती. ही वासराची बहीण तर नसेल!

ह्याच कळपात एक पुराणपुरुष असा प्रचंड काळा गवा होता. त्याच्या हनुवटीला आणि गळ्याला केस लोंबताना दिसले. मला पाहताच वरचा ओठ दुमडून आणि तोंड वर करून त्याने शंख वाजावा, तसा आवाज केला. तत्काळ सगळा कळप सावध झाला. एकदा सकाळी हाच कळप पाहिला होता आणि त्यातील तरुण, रेशमी-किरमिजी रंगाच्या गव्याची बुंध्याला लालसर आणि निळीकाळी अशी शिंगे पाहून हर्षभरित झालो होतो. काळ्या आणि तांबूस गव्याच्या शरीराचा विलक्षण सुंदर घाट, पीळदार स्नायू याच वेळी मी पहिल्यांदा पाहिले होते आणि चकित झालो होतो. तोच हा कळप असला पाहिजे. तहान भागवून तो आता शांतपणे हिरव्या गवतावर चरत होता.

तिरोडा रस्त्याकडे असलेल्या जंगलाच्या तुकड्यातून भसाभस कांचनमृगांचा एक कळप आला. मृग, मृगी, शावके असे एकूण तेवीस मृग मी मोजले. त्यांच्या पायांचा पांढरा रंग चांदण्यात हलताना मला दिसत होता. ह्या अंधूक प्रकाशात शिंगाडे, माद्या, वर्षाची पोरे, लहान शावके – एवढा बारकावा ध्यानी येत नव्हता. मला फक्त आकार दिसत होते. तहानलेली हरणे भराभर पाण्याशी येत होती. सावधपणे थांबत होती. सावट घेत होती आणि चारी पाय पाण्यात बुडवून पाणी पीत होती.

एवढी हरणे मी एकत्र अशी ह्यापूर्वी कधीच पाहिली नव्हती. एका मागोमाग एक अशी रीघच लागली होता.

मग एक सांबरांचा कळप आला. त्यात मोठा शिंगाडा होता. दोन माद्या

होत्या. एक पोर होते. कांचनमृगापेक्षा हे आकार मोठे आणि गर्द काळे दिसत होते. सतत आकार हलताना दिसत होते. मी अंदाज बांधत होतो. हे कांचनमृग, ही सांबरे, ह्या नीलगाई. ही मादी, हे पोर, हा बारशिंगा.

हा काळा ढीग कसला? एकुलगा डुक्कर असावा. त्याला मी अगदी दहा फुटांवर दोनदा पाहिला होता. काठाशी येऊन तो आधी पाण्यात बसला.

माझ्यासमोरच्या अर्धवर्तुळाकार गर्द काळ्या झाडीतून भराभर जनावरे येत होती. पाणी पीत होती आणि परतत होती. आवाज मुळीच होत नव्हता. एखादा मूक चित्रपट पाहावा, तसे हे मी सगळे पाहत होतो. रात्री माणसाचा एवढा समुदाय पाण्यावर आला असता, तर त्यांनी केवढा गदारोळ केला असता! इथे सगळे चुपचाप चालले होते. बघता-बघता तिन्ही बाजूंनी मी जनावरांनी वेढला गेलो. आता मला नेमकी जनावरे ओळखता येत नव्हती. आकारच आकार दिसत होते. एखादे अद्‌भुत स्वप्न पाहावे, तसे चांदण्यात हे दृश्य मी पाहत होतो आणि रोमांचित होत होतो.

ह्या नागझिरा जंगलात एकूण किती वन्य प्राणी आहेत, याची शिरगणती माझ्या मुक्कामात अधिकाऱ्यांनी बारा आणि तेरा मे रोजी  केली होती. इथे एक सहस्र एकोणपन्नास कांचनमृग होते, एकशे एकवीस सांबरे होती, एकावन्न भेकरे होती, एक्याऐंशी गवे होते, एकतीस नीलगाई होत्या, एकोणपन्नास डुकरे होती, सतरा अस्वले होती आणि तीन बिबळे होते.

ह्यांपैकी किती आणि कोणकोणत्या जातीचे प्राणी बुद्ध पौर्णिमेच्या त्या रात्री पाणी पिऊन गेले, याची मोजदाद मला करता आली नाही.

रात्री दीड वाजेपर्यंत मी तळ्यावर बसून होतो आणि जनावरे पाण्यावर येतच होती. आकार हलत होते आणि डुचमळत होते. चुबुक्ऽ चुबुक्ऽऽ आवाज होत होता. शेवटी भारावून मी परत आलो, मला जंगलाशी एकरूप करणारे कपडे उतरवून टाकले. कुडता-पायजमा चढवून, हिरवळीवर टाकलेल्या खाटल्यावर लावलेल्या मच्छरदाणीत शिरलो आणि डोळे मिटले.

सकाळी दयाळ पक्ष्यांच्या सुस्वर भूपाळीनं जागा झालो आणि अंथरुणातून बाहेर येऊन मी तळ्याकडे पाहिले.

तळे शांत होते. रात्री इथे केवढे नाट्य घडून गेले, ह्याचा मागमूसही नव्हता.

पीक निघाल्यावर रान दिसावे, तसे तळे रिकामे दिसत होते.

**- व्यंकटेश माडगूळकर**

◆◆◆

# पुस्तक परिचय

(१८ जून या फादर्स डे निमित्त)

## वपु सांगे वडिलांची कीर्ती

**केव्हातरी हे होणारच होतं**

वर्षाच्या तीनशेपासष्ट दिवसांपैकी, कोणता दिवस, कोणती तारीख तो मान पटकावणार आहे, हेच फक्त माहीत नव्हतं.

तो दिवस २८ सप्टेंबर, १९७६... मंगळवार आहे हे त्याच दिवशी संध्याकाळी साडेचार वाजता समजलं.

खरं तर मंगळवारी अण्णा कुठेही जात नसत.

गावाला जाण्यासाठी जर मंगळवारच उजाडणार असेल, तर ते सोमवारीच प्रस्थान ठेवीत असत.

पण एवढ्या मोठ्या प्रवासाला निघताना अण्णांनी प्रस्थान ठेवलं नाही.

असं कसं...?

सगळंच आठवतं तसं हेही आठवतं.

'श्रमसाफल्य' बंगल्यात तेव्हा बिऱ्हाड होतं गोखल्यांचं. आंतराष्ट्रीय कीर्तीचे 'इम्पा'चे डायरेक्टर गोगटे, त्यांचीच बहीण आणि सोवळी आई, ही ती मंडळी. गोगटे माझ्या मावशीचे यजमान. तेव्हा बिऱ्हाड म्हणायचं, पण तो सगळा नात्यातलाच प्रकार होता.

नातेवाईक असूनसुद्धा गोखले मंडळी चांगली होती. अण्णा एक सामानाची भरून ठेवलेली पिशवी घेत. पायात चपला घालून गोखल्यांकडे जात. आम्हीही व्यवस्थित निरोप घेत असू. पिशवी गोखल्यांकडे ठेवून

अण्णा मधल्या घरात, मधल्या दरवाजातून पुन्हा परत येत.

## या वेळेला काही नाही

‘ प्रवास ’ शब्दाचं नातं कायम आपण ‘ सामान ’ या शब्दाबरोबर जोडलेलं आहे.

‘ इथून-तिथे ’ या दोन शब्दांतलं अंतर जेव्हा मैलात, किलोमीटरमध्ये मोजता येतं, तिथंच सामानाचा प्रश्न सोडवावा लागतो.

दिगंताच्या यात्रेकरूचा प्रवास एकदम ट्रॅव्हल लाईट. दोन्ही हात रिकामे.

काहीही न मागणाऱ्या त्या हातांकडे मी पाहत उभा होतो. कुंतीनं कृष्णाकडं ज्याप्रमाणे कायम दु:खाची मागणी केली, त्याप्रमाणे या हातांनी नियतीकडे सतत कष्टाची मागणी केली; आणि प्रामाणिक, उदार नियतीनं अण्णांना त्यांच्या वयाच्या ऐंशीव्या वर्षापर्यंत भरपूर कष्टाचं दान दिलं.

हे हात रिकामे होते, पण कसे? - तर जवळचं होतं नव्हतं सगळं लुटवून दिल्यानंतरचं ते रितेपण होतं.

बेचाळीस नाटकं, एकवीस चित्रपट, असंख्य लँडस्केप्स... गणिताच्या भाषेत सांगायचं झालं, तर केवळ नाटकांच्या नेपथ्यासाठी रंगवलेलं मांजरपाट ७८,४८४ स्क्वेअर फूट एवढं आहे. चित्रपटांसाठी रंगवलेलं मांजरपाट काही लाखांच्या घरात आहे. तो आकडा मला गणिताच्या भाषेत बरोबर माहीत आहे. पण आता वाटतं, ही गणितं, ही आकडेवारी याला खरोखर काही अर्थ आहे का?

कारण एकदा हिशेबच मांडायला प्रारंभ केला, तर सगळाच हिशेब मांडायचा मोह होतो. मोह नेहमी दु:खाला जन्म देतो, त्याप्रमाणे हा हिशेबाचा मोहसुद्धा दु:खालाच जन्म देणार आहे. कारण जो प्रश्न अण्णांनी त्यांच्या आयुष्यात कुणालाही विचारला नाही, तो प्रश्न माझ्या आणि माझ्या बहिणीच्या, आईच्या मनात प्रतिक्षणी येऊन गेलेला आहे.

‘या श्रमांचं फलित काय? ’ - तर एखादा सत्कार, एक पुष्पगुच्छ, एक हार. तेसुद्धा त्या त्या नाटकांच्या शंभराव्या, नाहीतर दोनशे, तीनशे... वगैरे प्रयोगांना, पु. श्री. हजर असतील तर. कधीतरी तसा एखादा हार घेऊन अण्णा घरी आले की आम्ही सगळे म्हणत असू -

‘या एका हाराची किंमत दहा हजार, पाच हजार, गेला बाजार, तीन हजार नक्कीच आहे. ’

आज, हे सगळे बोलण्याचीही मला चोरी झाली आहे; कारण, अण्णांच्या हयातीतच मी त्यांच्यावर जे जे लिहायचं ते ते लिहायला प्रारंभ केला होता. पण,

त्यातला प्रत्येक लेख अण्णांकडूनच ‘ सेन्सॉर ’ केला जात होता.

इतरांना जाब विचारणाऱ्या वाक्यांना कात्री लागत होती.

त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायांचा उल्लेख करायची मलाही बंदी होती.

तेच बंधन मला आजही पाळायला हवं आहे. नाहीतर काम करवून घेऊन ‘ तो मी नव्हेच ’ म्हणणारे किती भेटले, ते...

‘ राजकमल ’च्या संदर्भात मला मुळीच काही म्हणायचं नाही. ती सरळ सरळ नोकरी होती. बेकारीचं सुख उपभोगल्यानंतर स्वेच्छेने पत्करलेली नोकरी. त्यात फसवाफसवी नव्हती. कबूल करून बुडवल्याचा मामला नव्हता. अपेक्षाभंगाचं दु:ख नव्हतं. पगार किती कमी मिळतो याची खंत बाळगण्यापेक्षाही, शांतारामबापूंच्या शिस्तीप्रमाणे तो दर महिन्याच्या सात तारखेला हमखास मिळणार याचाच उदंड आनंद होता. नाहीतर आर्ट डायरेक्टर म्हणून सेवानिवृत्त होताना साडेतीनशे पगार असणं, आणि तो वीस वर्षांच्या कारकीर्दीत सव्वाशे रुपयांपासून वाढत असलेला... कोणत्या ‘पे कमिटी’ची शिफारस असू शकेल?

खरंच, अण्णांनी काय मिळवलं?

आज सापडलेला अर्थ हा - ‘खूप आनंद मिळवला.’

शिस्त आणि अविरत कष्टांवर नितांत श्रद्धा असलेल्या अण्णांना त्याच मूल्यांची जपणूक करणारे शांतारामबापू, मालक म्हणून भेटले, याचाच आनंद शब्दातीत होता. या दोन जीवनमूल्यांबरोबरच, सौंदर्यदृष्टी आणि perfection याचं वेड असलेले शांतारामबापू. हवा तो परिणाम साधण्यासाठी जिवाचं रान आणि पैशाचं पाणी करणारा मालक.

अण्णांच्या बाबतीत ‘ पैशाचं पाणी ’ हे जरी शक्य नव्हतं, तरी ‘ जिवाचं रान करणं’ हा एक स्थायीभाव नक्कीच होता. तो निर्मितीचा आनंद पुरेपूर देण्याची ताकद फक्त ‘ राजकमल ’चीच होती. ते धन अण्णांनी पुरेपूर लुटलं आणि तशाच संपन्न अवस्थेत त्यांनी प्रयाण केलं.

सामान न घेता...

हातात न मावणारं, गणितात मोजता न येणारं धन बरोबर होतं; म्हणून मला ते हात रिकामे वाटले.

मग आता मी हे का लिहावं? तर पुन्हा एकवार 'एक माणूस' म्हणून अण्णा किती मोठे होते, हे नव्यानव्यानं जाणवतंय म्हणून. ते माझे वडील होते म्हणून ते मोठे होते, असं मुळीच नाही. ते मोठे होते, शिवाय माझे वडील होते.

आर्थिक विवंचना कायम असूनही ते त्रासलेले नव्हते. वैतागलेले नव्हते. चिरचिरे, कावलेले नव्हते. घरातला कुटुंबप्रमुख कायम प्रसन्न, तृप्त, शांत असणं हे त्या वास्तूला मिळालेलं केवढं वरदान आहे, याचा विचार घराघरातून व्हावा असं मला वाटतं.

अण्णा देवभोळे होते का? खास करून नाही. पण धरलेला नेम चुकला नाही. हनुमानजयंतीला ते सूर्योदयापूर्वी वडाळ्याच्या मारुतीला जाणार म्हणजे जाणार. त्यात खंड पडला नाही. घरच्या मारुतीच्या पुतळ्याला दर शनिवारी हार येणार म्हणजे येणार. ' देशस्थ ' या उपाधीला बदनाम करणारी ही शिस्त.

कशी आली? कुठून आली? - या प्रश्नांना उत्तरं नाहीत. कुणाजवळच.

अनुत्तरित राहण्यातच काही प्रश्नांचं वैभव असतं. असे अनेक प्रश्न समोर टाकून अण्णा गेले. उतारवयात कोणती ना कोणती व्याधी जडणारच. काही अटळ वळणांपैकी ते एक वळण. रक्तदाब, हृदयविकार, मधुमेह ही मंडळी जरा बरी. ती तुम्हाला सूचना देत येत तुमची मानसिक बैठक तयार करतात. जीवनरथ उलटण्याची धोक्याची वळणं दाखवत राहतात.

अण्णांना काय व्हावं? मेंदूला अपुरा रक्तपुरवठा व्हायला लागला. भास व्हायला लागले. संगीताची कुठेतरी बैठक चालली आहे असं वाटायला लागलं. दिवस दिवस एखादी गत, रागदारी, ठुमरी ऐकू येऊ लागली. पत्रातून मला ते आज दिवसभर कोणती गत, चीज ऐकली ते कळवत असत. अतिरेक झाला, तेव्हा मग मानसोपचार तज्ज्ञाकडे धाव घेतली. संगीत थांबलं आणि इतर भास व्हायला लागले.

नाट्यव्यवसायातील गरजू माणसं खिडकीपाशी थांबलेली दिसत. अण्णा त्यांना खिडकीतून पैसे फेकत. पुण्यातील मानसोपचार तज्ज्ञ डॉ. शिरवईकर म्हणाले, '' लक्षाधीश म्हाताऱ्यांनाही भ्रमात, पै पै करताना मी चवताळलेलं पाह्यलेलं आहे. तुमचे वडील, भ्रमात इतरांची दया येऊन पैसे फेकतात. असा पेशंट मी प्रथमच पाहतोय. He is quite a innocent man. मला नव्या ट्रीटमेंटचा विचार केला पाहिजे. ''

आणि नंतर नंतर अण्णा कायम कोट-टोपी घालून, तास न् तास बसून राह्यचे. विचारलं तर म्हणायचे,

“ नोकरी आली आहे. पडदे करायचे आहेत. चिंता मिटली. चांगला पाच हजार पगार ठरलाय. ”

कधीही व्यक्त न केलेलं, पण चिंता राहणार नाही एवढा पगार देणारी चित्रपट संस्था किंवा प्रत्येक नेपथ्याचं योग्य मानधन देणारी नाट्यसंस्था न मिळाल्याचं दु:ख शेवटी शेवटी असं उफाळलं असेल का?

अण्णा गेले.

१८८८ साली, एक नोव्हेंबरला जन्माला आलेला एक गृहस्थ, मेणवलीत बालपण घालवतो. कर्तृत्वाचं क्षेत्र म्हणून हैद्राबाद-मुंबईत हयात गाजवतो आणि यात्रा संपवतो ती लेकीच्या गावी चिंचवडला. बंगल्यात भिंतीभिंतींवर लावलेली पेंटिंग्ज, जिवापाड जपलेल्या १९०८ सालापासूनच्या डायऱ्या, १९३४ साली कर्ज काढून बांधलेला ‘ श्रमसाफल्य ’ बंगला, चित्रकला, फोटोग्राफी, मंगलाष्टकं, विनोदी लेख, हस्ताक्षरसंग्रह, सगळीकडे वळूनही न बघता ते गेले.

आनंद एकाच गोष्टीचा...

त्यांच्याबद्दलच्या माझ्या सगळ्या भावना मी पुस्तकरूपानं त्यांच्या हयातीत व्यक्त करू शकलो. याबद्दल मी कायम निशीगंध प्रकाशनाच्या जोशींच्या ऋणात. कारण त्यांच्यामुळेच, ‘अण्णांशी हे बोलायचं राहून गेलं.. ’ यासारख्या दु:खातून मी मुक्त झालो.

आणि दु:ख कशाचं?

तर एक जिवाभावाचा, अबोल, पण खूप सांगणारा, व्यथित, पण कायम आनंदी असा कर्मयोगी मित्र दुरावला, याचं.

माझी आई समजूत घालताना मला म्हणाली, “ तुला ते खूप वर्षं पुरले की नाही?”

मी म्हणालो, “ म्हणूनच चटक लागली होती... ”

वडिलांचं छत्र केव्हातरी जाणारच असतं. मित्र मात्र अमर असावा, ही इच्छा असते. अण्णा मित्र होते, म्हणून हे दु:ख न संपणारं.

**-व.पु.काळे**


◆◆◆

**नवं कोरं**

# अँड द माउंटन्स एकोड

लेखक
**खालिद हुसैनी**

अनुवाद
**वैजयंती पेंडसे**




**किंमत :४४०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

आशयघन आणि विस्तृत अवकाश असलेली, शहाणपण आणि माणुसकीच्या गहिवराने ओथंबलेली 'अँड द माउंटन्स एकोड' ही भारून टाकणारी कथा, माणूस म्हणून आपली व्याख्या करणाऱ्या, आपल्या आयुष्याला आकार देणाऱ्या भावबंधांची, मानव्याच्या खऱ्या अर्थाची खालिद हुसैनीला असलेली गहिरी जाण पुन्हा एकदा अधोरेखित करते. एका छोट्याशा अफगाणी खेड्यातल्या, आईच्या मायेला पारख्या झालेल्या दोन भावंडांमधल्या हृदय हेलावून टाकणाऱ्या अतिशय घट्ट भावबंधांतून ही कथा सुरू होते. तीन वर्षांच्या परीसाठी तिचा थोरला भाऊ अब्दुल्ला तिच्या भावापेक्षा तिची आईच अधिक आहे, तर दहा वर्षांच्या अब्दुल्लाचं लहानगी परी हे सर्वस्व आहे. त्यांच्या आयुष्यात जे जे घडतं त्याचे त्यांच्या आणि त्यांच्या भोवतालच्या अनेकांच्या आयुष्यात जे पडसाद उमटतात, त्यातून मानवी आयुष्यातली नैतिक गुंतागुंतच स्पष्ट होते. अनेक पिढ्यांमध्ये घडणारी ही कथा केवळ आई-वडिलांच्या आणि मुलांच्या नात्याबद्दलची राहत नाही तर, भाऊ-बहीण, चुलत भावंडे, नोकर, मालक, विश्वस्त, पाल्य या साऱ्या नात्यांची होते. त्यांच्या एकमेकांवर प्रेम करण्याच्या, एकमेकांना दुखवण्याच्या, फसवण्याच्या, एकमेकांसाठी त्याग करण्याच्या नाना परी हुसैनी पडताळून पाहतो. ऐन मोक्याच्या क्षणी, आपल्या अगदी जवळच्या असणाऱ्या माणसांचं वागणं आपल्याला किती अनपेक्षित असू शकतं आणि तेच कदाचित सर्वाधिक महत्त्वाचं असू शकतं, हेही!

# दिसलीस तू फुलले ऋतू...

सुधीर मोघे...मराठी भावगीतांच्या दालनात रूप-रस-गंधाची उधळण करणारा शब्दप्रभू. एखाद्या उत्कट भावनेचं गारूड त्यांच्या मनावर होतं आणि तितक्याच उत्कटतेने त्यांचे भाव गीतातून साकार होतात. प्रेमभावनेतील अत्युत्कटता, परिपूर्णता आणि प्रसन्नता त्यांच्या काही भावगीतांतून आविष्कृत होताना दिसते.

तिचं नुसतं ओझरतं दर्शनही त्याच्या मनात प्रीतीची ज्योत चेतवून जातं. तिच्या दर्शनाने भारावलेला तो म्हणतो-

*मनी जे दाटले तुला पाहुनी, सांगू कसे?*
*हृदय शब्दांत ग आणावे कसे? सांगू कसे?*
*सुखाची गोड कळ दुखरी कशाला देऊन गेलीस तू?*
*अनाहूत त्या क्षणांचे गूढनाते, सांगू कसे?*

तुझं दर्शन एक क्षणभरच झालं; पण तुला पाहून मनात इतक्या भावना उचंबळून आल्या की त्यांना शब्दरूप देणं अवघड आहे. कसं सांगू तुला माझं मन? सुखाची एक गोड लहर तुला पाहून माझ्या नसानसांतून सळसळत गेली. त्या अनाहूत क्षणाशी जडलेल्या नात्यातील गूढता कशी सांगू तुला?

आणि ती दिसल्यानंतर मनावर झालेलं गारूड आणखी एका भावगीतातून त्यांनी शब्दबद्ध केलं आहे. ते लिहितात-

*मन लोभले मनमोहने*
*गीतांत न्हाली तुजमुळे, साधीसुधी संभाषणे*
*कळले मला दिसताच तू*
*माझीच तू, माझीच तू*
*माझे-तुझे नाते जुने*

शब्दांचं सौंदर्य आणि अर्थातील उत्कटतेचं हे साहचर्य या गीताला एका

वेगळ्या उंचीवर घेऊन जातं. तू दिसलीस आणि साध्यासुध्या संभाषणालाही एक लय प्राप्त झाली. तू माझीच असल्याचा साक्षात्कार मला झाला. तुझ्या नि माझ्या जन्मोजन्मीच्या नात्याची ओळख मला तुझ्या प्रथम दर्शनातच पटली.

तर तिच्या नुसत्या दिसण्याने त्याचं मन मोहरतं आणि तो म्हणतो-

*दिसलीस तू फुलले ॠतू*
*उजळीत आशा, हसलीस तू*
*उरले न आसू, विरल्या व्यथाही*
*सुख होऊनिया, आलीस तू*

तू दिसलीस आणि ॠतू फुलले, तू हसलीस आणि आशा उजळली. तुझ्या दर्शनाने आसू सरले, व्यथा विरल्या आणि सुख होऊन तू माझ्या जीवनात आलीस. प्रेमभावनेचा हा उत्कट आविष्कार मनावर प्रसन्नतेचा शिडकावा करून जातो.

तिच्या नुसत्या दर्शनाने भारावलेलं त्याचं मन एका हळुवार क्षणी तिला साद घालतं. ते म्हणतं-

*सखी मंद झाल्या तारका*
*आता तरी येशील का?*
*जे जे हवेसे जीवनी*
*ते सर्व आहे लाभले*
*तरीही उरे काही उणे*
*तू पूर्तता होशील का?*

आकाशातल्या तारका मंद झाल्या, आता तरी ये ना! जीवनात जे हवं होतं ते सगळं मिळालं आहे; पण तरीही काहीतरी उणं आहेच. तुझ्या येण्याने पूर्तता होणार आहे. येशील ना मग? सुधीर मोघ्यांच्या या गीतातून शब्दलाघव आणि भावनांची उत्कटता सांडत राहते. वाट पाहणाऱ्या मनाने भावनांची चरम सीमा गाठलेली दिसते आणि म्हणूनच कितीही वेळा हे गीत ऐकलं तरी कंटाळा येत नाही.

तर प्रेमाचं हे सनातन नातं मोघ्यांच्या गीतांमधून पुन:पुन्हा भेटत राहतं. या नात्याचा उच्चार करणारी एक प्रेमिका म्हणते आहे-

*सजणा पुन्हा स्मरशील ना*
*साऱ्या खुणा*
*प्रीतीतले लाख बहाणे*

*तू मी नवे, खेळ पुराणे*
*मनमोहना*

प्रेमातल्या खाणाखुणा प्रेमिकांनाच माहीत असतात. तर अशा या खुणा तू पुन्हा स्मरशील ना? म्हणजे विसरणार तर नाहीस ना? असा प्रश्न ही प्रेमिका करते आहे. प्रेमाचा हा खेळ युगानुयुगे चालला आहे; फक्त आपण दोघं या खेळात नवीन आहोत.

तेव्हा मोघ्यांची प्रेमगीतं त्यातील विशुद्ध भावनेमुळे विशिष्ट उंची गाठताना दिसतात. त्यांच्या अन्य भावगीतांमध्येही त्यांनी उंची गाठली आहे ती सकारात्मकतेमुळे. अशाच एका गीतात ते लिहितात-

*तपता झळा उन्हाच्या झेलीत चाललो*
*मी बीज सावल्यांचे पेरीत चाललो*
*ये कोरड्या गळ्यात हा सूर कोठला*
*मी तार वेदनेची छेडित चाललो*

दु:खावरही मात करता येते, हे या गीतातून मोघ्यांनी समर्पकपणे सांगितलं आहे. उन्हाच्या झळा झेलत चाललो आहे; पण मागून येणाऱ्यांसाठी सावल्यांचं बीज पेरतो आहे. जीवन नीरस झालं असलं तरी सुरांच्या साथीने चालतो आहे. एका छोट्याशा गीतातून फार मोठा आशय त्यांनी व्यक्त केला आहे, अर्थातच देखण्या शब्दकळेतून.

मोघ्यांचं मनाविषयीचं चिंतन एका गीतातून प्रकटलं आहे. ते लिहितात-

*मन काळोखाची गुंफा*
*मन तेजाचे राऊळ*
*मन सैतानाचा हात*
*मन देवाचे पाऊल*

वाईट वृत्तीला ते 'काळोखाची गुहा' असं संबोधतात, तर चांगल्या वृत्तीसाठी ते तेजाच्या राऊळाची प्रतिमा योजतात. मन कधी सैतान बनतं तर कधी देवाचं रूपही घेतं. आपल्या मनाचं देऊळ करायचं की काळोखाची गुहा, सैतान व्हायचं की देव, हे ज्याचं त्यानं ठरवायचं.

आणि शेवटी मानवी जीवनाची इतिकर्तव्यता असते ईश चिंतनात. त्याच्या स्मरणात. मोघ्यांनी परमेश्वराबद्दलची ही भावनाही उत्कटतेने व्यक्त केली आहे. ते लिहितात-

*क्षणोक्षणी रात्रंदिन*
*तुला आठवीन*
*भेट होता उराउरी*
*प्राण तुझ्या पायांवरी*
*वाहीन...वाहीन*

प्रत्येक क्षणाला, दिवसा, रात्री मी तुझं स्मरण करेन. जेव्हा तुझी आणि माझी उरउरी भेट होईल तेव्हा मी तुझ्या पायावर प्राण वाहीन.

ईशचिंतन करताना ते लिहितात-

*अरूपास पाहे रूपी तोच भाग्यवंत*
*निसर्गात भरूनी राहे अनादि अनंत*
*कुशीमध्ये त्याच्या जावे*
*मिठीमध्ये त्याला घ्यावे*
*शाश्वतात विरूनी जावे*
*सर्व नाशवंत*

जो अरूपाला रूपात पाहतो किंवा जो निगुर्णाला सगुण स्वरूपात पाहतो तो खरा भाग्यवंत असतो. निर्गुण निराकार परमेश्वराचं सगुण साकार रूप म्हणजे निसर्ग. त्या निसर्गाच्या कुशीत जा. त्याला मिठीत घ्या, म्हणजे शाश्वतात सगळं नाशवंत विरून जाईल, असा संदेश मोघे सहजपणे देऊन जातात.

तर सुधीर मोघ्यांची ही सर्वांगसुंदर गीतं, सत्यम् शिवम् सुंदरम्ची प्रचिती देणारी आहेत. अगदी प्रेमभावनेतही शब्दापलीकडचं, जीवनापलीकडचं काहीतरी शोधणारी आहेत. पवित्रता आणि सकारात्मकतेचा दीप मनात लावणारी आहेत आणि हा दीप रसिकांच्या मनात सतत तेवत राहणार आहे.

**- अंजली पटवर्धन**

◆◆◆

## स्मरण

# पु.ल.देशपांडे



संपूर्ण विसाव्या शतकावर आपल्या एकूणच अभिरुचीसंपन्न साहित्याची, कलेची आणि समृद्ध नाट्यगुणाची सुवर्णमुद्रा उमटवणारे पु.ल.देशपांडे हे एक आश्चर्य वाटावे असे अजब रसायन होते. पु. ल. देशपांडे ह्या नावातच एक अद्‌भुत किमया अशी काही शिगोशिग भरलेली होती की, जगाच्या पाठीवर जिथे जिथे सुसंस्कृत मराठी माणूस आजही आनंदाने खळखळून हसतो आहे, तृप्त प्रसन्नतेच्या आठवणी जागवत आपले आयुष्य पु.ल.देशपांडे यांच्या समग्र साहित्यातून तोलून धरतो आहे. 'बटाट्याची चाळ', 'असा मी असामी' सारख्या श्रेष्ठ एकपात्री प्रयोगांमधून आजही प्रत्यक्ष अनुभवतो आहे, ते पु.ल.देशपांडे म्हणजे या पृथ्वीभोवती फिरणारा 'हसवणारा ग्रह' होता. साठ-पासष्ट वर्षे 'पुलं'नी केवळ आपल्या साहित्यातून, नाटकांतून, अभिनयातून जगभर केवळ आनंदाची अविरत बरसातच केली. वाचकांना अक्षरश: दिग्मुढकेले. 'पुलं'चे समग्र वाङ्मय म्हणजे अनेक अलौकिक व्यक्तींची, त्या त्या श्रेष्ठ व्यक्तीच्या कार्यकर्तृत्वाची तसेच त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांची एक विलक्षण अशी यात्रा तर आहेच, त्याहून अधिक त्यांनी निर्माण केलेल्या विविध व्यक्तिचित्रणांचीसुद्धा एक नेत्रदीपक रोषणाई आहे. 'असा मी असामी' या काल्पनिक आत्मचरित्राच्या शेवटी एक परिच्छेद आहे. तो परिच्छेद वाचताना धोंडो भिकाजींच्या मुखातून जे तत्त्वज्ञान प्रकट होते, तेच पु.ल.देशपांडे या अलौकिक आणि काहीसे आश्चर्यकारक आयुष्य जगलेल्या श्रेष्ठ सारस्वताचे वैयक्तिक तत्त्वज्ञान आहे. हे सहज, सोपे असे माणसाला शाश्वत आणि कृतार्थ आयुष्य बहाल करणारे तत्त्वज्ञान 'पुलं'नी आपल्या सर्व पापभीरू व्यक्तिचित्रणांमधून प्रकाशकिरणांसारखे सतत असे प्रकाशित ठेवले आहे की, वाटते आपणही हे सोपे, शाश्वत तत्त्वज्ञान जगू शकतो. धोंडो भिकाजी आपल्या पत्नीला

म्हणतात, ''अजूनही तेच घड्याळ वापरतो. खिशातून काढलं की वाटतं, जुन्या काय नि नव्या काय, घड्याळांच्या तबकड्या नि पट्टे बदलतात- सुखानं टळलेली दुपार पाहायला तबकडी नि पट्टे करायचे आहेत काय? घड्याळाचं काय आणि माणसाचं काय, आतलं तोल सांभाळणारं चाक नीट राहिलं की फार पुढंही जाण्याची भीती नाही नि फार मागंही पडण्याची भीती नाही.'' 'पुलं'नीसुद्धा आपल्या एकूणच साहित्यातून प्रकट केलेल्या सर्व व्यक्तिचित्रणांतून हे तोलचक्र सांभाळले आहे.

अशा धोंडो भिकाजी कडमेडकर या एका विलक्षण व्यक्तीभोवती हे चरित्रगायन गरागरा फिरते आहे. या चरित्रनायकाभोवती वावरणारी सर्व माणसे म्हणजे मानवी स्वभावाचे मध्यमवर्गीय वृत्तीचे नितळ तळ दाखवणारे अक्षरडोह आहेत. हे लेखन म्हणजे 'पुलं'च्या एकूणच साहित्य साम्राज्यातले एक अनोखे दालन आहे. 'बटाट्याची चाळ' किंवा 'असा मी असामी' काय, चाळीत अवघं आयुष्य गेलेल्या मराठी पापभीरू संस्कृतीचे दर्शन घडविणारे हे अनोखे चित्रण, व्यक्तिस्वभावाचे सूक्ष्म रेखाटन, मराठी साहित्यात क्वचितच उमटलेले होते. 'पुल' ह्या आपल्या श्रेष्ठ लेखनातून जेव्हा हे चित्रण करीत होते, त्याच वेळेला 'टाइम्स ऑफ इंडिया'मधून आर.के.लक्ष्मण 'You Said It' या आपल्या दैनिक विनोदी सूक्ष्म छटांमधून अप्रतिम व्यंगचित्रे रेखाटत होते. या दोन्ही महान कलावंतांची माध्यमे वेगळी होती; परंतु सर्व थरांतल्या वाचकांना या दोघांनी अक्षरशः भारावून टाकले होते. साधारण १९५०-५५च्या दरम्यान पु.ल.देशपांडे आणि आर.के.लक्ष्मण हे दोन समाज भाष्यकार एकाच वेळी महाराष्ट्रात तळपत होते. जणू दोन सूर्य आकाशात एकाचवेळी तळपत होते. तेराव्या शतकात ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीतून जशी ज्ञानमयी अक्षय प्रकाशाची तेजस्वी दिवेलागण केली, तसेच प्रकाशदिवे 'पुलं'नी आपल्या समग्र वाङ्मयातून सहजपणे लावले. ज्योतीला जसे पाठ आणि पोट दोन्हीही नसते. तेवत असलेली ज्योत जशी चहूअंगाने प्रकाशच परावर्तित करते ना, त्याप्रमाणे 'पुलं'नी आपल्या प्रत्येक व्यक्तिचित्रणातून आनंदाचा, तसेच खळखळून हसवणारा प्रकाश परावर्तित केला हे सत्य कधीच, कोणालाही नाकारता येणार नाही.

पु.ल.देशपांडे हे अभिजात मराठी साहित्यविश्वातले सर्वांत मोठे आश्चर्यपर्व होते. त्यांचे अवघे आश्चर्यवत् साहित्य हे मानवी स्वभावाचा, विशेषतः मध्यमवर्गीय जाणीव विश्वाचा सखोल वेध घेणारे होते. त्यांचे साहित्य वाचत असताना, चार्ली चाप्लिनचे सिनेमे पाहताना जसे न थोपवता

येणारे हसू यायचे, तसाच आणि तेवढाच हास्याचा अनुभव ''पुलं''च्या समग्र लेखनाने दिला. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'मराठी वाङ्मयाचा गाळीव इतिहास' हे पुस्तक. मी 'पुलं'चे समग्र साहित्य वाचले. त्यांचे एकपात्री आणि बहुपात्री प्रयोग अनेक वेळेला पाहिले. त्यांची सर्व नाटके पाहिली. त्यांचा सिनेमातला अभिनयसुद्धा अनुभवला. त्यांचे पेटीवादन ऐकले. त्यांना अनेक संगीत मैफलीत भरभरून दाद देताना प्रत्यक्ष, त्यांच्या शेजारी बसून अनुभवले. त्यांनी दिलेले संगीत ऐकले. त्यांच्या प्रस्तावना तर मराठी साहित्यविश्वातला मानबिंदू होता, ते वाचले. त्यांच्याशी गप्पा मारण्याचा भाग्ययोग मला मिळाला. हे आणि असे अनेक क्षण मजपाशी आजही रेंगाळत आहेत. त्याच्या बळावर मला सतत वाटते की, 'पुलं'सारखे शतकाशतकात एखादेच व्यक्तिमत्त्व प्रगट होत असते.'पुल' केवळ साहित्यिक कलावंत नव्हते, तर ते अत्यंत रसिक आणि दर्दी होते. कलावंतामधले उत्तम गुण हेरण्याची अलौकिक शक्ती त्यांच्यापाशी होती.

१९४०-४५च्या दरम्यान हे ब्रह्मकमळ मराठी साहित्य आणि सांस्कृतिक विश्वात प्रथमच उमलले आणि या ब्रह्मकमळाला चैतन्याचा अक्षय वर प्राप्त झाला होता; परंतु हे ब्रह्मकमळ कोमेजण्याच्या शापातून पूर्णपणे मुक्त झाले होते. विसाव्या शतकाच्या प्रारंभबिंदूपासून महाराष्ट्रातले एकूणच समग्र सांस्कृतिक जीवन हा 'पुलं'च्या अखंड ध्यासाचा विषय झाला होता आणि तो 'पुलं'च्या अखेरच्या श्वासापर्यंत टिकला होता. संपूर्ण विसाव्या शतकावर ज्या ज्या श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वांनी आपल्या कलेची आणि साहित्याची मोहोर उमटवली होती, त्या त्या प्रत्येक व्यक्तिमत्त्वाला 'पुलं'नी आपल्या जिवंत, रसरसत्या शब्दांमधून अमरत्व प्राप्त करून दिले. त्यांच्या अफाट कर्तृत्वाची सत्य जाणीव ओघवत्या शैलीत करून दिली. सर्वच क्षेत्रांतल्या नामवंतांना कुर्निसात केला. बालगंधर्व, केशवराव भोसले, दीनानाथ मंगेशकर यांच्यापासून ते थेट लता मंगेशकर, बेगम अख्तर असे श्रेष्ठ गायकगायिका ; ग.दि.माडगूळकर, सुरेश भट, बा.भ.बोरकर यांच्यासारख्या अनेक कवींवर, राम मनोहर लोहिया, नाथ पै, गांधी यांच्यासारख्या अनेक राजकीय नेतृत्वांवर, बाबा आमटे, विनोबा भावे यांच्यासारख्या अनेक सामाजिक कार्यात आकंठ बुडालेल्या श्रेष्ठ पुरुषोत्तमांवर अमर व्यक्तिचित्रे लिहिणारे 'पुल' हे खरोखर अजब असे साहित्यिक व्यक्तिमत्त्व होते. आणखी एक सत्य सांगायचे तर कर्णासारखे दानधर्म करणारे विसाव्या शतकातले

**नवं कोरं**


# डॉ. आनंद यादव

## एक
## साहित्यिक
## प्रवास

संपादक

**डॉ. कीर्ती मुळीक आणि**
**श्री. अप्पासाहेब जकाते यादव**

**किंमत :४९५/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**




आनंद यादव यांची प्रत्येक कलाकृती लोकप्रिय ठरली. असे असले तरी स्वतःत न रमता, त्यांनी आपुलकीने अनेक नवोदित लेखकांना मार्गदर्शन केले. त्यांच्या लेखनाला प्रोत्साहन दिले; ग्रामीण साहित्य चळवळ केली नि त्या बाबतीत सामाजिक धुरा आपल्या खांद्यावर घेतली. यादव यांची ही सामाजिक बांधिलकी मोठी आहे. 'कलावंत केवळ स्वतःत रमणारा असतो,' या विधानाला यादव अपवाद आहेत. साहित्यदिंडीतील प्रत्येक वारकऱ्याला त्यांनी आपल्यात सामावून घेतले. त्यामुळे साहित्यरसिकांनी त्यांना संतपद दिले. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांना मोठ्या संख्येने मतं देऊन निवडले. यादव यांना मिळालेली लोकमान्यता सहन न होऊन काही मतलबी व्यक्तींनी कुटिल राजकारण केले. वैचारिक वाद ही हिंदू संस्कृती आहे; परंतु हे वाद हिंसक पातळीवर नेण्यात आले. यादव या साहित्यसंमेलनासाठी येऊ शकले नाहीत. ही या समाजाची शोकांतिका आहे. प्रतिभावंतांना या गोष्टींविषयी जीवनात ना खंत, ना खेद राहतो. स्वतःच्या कथा, कविता, कादंबऱ्यांमधून त्यांनी बोली भाषेतून निवेदन व संवादलेखन केले. स्वतंत्र लेख लिहून त्यांनी बोली भाषेचे सामर्थ्य जाणकारांच्या लक्षात आणून दिले. यादव यांच्या या कृतीमुळे मराठी ग्रामीण साहित्याला नवे परिमाण प्राप्त झाले.

पु.ल.देशपांडे आज तरी दुसरे नाहीत. कित्येक लाख रुपयांचे दान सामाजिक कार्यासाठी अर्पण करणारे ‘पुल’ हे खरोखरच नावाप्रमाणे पुरुषोत्तम होते. साहित्यानंद, कलानंद, दानानंद भोगणारे ‘पुलं’ सारखे अचाट व्यक्तिमत्त्व अभावानेच आढळते.

‘पुलं’नी आपल्या अक्षर साहित्यातून विसाव्या शतकातल्या सर्वच क्षेत्रांतल्या श्रेष्ठ व्यक्तींना आपल्या अनोख्या शैलीतून अमरत्व प्राप्त करून दिले. साहित्य, संगीत, कला या त्रिवेणी संगमावर वाढलेल्या ‘पुलं’नी स्वत:ला या सर्वच क्षेत्रांत अक्षरश: झोकून दिले होते. जन्मदत्त प्रज्ञा आणि प्रतिभा लाभलेल्या आणि सुसंस्कारित लेखणीच्या बळावर मराठी साहित्याला संपन्न करणारे ‘पुल’ हे कलावंत, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, उत्तुंग राजकीय नेते आणि श्रेष्ठ, तसेच अभिरुचीसंपन्न वाचक यांच्यामधले जणू एक भक्कम ‘पूल’च होते. ‘गणगोत’ ह्या आपल्या पहिल्याच अमर व्यक्तिचित्र संग्रहाच्या प्रस्तावनेत ‘पुल’ म्हणतात, ‘‘वाढत्या वयाबरोबर पुढे पाहण्याऐवजी मन मागेच पाहण्यात रमते... आयुष्याच्या या प्रवासात किती तरी उत्तुंग माणसे भेटली. नात्याची, बिननात्याची, कुणी पोटापाण्याच्या व्यवसायात भेटली, कुणी मैफलीत भेटली, कुणाकुणाच्या बैठकीत सामील होण्याचे योग आले, कुणी प्रवासात भेटले, कुणी शेजारी म्हणून लाभले, कुणी आळीतले आळीकर, कुणी गावातले गावकर, कुणी जवळ आले, कुणी खेचून जवळ घेतले, काहींचे आकर्षण वाढले, तर काहींचे अचानक कमीसुद्धा झाले.’’

ही जी अनेक थरांतली अनंत माणसे जी ‘पुलं’ना भेटली त्या सर्वांनीच त्यांना अक्षरश: खेचून घेतले. अत्यंत स्नेहार्द्र, आपुलकीच्या शुद्ध, सात्त्विक नजरेने त्या त्या श्रेष्ठ व्यक्तीकडे पाहताना ‘पुलं’ना त्या त्या व्यक्तीचे जे अलौकिक दर्शन घडले त्यांची जिवंत व्यक्तिचित्रणे म्हणजे १९६६साली प्रसिद्ध झालेले ‘गणगोत’ हे पहिले व्यक्तिचित्रणात्मक पुस्तक अमरत्व घेऊनच जन्माला आले. १९५२ ते १९६१या दहा वर्षांत त्यांनी ही शब्दशिल्पे निर्माण केली. बालगंधर्व हे तर ‘पुलं’चे काळीजच होते. त्यांच्यासंबंधी लिहिताना ‘पुल’ भारावून आपल्या भावना प्रकट करतात, ‘‘बालगंधर्वांचे गाणे आणि अभिनय ही आमच्या कुटुंबातील वादापलीकडची गोष्ट होती. आमच्या घरातल्या सांस्कृतिक जीवनाचे हे कुलदैवत आहे. मी संगीताची आराधना वयाच्या सातव्या-आठव्या वर्षी सुरू केली. बावीस रुपये किमतीच्या एका पेटीच्या खोक्यातून मी सुरांना शोधण्याचे प्रयत्न केले.

माझ्या पेटीवादनाला नारायणराव बालगंधर्वांची पहिली सम आणि शाबासकी जेव्हा मिळाली, त्यावेळी हॉलच्या एका कोपऱ्यात कुणाच्याही लक्षात येणार नाही सहसा अशा जागी गर्दीत बसलेल्या माझ्या वडिलांच्या अंत:करणातला गहिवर नारायणराव बालगंधर्वांचा हात माझ्या पाठीवरून फिरताना मी पाहिला होता.''

अशा श्रेष्ठ बालगंधर्वांविषयी लिहिताना 'पुलं'नी सहजपणे लिहिले आहे की, बालगंधर्वांसारखा स्वर शतकाशतकात एखाद्याच वेळी ऐकायला मिळतो. मनात येते की, पु.ल.देशपांडे यांच्यासारखे प्रतिभावान स्वयंसिद्ध लेखकसुद्धा व्यक्तिचित्रणासारख्या वाङ्मयीन प्रकारात शतकाशतकात एखादेच जन्माला येतात. वयाच्या अवघ्या चोविसाव्या वर्षी १९४३साली 'अभिरुची'च्या अंकात प्रथमच पुरुषोत्तम देशपांडे या नावाने 'पुलं'नी अण्णा वडगावकर हे व्यक्तिचित्र लिहिले आणि मराठी भाषेतल्या व्यक्तिचित्रांच्या कालखंडास पुन्हा नव्याने सुरुवात झाली. १९४४साली 'भय्या नागपूरकर' हे व्यक्तिचित्र प्रकट झाले. 'व्यक्ती आणि वल्ली' मराठी साहित्यात अमरत्व प्राप्त करून घेण्यासाठी जन्माला आल्या. विसावे शतक जेव्हा साठीत शिरले तेव्हा 'पुलं'नी आपली चाळिशी ओलांडली. तेव्हा म्हणजे १९५८मध्ये 'पुलं'ची 'बटाट्याची चाळ' अक्षरांमधून साकार झाली आणि त्याच चाळीतले काही भाडेकरू 'व्यक्ती आणि वल्ली'मध्ये साकार झाले. १९४३पासून सुरू झालेली पु.ल.देशपांडे यांची व्यक्तिचित्रणे, ती माणसे, गेली सहा-सात तपं उलटून गेल्यावरसुद्धा मराठी मनात घर करून बसली आहेत. आपल्याशी आजही संवाद साधत आहेत. आपल्याबरोबर उठताहेत, बसताहेत, तुमचा-आमचा ह्या व्यक्तींशीं घनिष्ठ संबंध आजही तसाच आहे. 'बटाट्याची चाळ' काय, 'वाऱ्यावरची वरात' काय, 'असा मी असामी' काय, एकूणच 'पुलं'ची सर्वच व्यक्तिचित्रे काय, आपण त्या सर्वांशी मनाने आजही जोडले गेलेलो आहोत. शहराशहरांमधल्या चाळी आता जवळजवळ नष्ट झाल्या आहेत, चाळसंस्कृती आता इतिहासजमाच झाली आहे. चाळीतल्या माणुसकीला उंच उंच टॉवर्सनी अक्षरश: गिळून टाकलं आहे. तरीही 'पुलं'ची ही अजरामर चाळ संस्कृती,त्या चाळीतली माणसे, त्यांचे माणुसकीचे गहिवर आजही आपल्याला मोहवून टाकत आहेत. त्यानंतरच्या चार पिढ्यासुद्धा झाल्या. आजही तरुण वाचकांना पु.ल.देशपांडे ह्यांच्या समग्र साहित्याचे वेड तसेच आहे. त्यात तसूभरसुद्धा फरक पडलेला नाही. त्यामुळेसुद्धा असेल कदाचित, परंतु 'व्यक्ती आणि वल्ली'मधील 'हरितात्या', 'नारायण', 'अंतू बर्वा',

'चितळे मास्तर', 'बापू काणे' यांच्यासारखी असंख्य माणसे आपल्याला आजही भेटतात आणि 'पुल' आपल्याला अजूनही पावलापावलांवर स्मरत राहतात... 'लॉरेल आणि हार्डी' ही अजरामर जोडी, 'चार्ली चाप्लिन' यांच्या मूकपटांना काही दशके उलटली तरी त्यांच्या विनोदी अभिनयाला जे अमरत्व प्राप्त झाले, तेच अमरत्व पु.ल.देशपांडे यांच्या समग्र वाङ्मयाला, त्यातल्या विनोदाला प्राप्त झाले, हे सत्यच आहे. विनोदी साहित्य म्हणजे चुटक्यांचा संग्रह नव्हे याचे भान श्रेष्ठ विनोदी साहित्याचे पहिले शिल्पकार चिं.वि.जोशी यांनी बरोबर हेरले होते आणि 'विनोदाचा मळा' त्यांनी बहराला आणला. याच विनोदाच्या मळ्याचे हिरवेगार, मन प्रसन्न करणारे गालिचे, विश्वभर जिथे जिथे मराठी माणूस राहतो आहे तेथपर्यंत 'पुलं'नी खऱ्या अर्थाने बहरवले. निर्भेळ विनोदाला व्यक्तिचित्रणांच्या कोंदणात स्थान दिले. 'माझे काही हितशत्रू' असोत वा 'शेवटचे कविसंमेलन' असो, हसता हसता पुरेवाट होते. 'पुलं'चे हे विनोदी चित्रण प्रत्यक्ष अनुभवतानाचा हा सार्वत्रिक अनुभव आहे.

महाराष्ट्रामध्ये जे श्रेष्ठ साहित्यिक एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जन्माला आले त्यात नाटककार राम गणेश गडकरी, अर्थातच कवी गोविंदाग्रज ह्यांची मोहिनी त्यावेळी मराठी भाषेवर पडलेली होती. राम गणेश गडकरी यांना अवघे ३४ वर्षांचे आयुष्य लाभले होते. त्यांचा मृत्यू २३जानेवारी १९१९रोजी झाला आणि योगायोग असा की, पु.ल.देशपांडे यांचा जन्म गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर नऊ महिने आणि सोळा दिवसांनी म्हणजे ८ नोव्हेंबर १९१९ रोजी मुंबईत झाला. जणू राम गणेश गडकरी यांनी पुन्हा जन्म घेतला की काय असे मनी यावे, तसे वाटावे एवढे उत्तुंग कार्य 'पुलं'नी केले. 'पुलं'चा कालखंड आहे ८ नोव्हेंबर १९१९ ते ८ जून २०००. 'पुलं'ना ८१ वर्षांचे आयुष्य लाभले. योगायोगाने २०१८-१९ हे सबंध वर्ष म्हणजे राम गणेश गडकरी यांचे स्मृती शताब्दी वर्ष आहे आणि पु.ल.देशपांडे यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे.

सत्य एकच आहे की, पु.ल. देशपांडे म्हणजे महदाश्चर्य, महाराष्ट्रात मराठी भाषा आणि संस्कृती यांचा उत्तुंग आविष्कार म्हणजे पु.ल.देशपांडे. एक निश्चित की, 'पुलं'सारखा कारुण्याची झालर असलेला विनोद मराठी अभिजात साहित्यात पुन्हा कदाचित उमलणार नाही. 'पुलं'चे सद्भाग्य असे की, त्यांची लेखणी जेवढी जबरदस्त होती, तेवढीच जबरदस्त व्यक्तिमत्त्वे त्यांच्या कालखंडात सर्व क्षेत्रांत वावरत होती. त्यांचे कार्यकर्तृत्व प्रकट

करण्याचे अनोखे सामर्थ्य 'पुलं'पाशी होते. तो एक मणिकांचनयोग महाराष्ट्रात त्या काळात जुळून आला होता...

अशी तेजभारली लेखणी मराठी साहित्यात पुन्हा प्रकट होईल का? कुणास ठाऊक! परंतु एक मात्र निश्चित की, *असा पुरुषोत्तम पुन्हा होणे नाही...*

**-वामन देशपांडे**

**मोबा. ९३२४६१५०७७**

◆

## आवाहन


पुस्तक वाचताना वाचक त्या पुस्तकाशी एकरूप झालेला असतो. काही वेळेला तर तुमच्या जीवनाला कलाटणी देण्याचं सामर्थ्य एखाद्या पुस्तकामध्ये असतं. आम्ही नेहमीच वाचकांना दर्जेदार पुस्तकं वाचण्याचा आनंद दिला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसचं असंच एखादं तुम्हाला आवडलेलं, भावलेलं पुस्तक असेल तर त्या पुस्तकाबद्दलचा अभिप्राय आम्हाला साधारण ५०० ते ८००शब्दांत लिहून कळवा. अभिप्रायाबरोबर आपला संपूर्ण पत्ता आणि मोबाईल नंबर देण्यास विसरू नये. ते पुस्तक आपल्याला का आवडलं ते लिहायचं आहे. आपल्या अभिप्रायाचं स्वागत असेल. यासाठी मानधनही दिलं जाईल. अभिप्राय छापण्याबाबतचा अधिकार संपादकांच्या अधीन राहील. त्या संबंधात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही आणि अस्वीकृत अभिप्राय परत पाठवला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच या संदर्भात दूरध्वनी-वरून कोणीही संपर्क साधू नये. आपला अभिप्राय आमच्या या ई-मेलवर mmgj@mehtapublishinghouse.com किंवा खालील पत्त्यावर पोस्टाने/कुरियरने पाठवावा.

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

**१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवन समोर, पुणे ३०.**

# अभिप्राय

*मातांना मानसिक, शारीरिकदृष्ट्या सबळ बनवण्यासाठी केलेले मार्गदर्शन*




## द मदर डान्स

**लेखक : हॅरिएट लर्नर**
**अनुवाद : डॉ. जयश्री गोडसे**
**पृष्ठसंख्या : ३०४ । किंमत : ३२०/-**

एका समंजस आईला, कोणकोणत्या प्रकारचे ताण सहन करावे लागतात हे सांगणारं , डोळ्यांत तेल घालून आपली मुले वाईट मार्गाला जाणार नाहीत ना, यासाठी केवळ धाकदपटशा न दाखविता, पण वेगवेगळ्या मार्गाने त्यांची मने कशी वळवता येतील याचा विचार करायला लावणारे पुस्तक म्हणजे 'द मदर डान्स'.

बदलत्या वयानुसार वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळ्या विषयांना सामोरे जात त्याविषयी धोरण आखण्याची आईची जबाबदारी जाणीवपूर्वक पार पाडण्यासाठी विश्लेषण करण्याची सवय लावणे, स्वत:लाही तपासून पाहणे कसे महत्त्वाचे आहे हे ह्या पुस्तकातून लेखिका समजावून देते. लेखिका मानसोपचारतज्ज्ञ आहे आणि त्यातूनही कुटुंब व नातेसंबंध यातीलही खास शिक्षण तिने घेतले आहे. समुपदेशनाचे कामही ती करते. त्यामुळे खूपशी उदाहरणे स्वत:च्या मुलांच्या संबंधातील, तसेच तिच्याकडे येणाऱ्या पालक व मुले यांच्या संबंधातील, तिच्या लेखनात येतात. साधी, सोपी भाषा, नर्म विनोद यामुळे पुस्तक वाचताना प्रसन्न वाटत राहते. छाया दातार

लेखिकेने आई व मुले यांच्या संबंधांचं चार टप्प्यांत विभाजन केलं आहे. 'आरंभ' या पहिल्या टप्प्यात गर्भधारणा आणि बाळाचा जन्म, या कालावधीत थोडी संभ्रमित अवस्था असते. ज्यामध्ये आपण माता होण्यासाठी योग्य आहोत का, याचा विचार करण्याची संधी मिळते आणि त्याची आवश्यकता असते, असे प्रतिपादन केले आहे. त्याचवेळी एक व्यक्ती म्हणून, स्त्री म्हणून तुमचा एक मार्ग तुम्हाला खुणावत असतो आणि त्याच वेळी तुमच्या मुलाशी संलग्न माता म्हणून नवीन आयुष्याला सुरवात होत असते.

मुलांना त्यांचे असे व्यक्तिमत्त्व हळूहळू प्राप्त होत जाते. त्यांच्यावर संस्कार करण्याच्या जबाबदारीने आई सतत काळजी करायला लागते. मुले पडली, धडपडली तरी त्यांची काळजी आणि त्याच वेळी हे सर्व आपल्या चुकीमुळे घडतंय का? आपण पुरेसे जागरूक नाही आहोत का? असे स्वत:कडे दोषी म्हणून पाहण्याचे हे दिवस. मुलांचे हट्ट चुकीचे असतील तर आपली मते न लादता त्यांना कसे पटवायचे, किती प्रमाणात त्यांना स्वातंत्र्य द्यायचे आणि किती प्रमाणात ती आपल्यावर अवलंबून आहेत याचे भान त्यांना द्यायचे, अशी तारेवरची कसरत आईला करावी लागते, असा आईच्या अग्निपरीक्षेचा टप्पा हा दुसरा टप्पा आहे.

तिसरा टप्पा ‘मोठी मुले-मोठी आव्हाने’ यावर लक्ष केंद्रित करतो. येथे अन्नाच्या योग्य सवयी आणि लैंगिकतेचे भान येऊ लागल्यावर आईची उडणारी धांदल याचे अतिशय सुंदर वर्णन लेखिकेने केले आहे. आपल्याकडेही आईच्या जिवाला या काळामध्ये घोर लागतोच. विशेषत: मुलीच्या आईला! पण काही प्रमाणात मुलाच्याही बाबतीत हे खरे असते. समाजाच्या संकेतांविरोधी काही घडत नाही ना, याची काळजी जीव पोखरून काढते.

चौथा टप्पा म्हणजे मुले शिक्षण-नोकरीच्या निमित्ताने दूर गेल्यावर, मातेचे मन कसे होते याचे वर्णन करणारा आहे. आईबरोबरच वडीलही मुलांच्या दूर जाण्याने उदास असतात, असा तिचा अनुभव आहे. तिच्या मैत्रिणीने मात्र ह्या ‘रिकामे घर सिंड्रोम’ संकल्पनेला खूप विरोध केला आहे. तिच्या मते मुले घर सोडून गेली की पालकांना आयुष्यच राहत नाही हे म्हणणे चुकीचे आहे.

तिने तरुण मातांना अनेक टिप्स दिल्या आहेत. काळजी आणि सृजनता यांचे नाते परस्परविरोधी असते म्हणूनच लेखिका आयांना सल्ला देते, की तुम्ही तुमच्या मनाची शांतता कशी टिकेल याचा विचार करा. जॉगिंग, ध्यानधारणा, एखादा छंद असे काही उद्योग निवडा.

लेखिका आवर्जून सांगते, की योग्य तऱ्हेने मातृत्वाच्या जबाबदाऱ्या निभावल्या गेल्या तर खरोखरच ‘मातृत्वाचा जल्लोष’ अनुभवता येतो. ‘एखाद्या अनुभवी मातेने मारलेल्या गप्पा’ असे या पुस्तकाचे स्वरूप असल्याने आणि योग्य अशी उदाहरणे दिल्यामुळे ते वाचनीय झाले आहे. जयश्री गोडसे यांनी या पुस्तकाचा रसाळ अनुवाद केला आहे.


**- छाया दातार**

**(शब्दरुची, मे २०१८)**

◆◆◆

नवं कोरं

# वर्क लेस, डू मोअर




लेखक
**जॅन येगर**


अनुवाद
**दिलीप गोगटे**

**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

एक प्रकार नव्यानेच वाढीला लागला आहे. त्याचे नाव विचलन. एखाद्या माणसाचे लक्ष त्याच्या मूळ मुद्द्यापासून विचलित होऊन अन्य कमी महत्त्वाच्या बाबींकडे वळते. उदा. कामात व्यग्र असतानाच सतत ई-मेल्स पडताळत राहणे, बैठका चालू असताना मोबाईल कॉल स्वीकारणे, तसेच इंटरनेटवर उगीचच अंतहीन सर्फिंग करत राहणे इत्यादी. त्यामुळे मूळ काम बाजूला राहाते. परिणामी, कामाचे तास वाढलेले असूनही कामावर लक्ष केंद्रित न होण्यामुळे अपेक्षित रिझल्ट्स वेळेत मिळत नाहीत. साहजिकच तणाव पातळ्यांमध्ये धोकादायक वाढहोत आहे. त्यामुळे आता आपण वेळेचे अधिक प्रभावी नियंत्रक बनणे गरजेचे आहे. विचलकांचा प्रभावी मुकाबला करण्याची आपली जबाबदारी वाढलेली आहे आणि हे भान आपणास आतूनच यायला हवे. हे पुस्तक तुम्हाला ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, वाढलेल्या वेळात कामासाठी, सहसंबंधांसाठी आणि तंत्रविषयक दडपणांचा मुकाबला करण्यासाठी प्रभावी, उपयुक्त साधने देईल.

## अभिप्राय

*क्रिकेटचं अस्त्र वापरून तालिबान्यांशी*
*लढणाऱ्या झुंजार मुलीची कथा*




# द तालिबान क्रिकेट क्लब

**लेखक : तिमिरी एन. मुरारी**
**अनुवाद : अमृता दुर्वे**
**पृष्ठसंख्या : ३०४ । किंमत : ३२०/-**

त्यांचं लहानपण खूपच तणावात गेलं. आधी आजूबाजूला रशियन सैनिक असायचे, नंतर धर्मरक्षक.... यादवी युद्धाच्या धुमःश्चक्रीत त्यांचं आयुष्य होरपळून निघालं, शिक्षण थांबलं, बेरोजगार, नैराश्य वाट्याला आलं. त्यातच दैनंदिन आयुष्यात तालिबान्यांचे निर्बंध मुली, महिलांना डोक्यापासून पायांपर्यंत बुरखा, एकटीनं घराबाहेर पडण्यास बंदी, मोठ्यानं हसायचं, बोलायचं नाही. तर पुरुषांनाही दाढी ठेवण्यासारखी अनेक बंधनं....अशातच एक दिवस त्यांना या साऱ्यातून बाहेर पडण्यासाठी आशेचा किरण दिसला आणि मग त्यांनी जीवतोड मेहनत करत, आलेल्या प्रत्येक संकटाला सामोरे जात या संधीचं सोनं करण्याचा निर्णय घेतला आणि या साऱ्यासाठी त्यांना बळ, प्रेरणा आणि साथ दिली एका तरुणीनं...

स्त्रियांच्या जागा फक्त दोनच -एक घर आणि दुसरी कबर, अशी मानसिकता असलेल्या तालिबान्यांशी क्रिकेटचं अस्त्र वापरून लढणाऱ्या रुख्सानाची कथा तिमिरी एन.मुरारी यांनी 'द तालिबानी क्रिकेट क्लब' या पुस्तकात चितारली आहे. त्याचा अनुवाद अमृता दुर्वे यांनी केला आहे.

रुख्साना ही अफगाणिस्तानातील 'काबूल डेली'मध्ये काम करणारी पत्रकार. आजारी आई आणि धाकट्या भावाबरोबर ती काबूलमध्ये राहते. तालिबान्यांनी अफगाणिस्तानच्या माजी अध्यक्षांना भर चौकात मृत्युदंड दिल्यानंतर, त्याची बातमी लिहिण्याच्या तयारीत असताना, तालिबान राजवटीतले एक मंत्री आणि धर्मरक्षक तिला कार्यालयातून मारहाण करून बाहेर काढतात. नोकरी गेली तरी ती टोपणनावानं परदेशी वृत्तपत्रांना बातम्या पाठवत असते. नेलपेन्ट लावलं म्हणून तरुणीची नखं उखडली... केवळ तालिबान्यांच्या नियमानुसार विवाह केला नाही म्हणून दाम्पत्याला गोळ्या घालून मृत्युदंड... यांसारख्या तालिबानी अत्याचाराच्या बातम्या ती पाठवत असते.

निर्बंध, अत्याचारांमुळे तालिबान्यांची आणि अफगाणिस्तानची जगभरात जी प्रतिमा निर्माण झालेली असते, ती बदलण्यासाठी देशात क्रिकेट सामने भरवण्याची घोषणा तालिबानी करतात. जिंकणाऱ्या टीमला पाकिस्तानात जाऊन प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार असते. कोणालाही टीम करण्याची मुभा असते; पण तालिबान्यांकडून कला, क्रीडा यांसह मनोरंजनाच्या सर्वच गोष्टींवर बंधनं असल्यानं क्रिकेट कोणालाच खेळता येत नसतं. वडिलांच्या नोकरीमुळं काही वर्षं दिल्लीत राहिलेली रुख्साना मात्र तिथं कॉलेजच्या टीममधून क्रिकेट खेळलेली असते. तिचा नियोजित वर

अमेरिकेत असल्यानं तिला देशाबाहेर पडणं शक्य होणार असतं; पण आपल्या भावंडांना या जुलमी राजवटीतून बाहेर पडण्याची हीच मोठी संधी आहे, असा विचार करून ती त्यांची क्रिकेट टीम तयार करते.

जिथं छोट्या बाळाला दवाखान्यात घेऊन जाणाऱ्या महिलेला ती महरमशिवाय (रक्ताच्या नात्यातील पुरुष सोबती) घराबाहेर पडली म्हणून भर रस्त्यात गोळ्या घातल्या जातात. अशा वातावरणात रुख्सानानं भावंडांना क्रिकेट शिकवणं म्हणजे तिच्यासकट भावंडांच्याही मृत्यूला आमंत्रण होतं; पण त्यातूनही ती शक्कल लढवते. साऱ्यांना प्रशिक्षण देते. मैदानावर क्रिकेटचा सराव करणंही सोपं नसतं. कारण जागोजागी सुरुंग पेरलेले असतात. कोणत्याही क्षणी पाय पडून तो फुटण्याची भीती असते. एक सरावादरम्यान उंचावरून बॉल पडून सुरुंगाचा स्फोट होतो; पण तरीही या तरुणांचं मनोबल कमी होत नाही. त्यात रुख्सानाचा नियोजित पती तिला दगा देतो. एक तालिबानी मंत्री तिच्या प्रेमात पडून लग्नासाठी मागं लागल्यामुळे स्वतःचा आणि तिचा 'महरम' असलेल्या लहान भावाचा जीव वाचवण्यासाठी स्वतःच्याच घरात अज्ञातवासात राहण्याची वेळ तिच्यावर येते.

सारे धोके पत्करून रुख्साना टीम तयार करते. त्यासाठी तिला तिचा भारतातला प्रियकरही अफगाणिस्तानात येऊन मदत करतो. अखेरच्या टप्प्यात काही कारणानं तिला टीममध्ये (अर्थातच तालिबान्यांची नजर चुकवून पुन्हा पुरूष वेशात) खेळणं भाग पडतं. त्यांची टीम जिंकते; पण ऐनवेळी तालिबानी मंत्री शब्द फिरवतो, तरीही ती क्लृप्ती लढवून टीमसह देशाबाहेर पडते. रुख्सानाची कथा वाचत असताना क्षणाक्षणाला उत्कंठा वाढत जाते. त्याचबरोबर तालिबान्यांचे अत्याचार थरकाप उडवतात.


लेखकानं अफगाण नागररिकांचं दैनंदिन जीवन बारकाव्यानं टिपलं आहे. जुलमी राजवटीपासून दूर जाण्यासाठी काबूलमधला प्रत्येक जण आसुसलेला असतो, त्यासाठी वाटेल त्या संकटाला तोंड देण्यास तयार असतो, अथवा त्यांना देशाबाहेर नेण्यासाठी काही जण त्यांची लुबाडणूक करतात. प्रत्येकाच्याच आयुष्यात पावलापावलावर असलेले धोके आणि तरीही त्यांची जगण्याची आणि आपली स्वप्नं पूर्ण करण्याची असलेली उमेद या कथेतून दिसते.

**- सकाळ, ३ डिसेंबर, २०१७**

◆◆◆

**नवं कोरं**

# बीइंग मॉर्टल




लेखक : **डॉ. अतुल गवांदे**
अनुवाद : **डॉ. वसु भारद्वाज**

**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

आपण आता औषधोपचाराने ग्रासलेल्या वार्धक्याकडे आणि मृत्यूकडे जात आहोत; त्यावर आपण अशा पद्धतीने उपचार करतो, जणू काही तो काही आजार आहे. एक गोष्ट खरी आहे की, या सरत्या वर्षांसाठी केवळ औषधोपचारच गरजेचे नाहीत, तर या स्थितीतही आयुष्य अर्थपूर्ण, शक्य तेवढे संपन्न आणि परिपूर्ण असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. हे पुस्तक त्या दिशेच्या प्रवासाचे केवळ सखोल चिंतन नसून, एक आवश्यक आणि सूक्ष्म दृष्टीने केलेले अवलोकन आहे. ते आयुष्याच्या अंतिम काळात, स्वतःच्या मर्जीने, प्रतिष्ठेने आणि आनंदाने कसे जगावे, याचे मार्गदर्शन करते.

गेल्या काही दशकांमध्ये वैद्यकीय क्षेत्रात उपशामन शुश्रूषेचा प्रांत नव्यानं आलाय, तो मृत्यूच्या मार्गावर असणाऱ्या रुग्णांच्या शुश्रूषेमध्ये या पद्धतीचा विचार आणण्यासाठीच आहे आणि ही पद्धत वाढत आहे, हीच पद्धत गंभीर आजारानं ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठीही वापरली जाते, मग तो मृत्युमार्गावर असो किंवा नसो.

# मानवतेचा महान सेवक अब्राहम लिंकन

**– रा. वा. शेवडे गुरुजी**


अॅबे आता एकोणीस वर्षांचा झाल्यामुळे त्याला सगळे अब्राहम म्हणू लागले. त्याची उंच बळकट शरीरयष्टी, कष्ट करण्याची हौस, त्याचा सरळ प्रामाणिक स्वभाव, त्याची बहुश्रुतता, हास्यविनोद करून सर्वांना आनंदी ठेवण्याची त्याची वृत्ती इत्यादींमुळे तो सर्वांना हवाहवासा वाटे. वाचनातून त्याने आपल्या देशाची बरीच माहिती मिळविली होती. त्याला वाटे, दूर प्रवासाला जावे, सारे डोळ्यांनी पाहावे, पण ही संधी अब्राहमला मिळणार कशी? तो गरीब होता. त्याच्याजवळ पैसे नव्हते. एखादा डॉलर त्याने मिळविला, तर घरखर्चाला त्याला तो द्यावा लागे.

असेच काही दिवस गेले आणि त्यांच्या वस्तीवर जेम्स जंट्री या नावाचा एक व्यापारी आला. मिसिसिपी नदीतून 'न्यू ऑर्लिन्स' शहराकडे त्याला विक्रीसाठी माल न्यायचा होता. या कामी एका तगड्या, निर्भय मर्दाची त्याला गरज होती. सगळ्यांनी अब्राहम लिंकनचे नाव सुचविले. दर महिन्याला आठ डॉलर पगार ठरला. तीन महिन्यांचा करार. शिवाय वाटखर्चाला लागेल ते निराळे.

अब्राहमची आई त्याला सोडायला तयार होईना. आठ डॉलर्स आगाऊ घेऊन टॉम अब्राहमला जाऊ देण्यास तयार होते. जेम्स जंट्रीचा मुलगा अॅलन सोबत जाणार होता. संरक्षणासाठी भरपूर शस्त्रे देण्यात येणार होती.

अब्राहम आनंदाने जाण्यास तयार झाला.

अॅलनच्या साहाय्याने आठच दिवसांत अब्राहमने एक तराफा तयार केला. दोन वल्ही व एक लांब काठी त्यांनी बनविली. धान्य, बटाटे, मध, फळ-फळावळ इ. माल भरण्यात आला आणि ओहियो नदीतून त्यांचा प्रवास




सुरू झाला. ॲलन आणि अब्राहम पाळीपाळीने जेवण बनवीत. ताशी पाच-सहा मैल गतीने रोज पन्नास-साठ मैल ते प्रवास करीत.

ओहिओ मिसिसिपीला मिळते. ते मिसिसिपीत आले. पाण्याला गती होती. दोन्ही काठांवरची शेती सुपीक होती. मोठमोठ्या फळबागा होत्या.

एका सायंकाळी नदीच्या काठाला एका झाडाखाली दोराने त्यांनी आपला तराफा बांधला. दोघे पोटभर जेवले आणि निळे निळे, चांदण्यांनी भरलेले आकाश पाहत गाढझोपी गेले.

मध्यरात्र उलटल्यावर गुडुप अंधारातून कुजबुजण्याचा व झाडपाल्याचा आवाज येऊ लागला. हे प्रवासी गाढझोपी गेले होते. इतक्यात लाकडावर लाकूड आपटल्याच्या आवाजाने अब्राहम जागा झाला. आपल्या तराफ्यावर एक माणूस चढत असल्याचे त्याला दिसले. प्रसंगावधान राखून चोर चोर म्हणून तो ओरडला. ॲलन जागा झाला. तो दणकट चोरटा अब्राहमवर हल्ला करू लागला. पण त्याच्या दंडुक्याचा मार मोठ्या शिताफीने चुकवून तगड्या, बलशाली अब्राहमने त्याला उचलून नदीत फेकून दिले. इतक्यात दबा धरून बसलेले आणखी चार चोर तराफ्यावर चढले. सारे दांडगेश्वर व दंडुकाधारी होते. ॲलनच्या हातातील वल्हे घेऊन अब्राहमने पाचही चोरांना पार पिटाळून लावले. दोघे तर जखमी होऊन नदीत पडले व धारेला लागले. दोर सोडून त्यांनी मध्यरात्र उलटून गेली असतानासुद्धा प्रवास पुढे चालू केला. सकाळच्या कोवळ्या उन्हात ते न्यू ऑर्लिन्सला आले, अब्राहमच्या डोळ्याच्या वरच्या भागावर छोटीशी जखम झालेली ॲलनला दिसली. ती त्याने उपकृत भावनेने पुसून काढली व त्याला औषध लावले. त्या जखमेच्या वणाने अब्राहमला जन्मभर साथ दिली.

त्यांनी माल उतरवून घेतला. मालाला चांगली किंमत आली. त्यांनी पंधरा दिवस 'न्यू ऑर्लिन्स'मध्ये मुक्काम केला. ॲलनने बराच माल खरेदी केला. शहराची मौज लुटण्यात त्यांनी थोडा पैसा खर्च केला. अब्राहमची व ॲलनची चांगलीच गट्टी जमली होती.

एके दिवशी सायंकाळी असेच घोड्यांच्या बाजारात हिंडता हिंडता त्यांना गुलामांचा बाजार दिसला. साखळदंडाने गुलामांना ओढत रखडत आणले जात होते. एका वयात आलेल्या निग्रो पोरीचा लिलाव चालला होता. बरीच गर्दी जमली होती. ती गिऱ्हाइकाच्या नजरेत भरावी, म्हणून तिचा मालक तिला काठीने ढोशीत होता आणि पेटत्या सिगारेटचे चटके देत होता. अंग भाजल्यावर ती विक्षेप करी व सारे हसत.

अब्राहमने हे दृश्य पाहिले व तो क्रोधाने लाल झाला. तो मालकाला म्हणाला,

''अहो, ती बाई आहे!''

''पण गुलाम, निग्रो जातीची.''

''माणसानं माणसावर असा अन्याय करू नये.''

''मग घ्या विकत नि करा तिला मुक्त.''

''किंमत काय?''

''फक्त पाच डॉलर.''

खिशातले पाच डॉलर मालकाच्या अंगावर फेकून अब्राहमने तिला मुक्त केले. त्याचा विक्षिप्तपणा पाहून ॲलन त्याला म्हणाला,

''सारे गुलाम विकत घेऊन मुक्त करायला तुला पाच जन्म अपुरे पडतील!''

''एकाच जन्मात करता येईल!''

''ते कसं?''

''हाती सत्ता आली तर – कायद्यानं.''

भावी आयुष्यात गुलामांचा प्रश्न सोडविण्याचा अब्राहमने मनोमन निश्चय केला.

न्यू ऑर्लिन्समध्ये सुंदर पोषाख केलेली दुसरी माणसे होती. खाणावळी होत्या. सर्वत्र चैनबाजी होती. मोठी मोठी घरे होती. डामडौल होता. ही माणसे गुलामांची विक्री सहन तरी कशी करतात, याचे त्याला आश्चर्य वाटले.

त्यांनी आपला तराफा विकला. वाफेच्या बोटीचे परतीचे तिकीट त्यांनी काढले.

अब्राहम घरी पीजनक्रीकला आला, आपल्या रोमहर्षक प्रवासाची रसभरित कहाणी त्याने आई-वडिलांना सांगितली.

मात्र त्यांचा लाडका अब्राहम अंतर्बाह्य किती बदलून गेला होता, याची बिलकूल कल्पना त्यांना नव्हती.

◆◆◆

# निश्चल

समोरचे झाड हिरवेगार, अवकाशात बिंबलेले, स्तब्ध, अचल
स्तब्ध पलीकडे सर्वदूर पसरलेले निळेभोर आभाळ
संथपणे तरंगत जाणारा एक मुक्त विलासी ढग
आणि त्यावरून उडणारी शुभ्र शुभ्र बगळ्यांची माळ

हा रस्ता असाच सरळ दूरवर गेला आहे,
सांडले आहे त्यावर ठायी ठायी पिवळेधमक ऊन;
निश्चल आहे खिडकीबाहेरची सायलीची तरुण वेल
आळसावलेले एक फुलपाखरू उडते आहे मधून मधून

या साऱ्यांचे मिळून एक सुरेखसे चित्र बनते
दुपारच्या शांततेचा फिरतो त्यावर हलकासा हात,
सुषुप्तीचा जडपणा अलगद पापणीवर उतरतो
एक गोड तंद्री सर्वांगातून येते वाहात!

जग सारे वाटते इथून दूर, धूसर, अस्पष्ट,
जसा हजारो वर्षांपूर्वी घडून गेलेला इतिहास,
किंवा वाचलेली क्षुल्लक घटना, झोपेतले एक दुःस्वप्न—
छाया देखील ज्याची पोचू शकत नाही आसपास


या क्षणी मी पाहाते आहे फक्त हे निळेभोर आभाळ
झाड, वाट, ऊन, वेल, फूलपाखरू, ढग, बगळ्यांची माळ

**- शान्ता शेळके**

**('गोंदण' या काव्यसंग्रहातून)**

**Postal Reg. No. PCW/086/2018 – 2020**
**RNI. No. MAHMAR/2000/02739**
**No. SDO/Pune City/SR/3/2018 - Date : 10/01/2018**
Posting at Marketyard, PSO, Pune 411037.
Publication Date : 09/06/2018 Posting Date : 11/06/2018


# आवर्जून वाचावे




**पर्यावरण प्रदूषण**




**जंगलातील दिवस**




**वेध पर्यावरणाचा**

## मेहता मराठी ग्रंथजगत

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,